# मराठीचिये नगरी

भाग १ ला

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ८५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०९३२

लेखक

द. रा. कानेगांवकर,
एम्. ए. बी. टी.

१९४१

REFBK-0006127

किंमत १२ आणे

# मराठीचिये नगरीं

भाग १ ला

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ८५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०९३२

लेखक

द. रा. कानेगांवकर,
एम्. ए. बी. टी.

१९४१

REFBK-0006127

किंमत १२ आणे

मायबोलीच्या प्रेमाचें बाळकडू पाजलेल्या

माझ्या मातुश्री

ती. सौ. गोदुअक्काचे चरणीं

सादर समर्पित

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठें |
|---|---|---|
| नगरप्रवेशापूर्वी | | |
| नगरप्रवेश | | |
| विषय-प्रवेश | | |
| दालन | १ लें मराठीचा उगम | १ |
| ,, | २ रें नाणावलेले प्रधान हेमाडपंत | १० |
| ,, | ३ रें महात्मा चक्रधरस्वामी | १९ |
| ,, | ४ थें म्हातारी शोधास निघाली | २७ |
| ,, | ५ वें कडक शिस्त ! | ३३ |
| ,, | ६ वें महानुभाव पंथांतील लेखक | ४० |
| ,, | ७ वें जाऊं का काशीला ? | ४७ |
| ,, | ८ वें ज्ञानेश्वरमाउली ! | ५६ |
| ,, | ९ वें सोपान-मुक्ताबाई | ६७ |
| ,, | १० वें नामदेवमहाराज | ७५ |
| ,, | ११ वें पंजाबवर स्वारी | ८३ |
| ,, | १२ वें संतांचा मेळा | ९१ |
| | समारोप | ९९ |
| | सूचि | १०२ |

# नगरप्रवेशापूर्वी

मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचा अभ्यास शाळांतून येण्यास अजून फार-अवधि आहे. विद्यापीठाच्या परीक्षांतून सुद्धां फार उशीरां म्हणजे बी. ए. एम्. ए. च्या परीक्षांना अशा अभ्यासाची जरूरी असते. आपल्या इकडे लहान मुलांकरतां, म्हणजे हायस्कुलांत शिकणाऱ्या मुलांकरतां असा एकादा सोपा, त्याची तोंडओळख करून देणारा, ग्रंथ अजून निघाला नाहीं. तेव्हां विद्यार्थ्यांना उपयोगी पडेल म्हणून हा संभाषणात्मक लिहिलेला वाङ्मयेतिहासाचा पहिला खंड प्रकाशित होत आहे.

या भागांत ज्ञानेश्वर-नामदेवांच्या कालापर्यंतच्या, म्हणजे वारकरी पंथ निर्माण होऊन त्याची जोपासना झाली इथपर्यंतचा इतिहास आलेला आहे. इतिहास सांगतांना कंटाळवाणा होऊं नये म्हणून ही संवादात्मक पद्धति स्वीकारावी लागली. तरी पण शक्य तों इतिहासाचा धागा अखंड राखण्याचा प्रयत्न केला आहे. या कालांतील लेखक, त्यांचे गुणदोष व लेखन यथामति मांडलें आहे. मराठी वाङ्मयांतील नवें महानुभावीय दालन येथें प्रशस्त रीतीनें उघडून दाखवलें आहे. या वाङ्मयाची असावी तशी माहिती प्रौढांना सुद्धां नाहीं, मग नवीनांना तर त्याचा गंधहि नाहीं यांत आश्चर्य कसलें ? या दृष्टीनें त्या वाङ्मयांतील निरनिराळीं पुस्तकें वाचून तो भाग संकलित केला आहे. हा या पुस्तकाचा विशेष होय.

याच पद्धतीनें अगर जमल्यास दुसऱ्या पद्धतीनें, पण विद्यार्थ्यांकरतां सर्व महाराष्ट्रवाङ्मयाच्या इतिहासाचे असे खंड करून तयार करावयाचें योजिले आहे. दुसरा खंड १४ व्या शतकापासून तों सोळावें शतक अखेरपर्यंत, तिसरा खंड रामजोशी अखेरपर्यंत व चौथा आणि शेवटला आधुनिक कालपर्यंत असें काढण्याचें योजिलें आहे.

या पुस्तकाची मूळ कल्पना 'शालापत्रक' मासिकांतून कांहीं लेख द्यावे अशी इच्छा झाल्यावरून सुचली आहे. तिला सर्वस्वी जबाबदार माझे मित्र

व शालापत्रकाचे संपादक श्री. दामुअण्णा रानडे हेच होत. त्यांनीं चालना दिली नसती तर आज ही कल्पना फलद्रूप झाली असती कीं नाहीं याची शंकाच आहे! शालापत्रक मासिकांतून याचीं क्रमशः १० प्रकरणें प्रसिद्ध झालीं. त्यांत कांहीं प्रकरणांची भर टाकून हें वेगळें प्रकाशन केलें आहे.

श्री. दयार्णवराव कोपर्डेकर यांनीं हें पुस्तक प्रकाशित करण्याचें ठरवलें व चिकाटीनें तें काम तडीस नेलें. एरव्हीं माझ्या हातून हें काम होतें ना.

माझे गुरुवर्य दत्तोपंत पोतदार यांनीं जी सुंदर प्रस्तावना लिहून दिली, कीं जी माझ्या या सर्व प्रयत्नांवर शिखरासारखी शोभते आहे, त्याबद्दल गुरुवर्यांचे मी कसे व किती आभार मानूं? त्यांच्या ऋणांत राहणेंच मला जास्त बरें वाटतें.

राजगुरु प्रेसचे चालक यांनीं हें काम सुबक केलें हें तर दिसतेंच आहे; पण त्यांतल्या त्यांत मुद्रितें तपासून 'लेखनशुद्धि' करण्याचे कामांत मला श्री. महाजन यांची फार मदत झालेली आहे. त्यांचा मी आभारी आहे.

शेवटीं ज्या चिच्छक्तीनें मला ही प्रेरणा दिली तिला अभिवादन करून हें लिखाण पुरें करतों.

१९८/७ चिमणबाग,
टिळक रस्ता, पुणें २
५ नोव्हेंबर १९४१

दत्तो रामचंद्र कानेगांवकर

# नगर-प्रवेश

श्री. काणेगांवकर यांनीं 'मराठीचिये नगरीं' या नांवाची लेखमाला पुण्याच्या 'शाळा-पत्रकांत' लिहून प्रसिद्ध केली. 'शाळा-पत्रक' हें मासिक मराठी शिक्षक व विद्यार्थी यांचेसाठीं मुख्यतः चालविलें जातें. रा. काणेगांवकरांच्या प्रस्तुत लेखमालेचाहि तोच उद्देश आहे. आपल्या प्रिय मराठी भाषेची आयुष्यकथा सोप्या भाषेंत मनोरंजक पद्धतीनें सांगावी म्हणून प्रस्तुतचा प्रयत्न लेखकानें केला आहे. लेखक स्वतः शिक्षक आहेत, पूर्ववयांत त्यांनीं मराठी विषयांत पदवी प्राप्त करून घेतली आहे आणि पुढें शिक्षणशास्त्राचीहि पदवी जोडीला मिळवून आपली पात्रता वाढविली आहे. यामुळें मराठी भाषेची जन्मकथा त्यांस विदित आहे एवढेंच नाहीं तर लहान वयाच्या विद्यार्थ्यांस गोष्टीच्या रूपानें ती कशी सजवून सांगावी हेंहि त्यांनीं लक्षपूर्वक अभ्यासिलें आहे. खेरीज मराठी लिहिण्याचाहि त्यांस चांगला सराव आहे.

पुष्कळ वर्षांपूर्वीं महाराष्ट्रांतील मुलांचे पहिले आवडते लेखक 'बालबोध' कर्ते कै. विनायक कोंडदेव ओक यांनीं 'महाराष्ट्र वाङ्मय' नांवाचें एक छोटें पुस्तक मुलांसाठीं लिहून प्रसिद्ध केलें होतें. या पुस्तकांत सरळ व सुबोध पद्धतीनें ओकांनीं मराठी वाङ्मयाची माहिती जुळवून लिहिली होती आणि हें छोटेखानी पुस्तक 'निर्णयसागर'नें सुबक रीतीनें छापून प्रसिद्ध केलें होतें. एक तर हें पुस्तक माहितीच्या दृष्टीनें फार मागासलेलें झालें आहे; आणि आतां त्याचें नांवहि कोणास फारसें माहीत नाहीं. शिवाय मुलांस वाचण्याची आवड वाटावयास हवी तर संवादरूपानें किंवा अन्य अशाच युक्तीचा आश्रय करून पुस्तकें लिहिलीं पाहिजेत. असा प्रयत्न कोणी तरी करावयास पाहिजे होता तो रा. काणेगांवकर यांनीं केला आहे.

या पुस्तकांत मराठीचें जें पहिलें युग म्हणजे ज्ञानेश्वरांचें युग झालें त्याचीच हकीकत दिलेली आहे. ओकांच्या वेळीं महानुभावी वाङ्मयाची कांहींच ओळख विद्वानांसदेखील नव्हती. परंतु आतां हें महानुभावी

वाङ्मयाचें प्रशान्त आणि प्रसन्न दालन खुलें झालें आहे. मराठी वाङ्मयांत या नव्या शोधामुळें फार मोलाची भर निःसंशय पडलेली आहे. जेथें ज्ञानेश्वरी-सारखा एखादाच 'कोंवळया आणि रसाळ' बोलाचा अद्वितीय ग्रंथ ठाऊक होता तेथें आतां 'शिशुपालवध', 'वच्छहरण' यांसारखे अतिमधुर आख्यानग्रंथ आणि भास्करकवि आणि दामोदरपंडित अशांसारखे वरील काव्यांचे प्रणेते यांचा परिचय आपणांस होऊं लागला आहे. महाराष्ट्र व कर्नाटक यांचे संबंध किती निगडित होते तें आपणांस अधिक स्पष्ट दिसून येऊं लागलें आहे. प्राचीन कन्नड साहित्याच्या अभ्यासाची मराठीच्या उदयकाळाची कथा समजण्यास किती गरज आहे हे चांगलें न्याहाळतां येऊं लागलें आहे. तेव्हां आतां तीस चाळीस वर्षांपूर्वीचें आपलें तुटपुंजें ज्ञान आपणांस पुरें पडणार कसें? आतां मराठी वाङ्मयाचा नवा त्र इतिहास आपणांस सिद्ध केला पाहिजे.

मराठी वाङ्मयाची माहिती शोधून काढण्याचे प्रयत्न कै. राजवाडे, रा. पांगारकर, रा. अजगांवकर, रा. शंकरराव देव–चांदोरकर, रा. विनायकराव भावे वगैरे मंडळींनीं फार केले. फार पूर्वी डुकले व परशरामपंत तात्या गोडबोले यांचा 'सर्वसंग्रह' व त्यापूर्वींहि 'ज्ञानचंद्रोदय' वगैरे मासिकां-तून शिळाछापावर पुष्कळ जुनी मराठी कविता प्रसिद्ध झाली. नंतर 'काव्य-संग्रह' आणि 'महाराष्ट्र कवि' या मासिकांतूनहि बरीच मराठी कविता प्रसिद्ध झाली. ज्ञानेश्वरी, तुकारामाची किंवा रामदासाची गाथा वगैरे स्वतंत्र ग्रंथ निराळेच प्रसिद्ध होत होते। पुढें मूळ पोथ्या पाहून त्याप्रमाणें नीट तपास करून ग्रंथ प्रसिद्ध करण्याचा उद्योग संशोधकांनीं जोरानें सुरू केला. या कामीं मुख्य प्रेरणा विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनीं केली. मग पुनः ज्ञानेश्वर रामदास, तुकाराम, मोरोपंत यांचे ग्रंथ मूळ नव्याजुन्या पोथ्या पाहून छापण्यांत आले. भारत–इतिहास–संशोधक–मंडळ, शारदाश्रम, सत्कार्योत्तेजक सभा या. संस्थांनीं पुष्कळच पोथ्या जमवून जुनें वाङ्मय प्रसिद्धीस आणलें आहे. अलीकडे वऱ्हाडांत नेने–दोघे देशपांडे–कोलते वगैरे मंडळींनीं महानुभावी वाङ्मय पुष्कळ प्रसिद्ध केलें आहे. ठळक ठोकळ प्रयत्नांचा उल्लेख वर केला. सर्वांचीं नांवें कांहीं येथें दिलीं नाहींत. तीं पुष्कळच आहेत. अजून उद्योग चालू आहे आणि पुष्कळ ग्रंथ प्रसिद्ध व्हावयाचे राहून गेले आहेत. क्रमाक्रमानें तें काम पुरें केलें पाहिजे.

प्रथम तर मराठी विषयाला आमच्या शाळांत जागाच नव्हती म्हटलें तरी चालेल. आतां सर्वांची खात्री होऊन चुकली आहे कीं, आपली भाषा जी मराठी तिची हेळसांड आपण करतां नये. म्हणून आतां मराठीचा अभ्यास वाढूं लागला आहे. तरीहि पण मराठीचा जम कांहीं जसा बसावा तसा बसला नाहीं.

अलीकडे मराठींत नवे नवे लेखक पुढें येत आहेत, छापखाने वाढले आहेत, वर्तमानपत्रें तर पुष्कळच चाललीं आहेत आणि प्रतिदिवशीं मराठीची बाजू बळकट होत चालली आहे.

तसेंच अलीकडे नवे कविहि पुष्कळ होऊं लागले आहेत. त्यांचे विषय, चाली सर्व नवें नवें आणि पुष्कळच गोड आहे. जुनी कविता त्या मानानें मागें पडत चालली आहे. परंतु मराठीचा अभ्यास चांगला करावयाचा तर आपले चांगले चांगले जुने कवि यांची माहिती आपणांस असलीच पाहिजे आणि त्यांच्या अमर कृतींचा अभ्यास आपणांस केलाच पाहिजे. केवळ नव्यांवरच आपली सर्व भिस्त ठेवून चालणार नाहीं. नवें आणि जुनें दोहींचा अभ्यास आपण केला पाहिजे.

वाङ्मय म्हणून पाहिलें तर ज्ञानेश्वरीची सर दुसऱ्या मराठी ग्रंथास क्वचितच येईल; मुक्तेश्वराची भव्य प्रतिभा अद्यापिहि आपणांस स्तिमित करील; तुकारामाची आर्त वाणी अजूनहि आपल्या अंतःकरणाचा ठाव घेतल्याशिवाय सोडणार नाहीं; रामदासांची भेदक वाणी आणि तारक शहाणपण अद्यापिहि आपलीं निद्रिस्त मनें खडबडून जागीं केल्याशिवाय राहणार नाहीं आणि कविराय रामजोशी आपणांवर 'फिदा' होण्यास भाग पाडल्याशिवाय सोडणार नाहींत. अशा प्राचीन मराठी वाङ्मयाच्या प्रसन्नसलिलसरितेंत चार-दोन बुड्या मारल्याशिवाय राहील तो करंटाच म्हणावा लागेल !

येथें कोणाचें काय बा गेलें ? ।<br>
ज्याचें त्यानेंच अनहित केलें !!

असें अनहित होऊं नये, ही हानि टाळावी आणि बालपणापासूनच आपल्या जुन्या पण नित्य नूतन वाटणाऱ्या जिवंत मराठी वाणीचा परिचय व्हावा हा उद्देश डोळ्यांपुढें ठेवूनच रा. काणेगांवकर यांनीं 'मराठीचिये

नगरीं'तून आमच्या बाळगोपाळांस एक फेरफटका मारून येण्याची सोय या ग्रंथानें केली आहे.

आपली परंपरा राखण्याचें काम कुटुंबांतील वडील माणसांचें आहे. हें ओळखून रा. काणेगांवकर यांनीं एका कल्पित कुटुंबांतील वडील 'बाबां'च्या तोंडून घरांतील 'मुलांमुलींस' मराठीच्या जन्मकाळाच्या सोहळ्याचें रसभरित वर्णन करविलें आहे. घराऊ वातावरणांत बसून आमच्या परंपरेची ओळख मागील पिढी येथें पुढील पिढीस करून देत आहे. निरनिराळे मांड मांडून हाच सोहळा विविधरसयुक्त पद्धतीनें वर्णन करितां येईल. कलेचें कसब जितकें चालवावें तितकें थोडेंच आहे. रा. काणेगांवकरांच्या या ग्रंथामुळें लहानपणींच आमच्या मुलांमुलींस आमचें प्राचीन मराठी वाङ्मय आणि आमचे पहिले वाङ्मयनिर्माते यांची चांगली तोंडओळख होईल आणि पुढें अधिक माहिती मिळावी म्हणून उत्सुकता वाटेल. एवढें काम झालें तर रा. काणेगांवकरांचा प्रयत्न सफल झाला असें म्हणतां येईल. हैदराबादच्या निजामविजयांत एक 'मराठीची कहाणी' अलीकडे प्रसिद्ध होत असते, ती खुसखुशीत आहे. तथापि बाळगोपाळांच्यापेक्षां तिची छाप प्रौढांवरच लवकर पडेल. हे असे प्रयत्न केव्हांहि अभिनंदनीयच म्हणावे लागतील. असल्या नवीन कहाण्या किंवा गोष्टी समोर ठेवून जर घरोघरीं मुलांमुलींस ज्ञान देण्याचे प्रयत्न होतील तर आमच्या मुलांमुलींचें मोठेंच कल्याण होईल.

कार्तिक शु. १५।१८६३, पुणें.

दत्तो वामन पोतदार

# विषयप्रवेश

काळपुरुष म्हणाला :—

" तुम्ही देशाचा इतिहास वाचतां, जगाचा इतिहास वाचतां पण जी भाषा तुम्ही हरघडी वापरतां, ती कशी जन्मली, तिचें लहानपणचें रूप कसें होतें, ती जी हल्ली दिसते तशी कशी झाली हें मात्र तुम्ही पहात नाहीं. आई जन्म देऊन मुलांना वाढवते. भाषा ही माणसांना जन्मभर सोबत करून त्यांचें जीवन सुसह्य करते.

तुम्ही बोलतां ती मराठी भाषा ! या तुमच्या भाषेंत कित्येक तरी लोकांनीं किती तरी वाङ्मय लिहून ठेविलें होतें. जितकें सध्यां लोक हुडकून छापीत आहेत त्यापेक्षां देखील किती तरी पटींनीं तें जास्त लिहिलें गेलें आहे; माझ्या हातांतून सुटून जितकें राहिलें आहे तें 'अजरामर' म्हणून तुमच्यापुढें आहे. मुलांनो, त्या काळांतील मोठमोठ्या लोकांचीं अद्भुत चरित्रें व माहिती तुम्हांला वाचावीशी वाटते काय ?"

" होय. आम्हांला वाचावीशी वाटते " मुलें म्हणालीं. " मग आम्हांला सांगाना ती माहिती."

" हें पहा तुम्हांला जर खरोखरीच ऐकावयाची असली तर, ती मी नाहीं तुम्हांला सांगणार—तीं पहा तेथें दोन मुलें आपापसांत बोलत आहेत अन् त्यांचे बाबा त्यांना माहितीहि समजावून सांगत आहेत."

" पण आम्हांला नाहीं दिसत तीं."

" मग झाका तर डोळे तुमचे. मी एक जादू करतों. नंतर तुम्हांला तीं दिसूं लागतील. हं झाका."

मुलांनीं डोळे झाकले तेव्हां काळपुरुषानें त्यांच्याभोंवतीं हवेंत कांहीं वर्तुळें केलीं व नंतर तो म्हणाला, "हं उघडा" तेव्हां खरोखरीच त्यांना दोन मुलें भांडताहेत 'मराठीचिये नगरीं' 'मराठीचिये नगरीं' असें ओरडताहेत असें दिसूं लागलें. तेव्हां त्यांना फार आनंद झाला. काळपुरुष म्हणाला, " तुम्ही नेहमीं येत जा म्हणजे तुम्हांला ही कथा सगळी कळेल. ती फक्त तुम्हांलाच ऐकूं येईल. हा घ्या 'मणी'. तो तुमच्याजवळ असला कीं मी केव्हांहि दिसतो. आतां पहा न् ऐका काय बोलतात तीं मुलें तें!"

सारीं मुलेंहि आनंदानें ऐकूं लागलीं.

---

# मराठीचिये नगरीं

## पहिलें दालन

## मराठीचा उगम

६१२८

“ बघ ग आई, दादा किती दुष्ट आहे तो.”

“ काय करतोय ? ”

“ त्या गरीब भिकाऱ्याची कनी चेष्टा करतोय.”

“ कुठें ग चेष्टा करतोय ” दादा म्हणाला. “ मी आपला तो जें दाखवतोय त्याचा अर्थ करून सांगतों आहे ! ”

“ अहाहा ! हेंच का रे तुझें अर्थ सांगणें–त्याला बिचाऱ्याला बोलतां येत नाहीं म्हणून उगीचच्या उगीच अर्थाचा अनर्थ करतोस.”

“ हें बघ आई,” दादा सांगूं लागला, “तो भिकारी होता मुका– तो सारखा कपाळावर हात मारी अन् पोटाकडे बोट दाखवून ‘ आ–आ ’ करी. मीं त्याला म्हटलं, ‘बाबा रे, तुझें पोट अन् कपाळ दुखत असेल तर पुढच्या नेने डॉक्टरांच्याकडे जा. ते तुला औषध देतील. हा काय दवाखाना आहे का इथं औषध मागायला ? ”

आईला प्रथम हंसूं आलें; पण मागाहून भिकाऱ्याच्या कळवळ्यानें तिला वाईट वाटलें. ती म्हणाली––

“ दादा, अरे त्याला बोलतां येत नाहीं; याची थट्टा करायची का ?–हें बरं नाहीं–कपाळावर हात मारला कीं डोकं दुखत नसतें–

तो आपल्या नशिबाची कथा सांगत होता. त्याला बोलतां आलें असतें तर त्यानें कपाळाला हात न लावतां 'माझें नशीबच वाईट' असें सांगितलें असतें, व पोटाकडे बोट न दाखवितां 'कांहीं पोटाला द्या' असें म्हटलें असतें. खुणा करून आपल्याला जें सांगावयाचें असतें तें हमखास सांगतां येईलच असें नाहीं. एका खुणेचे दहा अर्थ होतील. तसें बोलण्याचें होणार नाहीं. म्हणूनच बोलण्याचें अत्यंत महत्त्व आहे."

अगदीं लहानपणापासून ही बोलभाषा प्राप्त करून घेण्याचा माणसाचा प्रयत्न सारखा चाललेला असतो. लहान मूल मोठ्या माणसांच्या तोंडाकडे सारखें पहात असतें. बोलतांना मोठीं माणसें कशा प्रकारें ओठांची हालचाल करतात तेंहि तें पहात असतें व मग हळूहळू तें बोलवयास लागतें.

लहानगा गोटू कांहीं खावयाचें पुढें दिसलें कीं, 'मं मं' म्हणतो. सगळें खाणें म्हणजे 'मं मं',–कसलाहि प्राणी दिसला कीं, 'बाऊ' असें बोलूं लागतो. अशा तऱ्हेनें तो बोलभाषा शिकतो.

**बोलण्यानेंच आपण आपले विचार दुसऱ्याला कळवूं शकतो.** आमचा दादा फार बडबड्या. नाहीं नाहीं त्या विषयांवर याची आपली चक्रंचक्री चाललेलीच असे. आई त्याला नेहमीं म्हणावयाची, 'अरे दादा, तुझें तोंड कातड्याचें आहे म्हणून बरें. नाहींतर–'

"नाहींतर काय ?—" दादा लगेच म्हणतो, "अग आई, पंडित जवाहरलाल नेहरूंनीं एका दिवसांत २२ ठिकाणीं व्याख्यानें दिलीं! बघितलेंस, काय प्रभाव आहे बोलण्याचा!"

"तें खरं आहे रे बाबा, पण...." आईनें लागलीच कबूल केलें.

छोटी यमू इतका वेळ गप्प होती. तिनें आतां तोंड उघडलें. ती म्हणाली—

" दादा, एवढा बोलण्याचा— 'तेगार' दाखवतोस, मग जें जें तोंडांतून निघतें तें तें आपणांस कळावयास पाहिजेच कीं नाहीं ?"

" अलबत्—कळलेंच पाहिजे."

यमूला वाटलें भलें पकडलें. ती म्हणाली—

" मग पलीकडला सिद्रामप्पा जें बोलतो तें 'रुंडु-गुंडु' कां रे तुला समजत नाहीं ? ती सुद्धां बोलभाषाच ना ? "

" अग वा ! पण ती कानडी भाषा आहे. अन् अशा पुष्कळ बोली आहेत जगांत ! आपल्या हिंदुस्थानांत तर अशा २०० बोली आहेत ! "

हा सारा संवाद बाबा पलीकडच्या खोलींतून ऐकत होते. ते हंसत हंसत पुढें आले व म्हणाले—

" मुलांनो, निरनिराळ्या प्रकारचे उच्चार व त्यांना दिलेले निरनिराळे अर्थ यांनीं वेगवेगळ्या बोलभाषा निर्माण झाल्या."

दादा व यमू या दोघांनाहि हें कांहींच कळलें नाहीं, हें पाहून बाबांनीं पुढें सुरू केलें—

" हें पहा, मी तुम्हांला याचीं उदाहरणेंच देतों—आपण आपल्या बोलींत म्हणतों कीं,—'जेवण झालें का ?'

तर दुसरे म्हणतील—'क्या खाना हो गया ?'

तिसरे म्हणतील—'उटा आत येनं ?'

चौथ्यांचे—'हॅव यू टेकन् युवर् डिनर् ?'

असें होईल. या सगळ्या वाक्यांचा अर्थ एकच आहे. पण उच्चारण्याच्या तऱ्हा भिन्न आहेत. या भिन्न बोलभाषा होत. आपण बोलतो ती बोली कोणती रे ?—"

" मराठी ! ह्यात्तिच्या त्यांत काय एवढें ?" यमू झटकन् बोलली.

" मराठी भाषा किती लोक बोलतात माहीत आहे तुम्हांला ?"

यमू व दादा एकमेकांच्या तोंडाकडे पाहूं लागलीं. आज बाबांनासुद्धां स्फुरण आलेलें होतें. हळूहळू ते माहिती सांगूं लागले.

" आपण मराठी बोलणारे लोक जवळ जवळ सवादोन ते अडीच कोटि इतके आहोंत !"

" अबब !"

" तसं पाहिल्यास ही संख्या कमीच आहे. बंगाली, हिंदी वगैरे बोली बोलणारे लोक आपल्यापेक्षां कितीतरी जास्त आहेत. आपल्या लोकसंख्येवरून आपल्या भाषेचा नंबर तिसरा चौथा लागेल."

" इंग्लंडमध्यें किती लोक आहेत हो ?"

" इंग्लंडमध्यें फार नाहींत कांहीं लोक; असतील पांचसहा कोटी पण त्यांनीं दरारा किती बसवलाय जगांत !"

" त्याचें नको सांगूं एवढें ! आम्हीं मराठ्यांनीं नाहीं का मागें अटकेपार झेंडे लावले ?" दादा आवेशानें म्हणाला.

" पण आतां आहे का मराठीचा फैलाव अटकेपार ?—"

" अटकेपार नसला म्हणून काय झालें ? पण आम्ही पराक्रमी होतों हें तर सिद्ध होत नाहीं का त्यानें ?" दादानें मखलाशी केली !

" बाबा, तुम्हीच सांगा आपली बोली, किती लांबवर बोलली जाते तें !"


बाबा म्हणाले—" पुणें हें जर भाषेचें मुख्य ठिकाण धरलें तर पुण्यापासून पश्चिमेस मुंबईपासून वर रेषा काढली तर ती थेट गुजराथपर्यंत भिडते व सातपुडा ओलांडून ती छोटानागपूरपर्यंत जाते आणि तेथून खालीं चांदा, वणी यावरून निझामच्या राज्यांत

हैद्राबादवरून बार्शी-सोलापूर या मार्गावरून वळण घेऊन कोल्हापूर-सांगलीवरून कोंकणांत जाते व तेथून पुनः मुंबईहून पुण्यास मिळते.'

" पण यांत गोवे, कारवार कुठें आहेत बाबा ? "

" खरंच, गोव्यापर्यंत आपली भाषा बोलली जाते. हा नकाशाच पहा म्हणजे कळेल." बाबांनीं पेटींतून नकाशाच काढला.

मुलांना गंमत वाटली. त्यांनीं पुनः पुनः नकाशा पाहिला, " केवढा तरी प्रांत हा ! " यमू म्हणाली.




" बाबा, यांत वऱ्हाड, मराठवाडा, कोंकण, पुणें सर्व आलें आहे. सगळीकडे आपल्यासारखेंच बोलतात ना ? " दादा म्हणाला.

" हो, बहुशः तसेंच, पण थोडासा फरक करून—हे जे तूं चार

प्रांत सांगितलेंस त्यांच्या बोलींत थोडा थोडा फरक आहे. हें बघ, मी चारहि प्रकार एकेका वाक्यानें सांगतों.—

पुणेरी— “ माझ्या पुढें चाल.

कोंकणी— “ मोज्या मुकार चाल.

वऱ्हाडी— “ माह्या सामने चाल.

खानदेशी—“ मन्हा मोन्हे च्याल.

कारवारी— “ मज्जे ‘इदूर’ चंक.

का, आहे कीं नाहीं खूप फरक ? एवढेंच नव्हे तर ‘प्रत्येक बारा कोसांवर भाषा थोडी थोडी बदलते’ असें म्हणतात तें खोटें नाहीं.”

दादाला एक शंका आली. तो म्हणाला—

“ बाबा, असा जर फरक सारखा पडत गेला तर मी जें बोलतों तें वऱ्हाडी गृहस्थाला कळावयाचें नाहीं.”

“ अगदीं असेंच नव्हे ” बाबा म्हणाले, “सगळें कळावयाचें नाहीं हें खरें; पण त्याला एक उपाय आहे.”

“ कोणता ? ” यमूनें विचारलें.

“ अरे, आपण जसें बोलण्यानें आपले विचार दुसऱ्यांस कळवतों त्याप्रमाणें लिहूनहि विचार कळवतां येतात व त्यासच लेखीभाषा असें म्हणतात.” बाबांनीं सांगितलें.

“ म्हणजे लेखीभाषा सगळीकडे सारखीच असते ? ”

“ हो तर ! तूं अमरावतीचें वर्तमानपत्र नाहीं का वाचीत ? तसेंच गोव्याकडलें ? ”


“ मग ही लेखी भाषा कुणी काढली ? ”

“ कुणाची म्हणतोस तूं ? ”

“ आपल्या मराठीची ! ”

" आपली मराठी भाषा ही संस्कृतपासून निघाली आहे व त्यामुळें संस्कृतांतल्या लेखी खुणाच आपण वापरतों, त्या खुणांना 'लिपि' म्हणतात. ही आपली देवनागरी लिपि आहे. मराठींत जेव्हां प्रथम लिहावयास सुरुवात झाली तेव्हां हीच लिपी वापरीत–पण थोड्याशा फरकानें ! जुन्या काळीं कसें लिहीत, हें तुला पाहावयाचें आहे का ? हा एक नमुना मी तुला दाखवतों. हा ७५० वर्षांपूर्वीचा आहे."

पृष्ठ मात्रा पद्धत



॥ अ थ तु जो को णु हु विए शा स न लो
पी ते यां श्री वै द्य ना थ दे वा ची भा ल
स कु टु बि या प डे॥

पृष्ठमात्रा-पद्धतीचें मराठी. यांत मात्रा अक्षरांच्या मागें आहेत.

" अरे, पण या पहा मात्रा अक्षराच्या मागेंच दिल्या आहेत–" दादा उद्गारला.


" त्याला पृष्ठमात्रांची पद्धत म्हणतात."

इतक्यांत यमूला कांहींसें आठवलें. ती मध्येंच म्हणाली,

" बाबा, म्हणजे आपली मराठी भाषा खूपच जुनी आहे म्हणावयाची ! "

" साधारणत: १००० वर्षांपूर्वींपासून आपली मराठी प्रचारांत असली पाहिजे असें विद्वानांचें मत आहे."

" कशावरून असें म्हणतां बाबा ? " चौकस दादा विचारूं लागला.



" कशावरून म्हणजे ? अरे, इतक्या जुन्या काळीं लिहिलेलें मराठी सांपडलें आहे म्हणून मी म्हणतों—हें पहा चित्र. हा गोमतेश्वराचा पुतळा आहे. म्हैसूर संस्थानांत श्रवण-बेलगोळा या गांवीं डोंगरावर खडकांत हा करविला आहे. आणि त्या खालीं तो

पुतळा करणारानें लिहून ठेवलें आहे. मराठींतील तें पहिलें लिहिलेलें वाक्य आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. हें वाक्य असें— "श्रीचामुण्डरायें सुत्तालें करवियलें." हा पुतळा चामुण्डराज नांवाच्या राजानें करविला: म्हणून हें वाक्य खालीं कोरलें आहे. याचा काल शके ९०५ म्हणजे....म्हणजे....सन किती रे दादा?"

दादा जरा घोंटाळ्यांतच पडला. 'शकाचे सन कसे करावयाचे?' पण बाबाच त्याच्या मदतीला धांवले. ते म्हणाले,

"अरे, जितके शके असतील त्यांत ७८ मिळवले कीं, सन तयार होतो. मग ९०५ शके म्हणजे—"

बाबा इतकें बोलताहेत तोंच यमू म्हणाली—

"म्हणजे ९८३ इ. स. हो ना?"

बाबा हंसले. ते पुढें म्हणाले, "यावरून हें वाक्य साधारणत: एक हजार वर्षांपूर्वीचें आहे असें म्हणावयाला हरकत नाहीं."

इतक्यांत आईकडून आंत बोलावणें आल्यानें सर्वचजण आंत गेले. दादा व यमू यांना चुटपुट लागली होती कीं, पुढली गोष्ट केव्हां कळेल. बाबांनींहि तें ताडलें व तें समजून ते म्हणाले—

"मुलांनो, यापुढली मराठीची हकीकत तुम्हांला मी जरूर सांगेन."

"पण केव्हां?" दादा व यमू एकदम म्हणालीं.

"अरे, जरा दमानें घ्या. तुम्हांला मराठीच्या नगरींतील सुंदर-सुंदर प्रासाद व भवनें मी हळूहळू दाखवणार आहे. बाबांनो, 'मराठीचिये नगरीं'—काय काय चिजा आहेत त्या क्रमवार गोष्टीरूपानें तुम्हांला मी जरूर सांगेन. अधीर होऊं नका. 'आधीं पोटोबा न् मग बिठोबा'—चला पाय धुवा."

## अभ्यास

१. लेखीभाषा व बोलीभाषा यांमध्यें फरक कोणता हें सांगा.

२. महाराष्ट्र भाषा बोलणाऱ्या प्रांताच्या चतुःसीमा सांगा.
३. खालील गोष्टी नीट ध्यानांत ठेवाः—
(१) पृष्ठमात्रा-पद्धत. (२) श्रवण-बेळगोळा-गोमतेश्वर. (३) शकाचे सन. (४) मराठी भाषा केव्हां प्रचारांत आली.
४. 'जेथें जेथें मराठी बोलणारा माणूस आहे तेथें तेथें महाराष्ट्र आहे, असें झालें पाहिजे' हा मजकूर पृष्ठमात्रा-पद्धतीनें लिहून दाखवा.

---

## दुसरें दालन

# नाणावलेले प्रधान हेमाडपंत

पंढरपूरची यात्रा जवळ आली होती. भाविक यात्रेकरूंच्या भजनी दिंड्या गांवावरून सारख्या पुढें जात होत्या. 'ग्यानबा-तुकारामाच्या' जयघोषानें गांवाबाहेरील रस्ते दुमदुमत होते. गांवांत संध्याकाळीं भजनाचा एकच कल्लोळ उठला होता. यमूच्याहि डोक्यांत 'ग्यानबा-तुकाराम' सारखा गोंधळ घालीत होता.

"हे ग्यानबा-तुकाराम कोण रे?" तिनें दादाला विचारलें.

"अग, ते हे आपले तुकाराम महाराज नाहींत का देहूचे अन्...."

दादा घोंटाळला सांगतां सांगतां! 'ग्यानबा' म्हणजे नक्की कोण हें त्यालाहि सांगतां येईना.

"चल आपण बाबांनाच विचारूं,—दादा म्हणाला व तीं बाबा-जवळ गेलीं. बाबांनीं उलगडा केला—ते म्हणाले—"ग्यानबा म्हणजे ज्ञानदेव महाराज आळंदीचे!"

पुढें एकादशीस दादा, ताई, बाबा व आई हीं पंढरपुरास गेलीं.

तेथें पांडुरंगाच्या मंदिरांतील सोळखांबीच्या दालनांत दर्शनाकरतां ते शिरताहेत तोंच त्या दरवाजाजवळ एक माणूस ओरडत होता—

" चौऱ्यांयशी लक्ष फेऱ्या चुकवण्याकरतां चौऱ्यांयशीच्या देवीला ओवाळा—या शिळेला पाठ लावा." लोकांची पाठ घांसण्यासाठीं मारे गर्दी उसळली होती.

" बाबा, ही चौऱ्यांयशीची शिला म्हणजे काय हो ?" यमूनें विचारलें. तेवढ्यांत ते सर्वजण सोळखांबीच्या आंत शिरले होते. तेथें विसांवून बाबा सांगूं लागले—

" ही चौऱ्यांयशीची शिला म्हणजे मराठी भाषेंतील एक जुना दगडावर लिहिलेला लेख आहे "—

" म्हणजे—आमच्या शाळेच्या इमारतींत बसवलेल्या दगडासारखा ?—" दादा विचारूं लागला.

" हो, तसाच !"

" मग त्या दगडावर काय कोरलंय ?"

त्या गर्दींत बाबांना नीट सांगतां येईना. ते म्हणाले, " आतां घरींच सांगेन."

घरीं आल्यावर बाबांनीं तो शिलालेखच दाखवला. तो असा—

" स्वस्ति श्री सकु ११९५ श्रीमुख संवत्सरे फागिनीपूर श्रीविठ्ठल देवरायासीं. तिसा सिंति फुलें दांडे. आचंद्रार्क चालावेया नाना भक्त मालियां दत्त पैकाचा विवरुः " इ०

" बाबा, ही तर देणगीदारांची यादी ! मग हिच्यावर पाठ घांसल्यानें पुण्य कसें मिळणार !" यमू हंसूं लागली.

" अग, अंधळी भक्ति म्हणजे ही अशीच ! घांसून घांसून या शिलेवरचीं सगळीं अक्षरें आतां पुसट्न गेलीं आहेत. तुम्हांला मी मराठीची हकीकत सांगेन म्हणालों होतों ना ? तेव्हां सांगितलेल्या

शके ९०३ च्या पुढल्या काळांतला हा शिलालेख आहे. हा शके ११९५ च्या सुमारास कोरला गेला ! म्हणजे सन १२७३ सालीं !

" पण बाबा, यावर हीं 'हेमाद्री' अशीं अक्षरें आहेत. ते हे हेमाद्री कोण हो ?" यमू म्हणाली.

" हे हेमाद्री म्हणजेच हेमाडपंत !"

" हेमाडपंत—कोण हेऽहे—ऽमा—डपंत " यमू हंसूंच लागली. " काय हें विचित्र नांव !"

" यमू, या हेमाडपंतांच्या नांवाला हंसूं नकोस. हा फार मोठा प्रधान होऊन गेला आहे—" बाबा म्हणाले.

" मग आम्हांला त्याची माहिती सांगा ना बाबा ?"

" हो, मी ती सांगणारच आहे. पण मराठी भाषेचा इतिहास सांगत असतां हेमाद्रीपंताच्या आधींच एका मोठ्या लेखकाची थोडीशी माहिती मी आधीं सांगतों न् मग हेमाद्रीची माहिती !"

" हे आधींचे लेखक कोण ?"

" हे लेखक म्हणजे प्रख्यात संत व मराठीचे आद्यकवि श्री**मुकुंदराज** हे होत."

" यांनीं कोणकोणते ग्रंथ लिहिले आहेत ?—हे कोठें राहात होते हें सांगा ना ?"

" यमू, तुझी आपली घाईच ! थोडी दमानें घेशील ना ? हे मुकुंदराज शके १०४०—४५ चे सुमारास जन्मले असावेत—"

" पण बाबा, मुकुंदराज हे जर पहिले कवि तर त्यांच्या आधीं कुणीच का कांहीं लिहिलें नव्हतें ?" भीत भीत पण मध्यें दादानें शंका विचारलीच !

बाबांनीं न रागावतां त्याच्या शंकेचें निरसन केलें. ते म्हणाले—"अरे दादा, मुकंदराजाच्या पूर्वीं ग्रंथ कोणीं लिहिलें नव्हतें असें

नाहीं. स्त्रियांची गाणीं, लोककथा, कहाण्या इत्यादि वाङ्मयहि पुष्कळ लिहिलें गेलें आहे. तूं परवां 'मायामच्छिंद्र' सिनेमा पाहिलास ना? त्या मच्छिंद्रनाथाचा शिष्य गोरखनाथ व गहिनीनाथ यांनींहि मराठींत कांहीं ग्रंथ लिहिले आहेत. 'गोरक्ष-गीता' हें त्या ग्रंथाचें नांव, मच्छिंद्रनाथ-गोरखनाथ यांच्या नाथपंथांतीलच श्रीमुकुंदराज हे एक होते."

"पण हे राहणार कोणत्या गांवचे?"

"हे राहणारे नागपूर प्रांतांतील **खेडले** या गांवचें. 'वैन्यगंगेचे तीरीं मनोहर अंबा नगरीं' त्यांचे प्रसिद्ध गुरु हरिनाथ यांची समाधि आहे."

"यांनीं कोणकोणते ग्रंथ लिहिले आहेत हो बाबा?"

"यांचा 'विवेकसिंधू' हा फार प्रख्यात ग्रंथ आहे. अगदीं म्हातारपणीं त्यांनीं हा ग्रंथ लिहिला. त्यांनींच चक्क म्हटलें आहे कीं, 'मला श्वासोच्छ्वास सुद्धां घेववत नाहीं, अशा वेळीं ह्या ग्रंथाचा गदारोळ मीं मांडला आहे. 'शके दाहाशे दोहोत्तरू' या सालीं 'नृसिंहाचा बल्लाळ। ते याचा कुमरु **जयंतपाळ**। तेणें करविला रोळ। ग्रंथरचनेचा।' असो. त्यानें आणखी पवनविलास, परमामृत, पंचीकरण, मूलस्तंभ वगैरे वेदांतावर पुष्कळ ग्रंथ लिहिले आहेत."

यमू या माहितीस कंटाळत चालली होती हें पाहून बाबा तिला उद्देशून म्हणाले—"हें बघ, आतां मी तुला हेमाडपंताची माहिती सांगणार आहे. लक्ष आहे का तुझें?"

"हो तर!" यमूला पुन्हा हुशारी आली "हे हेमाडपंत कोण, कुठले—?"


"हो, तें सर्वच मी तुला सांगतोंय."

"मग सांगा ना! सांगतों, सांगतों असेंच सारखें करतां."

" यमे " दादानें मध्येंच दटावलें. " कुणाला बोलते आहेस तूं ? " पण बाबाच मध्यें पडले–ते म्हणाले, " दादा, तिला ऐकायची घाई झाली म्हणून ती बोलली हो ! " मग यमूकडे वळून ते म्हणतात—

" हे हेमाडपंत देवगिरीला, म्हणजे सध्यांचें दौलताबाद आहे ना, त्या गांवचे राजे जे जादव, त्यांच्या पदरीं प्रधान होते. यांना 'श्रीकरणाधिप' अशी पदवी होती."

" खरंच ! म्हणजे हे प्रधान होते ? आपल्या बाळासाहेब खेरांसारखे ? "



हेमाडपंती देवालय

" अग नव्हे. त्यांच्यापेक्षां सुद्धां मोठे ! " दादा म्हणाला.

" या हेमाडपंतांनीं आपल्या महाराष्ट्रांत तीन नव्या गोष्टी प्रचारांत आणल्या."

" त्या कोणत्या ? "

" पहिली म्हणजे—आपण जी बाजरी खातों ना ? ती बाजरी पूर्वीं आपल्याकडे पिकत नव्हती. यांनीं तिचें बीं दुसरीकडून आणवून पेरविलें व म्हणून आपण सध्यां बाजरीची भाकरी खातों."

" हें नव्हतं मला माहीत ? " दादा म्हणाला, " मला वाटलें कीं, हेमाडपंती देवळाचा संबंध तुम्ही सांगतां कीं काय ? "—

" ती तर त्यांनीं केलेली दुसरी गोष्ट ! नुसत्या दगडांनीं—मोठमोठ्या शिला घेऊन त्या अशा रीतीनें बसवायच्या, कीं त्या कधींहि तोल जाऊन पडूं नयेत ! "

" मग त्यांत काय मोठेसें ? "

" अग, हे दगड बसवतांना चुन्याचा उपयोग करावयाचा नाहीं ही तर गंमत आहे ! "

" असं बांधलेलें देऊळ कोणतें हो बाबा ? "

" आपण पाहिलेलें पंढरपूरचें देऊळ असेंच बांधून पुरें केलें आहे. तूं नाहीं पाहिलेंस ? जाऊं दे, पुनः पाहा म्हणजे कळेल तुला. आणखीहि पुष्कळ हेमाडपंती देवळें आहेत आपल्याकडे. या हेमाडपंतानें केलेली तिसरी प्रसिद्ध गोष्ट म्हणजे त्यानें 'मोडी' लिपि लिहिण्याची प्रथा मराठींत आणली."

" म्हणजे त्यापूर्वीं मोडींत लिहीत नसत म्हणावयाचें ! " दादानें प्रश्न केला.

" हेमाडपंतानें ही लिपि स्वतःच शोधून काढली कीं, दुसऱ्या कुठून आणली याबद्दल वाद आहे. कोणी म्हणतात, त्यानें ती लंकेहून आणली तर कोणी म्हणतात, त्यानें ती उत्तर हिंदुस्थानांतील मौर्य राजांकडून आणली ? "

" तुमचें काय मत आहे बाबा ? "

" माझेंच मत विचारशील तर मला कै. बि. ल. भावे यांचेंच म्हणणें जास्त पटतें."

" कोणतें बरं तें ! "

" तें असें कीं, आपल्या बाळबोध अक्षरांतच थोडा फेरफार करून त्यानें ही नवी लिपि बसवली."

" आपण बाळबोध लिपींतील अक्षरें वर रेघ काढून, वरून खालीं अशीं लिहितों. अक्षरें चौकोनी व काना-मात्रा काढण्याच्या प्रत्येक वेळीं लेखणी उचलतों व मग लिहितों. म्हणून बाळबोध लिहावयास फार वेळ लागतो. हेमाडपंतानें एवढेंच केलें कीं, अक्षराचे काने व मात्रा तोडून न लिहितां त्यांना लपेट घेऊन त्या वरच्या रेघेस मिळवल्या. अशानें ठिकठिकाणीं लेखणी उचलावी लागत नाहीं व अक्षर या लपेटीनें सुंदर व जलद काढतां येऊं लागलें."

यमूला यांतील अगदीं थोडासाच भाग कळला; पण दादानें मात्र जणूं कांहीं कळल्यासारखी मान हलवली. कोण जाणे त्याला कळलें कीं नाहीं तें ! यमूनें मग दुसऱ्याच विषयास तोंड फोडलें— ती म्हणाली, " पण बाबा, मराठी वाङ्मयांत त्यांनीं काय केलें ? "

" खरंच, तें राहिलें कीं ! " बाबा हंसत म्हणाले, " या हेमाडपंतानें 'लेखन-कल्पतरू' या नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे असें म्हणतात. यांत पत्रांचे मायने लिहिलेले आहेत."

" मायने म्हणजे—? "

" मायने म्हणजे पत्र लिहिण्यापूर्वीं, ज्याला पत्र लिहावयाचें त्याला उद्देशून लिहावयाचा मजकूर. समज, तूं मला पत्र लिहावयाचें ठरवलेंस तर कशी सुरुवात करशील ? "

" मला नाहीं कळत ! "

" दादा—तूं सांग रे "—दादाकडे वळून बाबा म्हणाले, दादानें सांगितलें—" प्रथम मी 'ती॥ बाबांचे चरणीं त्रिकाल मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार वि. विज्ञापना' असें लिहीन."

" यालाच मायना म्हणतात."

" म्हणजे असलेच मायने का त्या पुस्तकांत आहेत ? "

" हो असलेच—"

" सर्व लोकांस लिहावयाचे मायने त्यांत दिलेले आहेत. याशिवाय हेमाडपंतानें कांहीं 'मेस्तकें' हीं लिहिलीं आहेत. एक 'नीतिबोध' नांवाचें पुस्तकहि त्यानें केलें होतें असें म्हणतात."

बाबा इतकें बोलून थांबले, त्यावर दादा म्हणतो—

" मला वाटतें बाबा, या हेमाडपंतानें मराठीला पुस्तकरूपानें कांहीं जास्त मदत केली नाहीं; तरी पण इतर गोष्टी त्यानें फार महत्त्वाच्या केल्या आहेत."

" बरोबर म्हणालास. अरे, यानें मराठींत पुस्तकें लिहिलीं नसलीं तरी हा प्रधान असतांना यानें मराठी भाषेच्या भरभराटीकरतां फार प्रयत्न केले. या हेमाडपंतासारखे प्रधान महाराष्ट्रास फार थोडे लाभले आहेत. हा प्रधान वारल्यावर लवकरच जाधवांचें राज्य लयास गेलें ! "

" जाधवांचें राज्य कोणी जिंकलें बाबा ? "

" अल्लाउद्दिनाची स्वारी होऊन त्यानें हें देवगिरीकर यादवांचें राज्य शके १२१७ च्या सुमारास जिंकून घेतलें व मराठी भाषेचा एक मोठा आधार नाहींसा झाला ! ! "

यमू व दादा यांनाहि वाईट वाटलें व तें पाहून बाबा म्हणाले, "असें वाईट वाटून घेऊं नका. मराठीचा अस्तकाळ कांहीं त्यानें

झाला नाहीं. ज्ञानेश्वरासारखा दैदीप्यमान हिरा हें राज्य लयाला जाण्यापूर्वी पांच-सहा वर्षें होऊन गेला होता व त्यापूर्वीसुद्धां दुसरे कांहीं मराठीचे मोठे उपासक होऊन गेले आहेत—"

"मग त्यांची माहिती आम्हांला केव्हां सांगणार ?"

"सांगेन–पण आतां नको. तुम्ही कंटाळला असाल. पुढच्या खेपीं एक सुंदर गोष्टच मी तुम्हांला सांगेन. तुम्हीं कधीं न ऐकलेली अशी ती आहे."

"बाबा, कुणाची हो गोष्ट ?" यमू म्हणाली.

"अग कुणाची ती सांगितली, कीं तुझी गोष्ट ऐकण्याची इच्छा वाढेल अन् मग गोष्ट सांगा म्हणशील. तें कांहीं नको–मी सांगेन म्हटल्यावर सांगेन–"

यावर यमू व दादा गप्प बसले. त्यांनाहि आज खूपच माहिती मिळाली होती.

### अभ्यास

१. चौऱ्यांयशीच्या शिलेवर कोणता मजकूर आहे ? तिच्याविषयीं साद्यंत माहिती पंढरपुरास गेल्यावर स्वतः मिळवा.

२. हेमाडपंत कोण होते ? त्यांनीं केलेल्या सुधारणा सांगून त्यांची अलीकडल्या मोठ्या माणसाशीं तुलना करा.

३. मुकुंदराज यांना 'आद्यकवि' कां म्हणतात ?

४. माहिती पहा—

(१) मोडी लिपि (२) लेखनकल्पतरू (३) मायने.

५. या प्रकरणांतील पहिला परिच्छेद मोडी लिपींत सुवाच्य लिहून काढा.

## तिसरें दालन

# महात्मा चक्रधरस्वामी

आजचा दिवस केव्हां उजाडतो असें यमूस होऊन गेलें होतें. सकाळपासून ती बाबांना बजबजावून सांगत होती कीं, " बाबा, आम्हांला आज गोष्ट सांगायचीय् संध्याकाळीं अं ? "

" हो, माहीत आहे मला-" बाबा म्हणाले.

" नुसतें माहीत आहे असें नाहीं चालायचें-सांगायलाच हवी." तोंडाचा चंबू करीत यमू सांगूं लागली.

" हो-हो-हो म्हटलं ना मीं- " थोडेंसें दटावूनच बाबा म्हणाले, " मीं नाहीं म्हटलं का ? "-अन् बाबा हपिसांत गेले.

शाळा सुटल्यावर यमू घरीं आली. तिच्याबरोबर तिनें एक मैत्रीण पण आणली होती. बागेंत खुर्च्या वगैरे टाकल्या होत्या. पण तिथें एका फुलाच्या ताटव्याजवळ वाळूंत सतरंजी टाकूनच यमू मैत्रिणीसह बसली- दादा आला न् बाबाहि ठरल्याप्रमाणें आले.

" हवा कशी काय पडली आहे रे आज ? " बाबा दादाकडे वळून म्हणाले. त्यांनीं बरोबर आज दोन चार बुकें सुद्धां आणलीं होतीं. यमूचें लक्ष बुकांकडे होतें- हवेकडे नव्हतें. म्हणून तिला बाबांचा हा प्रश्न थोडासा बाहेरचा वाटला. पण मैत्रिणीदेखत उतावीळपणा दिसायला नको म्हणून ती कांहीं बोलली नाहीं. बाबा जे थांबले होते, ते यमूच्या आईची आज वाट पहात होते. कारण आई आल्याबरोबर त्यांनीं गोष्टीस सुरुवात केली. ते म्हणाले-

" आज मी तुम्हांला एका मोठ्या पंथसंस्थापकाची माहिती सांगणार आहे—"

पुढचें बोलणें देखील न ऐकतां यमू उतावळिपणानें मध्येंच म्हणाली—

" पण तुम्हीं आम्हांला चक्रधरस्वामींची गोष्ट सांगावयाचें कबूल केलें होतें– ती आधीं सांगा अन् नंतर त्या पंथसंस्थापकाच्या माहितीचें पाहूं— "

दादा रागावला, आईनें यमूकडे पाहिलें अन् बाबा थोडा वेळ थांबले—यमूच्या मैत्रिणीला अवघडल्यासारखें झालें–अन् मग यमू-लाहि वाटलें कीं, आपण उगीचच घाई करतों आहों. कदाचित् हेच पंथसंस्थापक चक्रधरस्वामी असतील, अन् होतीहि गोष्ट तशीच!

बाबांनीं पुन्हा सुरू केलें.

—" सुमारें ८०० वर्षांपूर्वीं गुजराथ प्रांतांत एक राजा राज्य करीत होता. त्या वेळीं महाराष्ट्र देशांत जाधवांचें राज्य होतें. त्या गुजराथमधील राजाचें नांव होतें त्रिमल्लदेव; अन् त्याचा प्रधान होता विशालदेव नांवाचा! या त्रिमल्लदेवास कांहीं पुत्रसंतान नव्हतें. समज दादा, राजाला पुत्रसंतान नसलें तर राजा मेल्या-वर त्याच्या गादीवर कोण बसेल?–" बाबा दादाकडे वळून म्हणाले.

" मुलगा नसेल तर दत्तक घ्यावा त्याच्या राणीनें. कोल्हापुरचे राजाराममहाराज वारल्यावर नाहीं का आतां दत्तक कोण घ्यावा, अशी कोल्हापुरला गडबड चालली!—"

" खरं आहे. पण इथें या त्रिमल्लदेवानें दत्तक कोणी घेतला नाहीं; पण त्याचा प्रधान जो विशालदेव त्यालाच त्यानें आपलें सर्व राज्य दिलें!"

" म्हणजे प्रधानाचा राजा झाला!"

" हो, तसेंच. पण या बिशालदेव प्रधानाला तरी कुठें मुलगा होता ? त्याची बायको माल्हणदेवी ही मुलगा होण्यासाठीं श्रीदत्तात्रयाची उपासना करीत होती. देव पावला व या जोडप्याला पुढें एक मुलगा झाला ( सन ११५३ चा सुमार ). त्याचें नांव त्यांनीं हरपाळदेव ठेवलें. हा हरपाळ देखणा व हुशार होता. एकुलता एक मुलगा. त्याचे लाडाहि फार होत असत. कांहीं कांहीं वेळेला अति लाड झाला म्हणजे मुलें बिघडतात. होय कीं नाहीं ?– अशा लाडामुळें हरपाळ वाईट लोकांच्या नादीं लागला. घरची फारशी पर्वा न करितां तो बाहेर बाहेरच राहूं लागला. त्याला वाईट व्यसनें लागलीं. जुगार खेळण्याचा त्याला फार छंद जडला. या द्यूतापायीं पुष्कळ राजे नागवलेले आहेत. पूर्वींच्या काळीं राजेलोकांत या द्यूत खेळण्याचें बडें प्रस्थ होतें. पुराणांतून आपण ऐकतोंच कीं नाहीं—"

" हो. पांडव व नळराजा हे द्यूतामुळेंच त्रासले गेले होते."

" बरोबर आहे यमे तुझें. हा हरपाळ द्यूतामुळें बिघडत चालला. त्याला दिलेला सर्व पैसा द्यूतांत हरून बसला. त्याचें लग्नहि या वेळीं झालें होतें. त्याच्या बायकोचें नांव होतें कमलादेवी. या कमलादेवीजवळ मग तो पैसे मागूं लागला. पण तिच्याजवळ किती असे पैसे असावयाचे ? तेवढेहि यानें घेतले व ते द्यूतांत हरवले. मग तो बायकोजवळ तिचे दागिने मागूं लागला. ती कशी देईल दागिने ?

ती म्हणाली, 'हे दागिने माझ्या बापानें लग्नांत मला दिले आहेत. ते माझे आहेत. त्यांवर तुमचा हक्क चालणार नाहीं.' आणि तिनें हा वाईट नाद सोडून देण्याबद्दल परोपरीनें विनवून पाहिलें; पण याचा आपला एक मुद्दा. 'मला दागिने हवेत अन्

ते तूं दिले पाहिजेस.' वाद वाढत चालला. होतां होतां हें प्रकरण पेटत चाललें. कमलादेवी देखील विचार करूं लागली कीं—




'असेच दागिने आपण देऊं लागलों तर यांचा हा नाद सुटावयाचा तरी कधीं ? पेक्षां आपणहि हट्टाला पडून एकदां पहावेंच, म्हणून एके दिवशीं त्यानें पुन्हा दागिने मागितले असतां ती साफ म्हणाली—

'यापुढें मी दागिने तुम्हांस देणार नाहीं.'

हरपाळ म्हणाला—'तूं जर देणार नसलीस तर मी तूं दागिने देईपर्यंत श्रीकृष्णाशपथ अन्न घेणार नाहीं.'

कमलादेवी—'मग मीहि शपथ घेऊन सांगतें कीं, मी ते देणार नाहीं.'

अशा रीतीनें तीं दोघें त्या दिवशीं जेवलीं नाहींत. मग हें वर्तमान राजास कळलें व आईबापांनीं येऊन त्या दोघांची समजूत घातली व बाबापुता करून जेवूं घातलें. हरपाळास कांहीं पैसे सुद्धां दिले. हें प्रकरण तितक्यावरच मिटलें. पण त्या दिवसापासून हरपाळाचें मन संसारांतून उडालें व तो देवधर्म करूं लागला. असें करतां करतां त्याच्या मनांत आलें कीं, रामटेकला जाऊन श्रीरामाचें दर्शन घ्यावें. पण रामटेक हें गांव होतें जाधव राजांच्या ताब्यांत. तेव्हां जाणें कसचें घडतें ? त्यानें वडिलांस विचारून पाहिलें, आईसहि विचारलें. पण तोंड निघेना. याचा तर हट्ट कीं, जावयाचेंच ! तेव्हां त्याची आई माल्हणदेवी इनें युक्ति काढली कीं, राजपुत्र म्हणून न पाठवतां सडा प्रवासी म्हणून त्यानें एक दोन गडी घेऊन गुपचुपपणें जावें व त्याप्रमाणें तो निघाला. त्याचें मन अत्यंत खिन्न असल्यानें बरोबरीच्या गडीमाणसांशीं वाटेनें तो कांहीं बोलत नसे. असा त्याचा प्रवास सुरू झाला. पण वाटेंत एके ठिकाणीं मुक्कामाला असतांना हरपाळ व त्याचीं माणसें यांची चुकामूक झाली व हरपाळ रामटेकच्या ऐवजीं ऋद्धिपूर म्हणून एक गांव होतें तेथें आला."

"अन् मग तो पुन्हा आईबापांच्याकडे गेला कीं नाहीं ?"

"नाहीं–पुन्हा परत आईवडिलांकडे जावेंसेंच त्याला वाटेना. त्याच गांवीं गोविंदप्रभु नांवाचा एक अत्यंत विद्वान् गृहस्थ होता; त्याच्याजवळ हरपाळ राहिला. पुढें त्याच विद्वानानें हरपाळास दीक्षा दिली. त्याचें पहिलें नांव बदलून **श्रीचक्रधर** असें ठेविलें." बाबांनीं थोडासा विसांवा खाल्ला. यमूहि चळवळ करूं लागली. तिला वाटलें चक्रधरस्वामींची गोष्ट संपली–पण बाबांनीं तिला खूण करून खालीं बसविलें. ते म्हणाले, "अजून तर चक्रधरस्वामींची खरी कथा सुरू व्हावयाची आहे."

"मला वाटलें संपलीच." यमू म्हणाली.

"अग, अजून त्यांनीं पुढें दोन बायका केल्या आहेत ती हकी-कत तर पुढेंच यावयाची आहे. चक्रधर या नांवानें वावरत असतां फिरत फिरत चक्रधर एकदां औरंगल या गांवीं आला. त्या गांवीं कमलाकर नाईक नांवाचे ब्राह्मण गृहस्थ होते. त्यांना हंसांबा नांवाची एक मुलगी होती. ती अतिशय हुशार व शिकलेली होती. पण ती शिकलेली म्हणून तिच्याशीं कोणीच लग्न करायला तयार होईना. पुढें तिच्याशीं चक्रधरानें लग्न केलें व तीं दोघें पुन: संसारांत पडलीं."

"काय तरी बाई!" इतका वेळपर्यंत गप्प बसलेली आई उद्गारली, "पुन: कशाला संसार?" पण बाबांनीं लक्ष नाहींसें दाखवून पुढेंच सांगणें चालू केलें.

"पुन: केलेला हा संसार फार दिवस टिकला नाहीं. चक्रधराला वैताग येऊन त्यानें एके दिवशीं तेथूनहि पोबारा केला."

"म्हणजे?"

"म्हणजे तो तेथून हंसांबास टाकून दुसरीकडे निघून गेला; तों वाटेंत त्याला 'रामदेवराव दरणा' नांवाच्या एका राजानें पाचारण करून आपल्या घरीं नेलें व त्याची बरदास्त यथास्थित राखिली. कांहीं दिवसांनीं रामदेवराव यानें श्रीचक्रधरास विनंति केली कीं, 'महाराज, मला एक मुलगी आहे. तिचें नांव उमादेवी. तिला तुम्ही पदरांत घ्या.' पण चक्रधर ऐकेना. तो म्हणे, 'मी तयार नाहीं.' कारण मागच्या दोन ठिकाणच्या लग्नाचा वाईट अनुभव होताच. पण राजाच्या फार मोठ्या आग्रहाला शेवटीं तो बळी पडला; व त्यानें उमादेवीशीं लग्न केलें. हें त्याचें तिसरें लग्न. चक्रधरानें उमादेवीचें नांव 'गौरी' असें ठेविलें व त्याचा हा तिसऱ्यांदा संसार सुरू झाला!"

"बाई-बाई ! तिच्याशीं तरी हा नीट वागला का ?" आईनें मध्येंच विचारलें.

"तो विरक्त बैरागी. त्याचें कसलें मन रमतें आहे संसारांत !"

"मग लग्न कशाला करावें ?"

"त्याला लोकांनीं तरी इतका आग्रह कां करावा ? पण असो; वरून वरून तरी त्याचें ठीक चाललें होतें. गौरीला फक्त कळलें कीं महाराज विरक्त व उदासीन आहेत. तिनें खूप विनवण्या करून पाहिल्या, पण त्याचें उदासीनत्व जाईना. एके दिवशीं चंद्रभागा नदींत स्नान करण्याकरितां चक्रधर गेला असतांना एका डोहांत चुकून तो गेला व नदीच्या धारेंतून त्याला वर येतां येईना. तीरावरच्या लोकांनीं खूप प्रयत्न केला, पण चक्रधर आटपेना. तेव्हां एकच आरोळी झाली कीं, 'महाराज बुडाले, महाराज बुडाले' राजवाड्यांत गौरी होती. तिला हें वर्तमान कळतांच तिनें तीन-तीनदां चौकशी केली कीं, 'खरेंच महाराज बुडाले का ?' तर जेव्हां तिला 'खरेंच' असें कळलें तेव्हां ती एकदम धाडकन् मूर्च्छित पडली व शुद्धीवर आणावयाच्या आंत तिचे प्राणहि गेले होते !"



" पतिव्रता होती बाई ती." आईनें म्हणत डोळ्यांला पदर लावला. यमू व मैत्रीणाहि स्तब्ध होत्या.

—" चमत्कार तर पुढेंच आहे," बाबा म्हणाले—
" इकडे ही मेली न् तिकडे चक्रधर बचावून आला. नंतर त्याला गौरी मेलेली कळलें. त्या धक्क्यानें त्याला वेडच लागल्यासारखें झालें व तो विदेही स्थितींत भटकूं लागला. पुढें त्याला भोगावती नदीचे कांठीं श्रीदत्तात्रेयाचें साक्षात् दर्शन झालें. त्यानें मग संन्यासदीक्षा घेतली ( शके ११८५ ); व तो तेथून पुढें लोकांना उपदेश करूं लागला. त्यानंतरच्या काळांत त्यानें मग स्वतंत्र पंथस्थापनाच केली. त्या पंथासच 'महानुभाव पंथ' असें नांव पडलें." बाबा थांबले. जणूं कांहीं बाबांना आज जें सांगावयाचें होतें तें संपलेंच होतें! पण यमूच्या चेहऱ्याकडे पाहून ते पुन्हा म्हणतात—

" यमे, चक्रधरस्वामींनीं धर्म कसा स्थापन केला, त्यांचा धर्म कसा होता इत्यादि माहिती आज नाहीं बुवा आपण सांगणार. सांगूं पुनः केव्हां तरी, आतां मला प्यायला पाणी जरा आण पाहूं आंतून—"

यमूहि झटकन् आंत गेली.

### अभ्यास

१. चक्रधरस्वामींच्या गोष्टीप्रमाणेंच आणखी एका महात्म्याला वैराग्य आलें होतें, ते कोण? त्यांची व यांची तुलना होत असल्यास करा.
२. 'तीन लग्नें झालीं तरी चक्रधरस्वामींचें मन संसारांत रमलें नाहीं' मग तें कशांत रमलें व कां? तें स्पष्ट सांगा.
३. चक्रधरमहाराजांचें नदींत बुडणें व गौरीचें प्राणोत्क्रमण यावर एक सुंदर नाट्यप्रवेश रचा व तो शाळेच्या संमेलनप्रसंगीं करून दाखवा.

## चौथें दालन

# म्हातारी शोधास निघाली

" गेल्या खेपेस श्रीचक्रधरस्वामींची गोष्ट तुम्हांला सांगितली. श्रीचक्रधरस्वामींनीं एका नवीन धर्माची स्थापना केली—"

" पण त्या धर्माचें नांव नाहीं सांगितलेंत बाबा ? "

" हो, आज तेंच सांगावयाचें आहे. त्यांचा धर्म कसा होता, त्यांचीं तत्त्वें कोणतीं, त्याचा प्रसार कोणी केला, इत्यादि माहिती मी आज तुम्हांला सांगणार आहे."

यमूची चुळबूळ चाललीच होती. तिच्याकडे पाहून बाबा हंसले, तेव्हां यमूला धीर येऊन ती म्हणाली—

" बाबा, पण आधीं चक्रधरस्वामींची गोष्ट तुम्हीं अर्धवट सोडली, त्यांचें पुढें काय झालें तें सांगा."

" नाहीं तरी यमूला नुसत्या गोष्टीच ऐकायला पाहिजेत—" दादानें टोमणा दिला.

" असूं दे आम्हांला—"

बाबांनीं चक्रधरस्वामींचीच गोष्ट पुरी केली. ते म्हणाले—

" श्रीचक्रधरस्वामींनीं ऋद्धिपुरास येऊन गोविंदप्रभूंची दीक्षा घेतली व धर्मप्रसार सुरू केला. त्या वेळीं त्यांचें वय ११० वर्षांचें होतें असें म्हणतात—"

" काय ११० वर्षें ? "

" हो ११० वर्षें ! काय आश्चर्य आहे त्यांत ! अरे, आमच्याकडले लोक पूर्वीं सहज १००–१०० वर्षें जगत असत–आणि आतां ? आतां आपल्या लोकांची जगण्याची सरासरी २७ वर्षांची

आहे असें म्हणतात.—म्हणजे आयुष्याच्या ऐन उमेदींतच हल्लींच्या बहुतेकांना आपला इथला ग्रंथ आटोपावा लागतो. असो. श्री-चक्रधरस्वामींनीं वयाच्या ११० व्या वर्षीं धर्मप्रसार करण्यास



सुरुवात केली व असा धर्मप्रचार नऊ वर्षे केल्यावर ते वयाच्या ११९ व्या वर्षी बद्रीकेदारच्या यात्रेस हिमालयांत गेले. त्यांच्या मागोमाग त्यांची निष्ठावंत शिष्यमंडळीही पण गेली होती. पण त्यांना सर्वांना टाळून हे स्वामी हिमालयांत गेले ते पुन्हा दृष्टीस पडले नाहींत !"

"अगबाई, म्हणजे त्यांचें काय झालें मग !" यमूनें घाबरून प्रश्न टाकला.

"काय झालें हें कोणासच कळलें नाहीं ! त्यांचा नागार्जुन नांवाचा शिष्य त्यांचे मागोमाग जाववेल तितकें गेला होता. शेवटीं तोसुद्धां एका ठिकाणीं शोध करतां करतां बेशुद्ध होऊन पडला. त्याला जवळ जवळ वेडच लागलें होतें स्वामींचें ! त्या वेड्याचा शोध करीत महदंबा नांवाची एक चक्रधरांची शिष्या पाठोपाठ आली होती. ती 'दरें दरकुटें' शोधीत चालली. एका दरीच्या आड "चक्रधरमहाराज", "चक्रधरमहाराज" याप्रमाणें ओरडणारा श्रीनागदेवाचार्य तिच्या दृष्टीस पडला. तिनें त्याला सावध केलें व मग तीं दोघें हळूहळू ऋद्धिपुरास आलीं व मग श्रीचक्रधरस्वामींची दुश्चित वार्ता सर्वांना समजली ! श्रीचक्रधर-स्वामींच्या मागून त्यांचे गुरुजी श्रीगोविंदप्रभु ऊर्फ 'गुंडमबुवा' हे स्वर्गवासी झाले. त्यांचें वय अवतारसमाप्तीचे वेळीं १२० वर्षांचे-वर होतें असें म्हणतात !"

"मग या गोविंदप्रभूंची माहिती थोडी आम्हांस सांगा कीं."

"हो तर ! पण त्यांच्याविषयीं मी तुम्हांस थोडीच माहिती पुरवूं शकेन. त्यांच्या जन्माची वगैरे माहिती श्रीऋद्धिपूरचरित्रांत दिली आहे. तुम्हांला ती जुनी भाषा कळावयाची नाहीं पण मासला म्हणून थोडी इथें देतों. त्याचा आपल्या आत्तांच्या मराठींत तर्जुमा करून पहा.

"ऋद्धिपूरप्रांतीं अवतारू: स्वीकारू: ऋद्धिपुरा नांदिगांवा माझारि: दिढा गांउवाचेनिमानें: आधागांवु वाचेनि मानें: माडेरें: काटसुरे खेडें नाव गव्हाण: तेथ कागवां ब्राह्मणाचां घरीं: श्रीगोविंद्प्रभू सर्वज्ञ: अवतारू स्वीकारिला: सर्वज्ञां-चेया मातेया पितेयासी: बहुत लेंकरूवें जालीं: परि: तियें जितीचिना: मग आघवेया सेवटीं: सर्वज्ञ अवतरले: मग मातापितेनि: सर्वज्ञातें भणितलें: बा दगडु गुंडा: वाढे ऐसा वाढ: श्रीगोविंद्प्रभु: गुंडोबा ऐसें नांव ठेविलें:" इ० इ०

—ऋद्धिपूर-चरित्र.

वर दिलेल्या उताऱ्यांत श्रीगोविंद्प्रभूंच्या जन्मकाळची हकीकत दिली आहे. ती सरळ मराठींत लिहून काढा. पाहूं या जमते का काय तें? थोडक्यांत श्रीगोविंद्प्रभूंचें चरित्र सांगावयाचें म्हणजे तें असें कीं—

ऋद्धिपुराजवळ (हल्लींचें मध्यप्रांतांतील इलिचपूर) काठसुरे गव्हाण नांवाच्या गांवीं अनंत नायक नांवाच्या ब्राह्मणाचे हे चिरंजीव. त्या ब्राह्मणाचीं मुलें जगत ना म्हणून त्यानें या मुलाचें नांव गुंडोबा, धोंडोबा यांपैकीं ठेविलें.—"

"असें कां?"

"जर मुलें जगत नसलीं तर मुलांचें नांव एक तर ठेवीत नाहींत व ठेवलेंच तर असें 'दगड्या, धोंड्या' असें ठेवतात म्हणजे तो मुलगा जगतो अशी लोकांची समजूत आहे! 'धोंड्यासारखा वाढ' म्हणून गोविंद्प्रभूला 'गुंड्या' हें नांव ठेवलें. वयाच्या सातव्या वर्षीं त्याचें मौंजीबंधन झालें. पुढें त्यांनीं पुष्कळच चमत्कार केले. तेव्हां अवतारी पुरुष म्हणून त्यांची प्रसिद्धि झाली. शके १२०८ मध्यें हे ऋद्धिपुरास स्वर्गस्थ झाले."

" आतां आम्हांला त्या पंथांचीं तत्त्वें सांगा ना !" दादानें विचारलें.

बाबा म्हणाले– " या पंथाचें नांव सर्व लोकांस माहीत आहे. तें '**महानुभाव**' असें आहे. याच पंथाला अच्युत, जयकृष्णीय व महात्मा अशींही दुसरीं नांवें आहेत. चक्रधरानंतर या धर्माचा प्रसार नागदेवाचार्य यांनीं केला. त्यानंतर कवीश्वर व परशराम यांनीं केला. पण पुढें मुख्य गादीच्या तेरा उपशाखा होऊन हा धर्म वाढला. आश्चर्याची गोष्ट अशी कीं, यांपैकीं श्रीकृष्णमुनी यांनीं या पंथाचा पंजाबांत प्रचार केला व सध्यां पंजाबांत यांचा पंथ मोठा आहे. यांचे मूळ ग्रंथ मराठींत लिहिलेले असल्यानें पंजाबी लोकांना मराठी भाषा ही संस्कृताप्रमाणें पूज्य वाटते व अशा तऱ्हेनें मराठी भाषेचा झेंडा या महानुभाव लोकांनीं पंजाबपर्यंत मिरवीत नेला आहे."

" पण बाबा, हे लोक आपला धर्मप्रचार तिकडे कोणत्या भाषेंत करतात ?"

" अर्थात् मराठींतून ! श्रीचक्रधरस्वामी जें जें बोलले तें तें सर्व महींद्रभट नांवाच्या शिष्यानें सूत्ररूपानें लिहून ठेवलें आहे. त्यास " सिद्धांतसूत्रपाठ " म्हणतात. वेदांप्रमाणें चक्रधराच्या तोंडांतून पडलेलीं वाक्यें यांनीं जशींच्या तशीं त्या भाषेंत अजूनपर्यंत ठेवलीं हें आश्चर्य होय !"

" हें त्यांनीं कसें केलें ? "

" असें करण्याकरितां त्यांनीं एक अजब युक्ति उपयोगांत आणली. "

" ती कोणती ? "

" ज्याप्रमाणें लोकांना कळूं नये म्हणून यमे, तूं ' चलाम चकरीभा चदे ' अशी चची भाषा बोलतेस, त्याप्रमाणें त्यांनीं

मराठी लिपीच बदलून लिहावयास सुरुवात केली. अशा त्यांनीं पांच सात नवीन लिप्याच तयार केल्या आहेत. मूळ अक्षरांत थोडासा फरक करून बालबोध लिपींतील 'ट' बद्दल कधीं 'त' तर कधीं 'ठ' अशीं अक्षरें योजून लिहावयाचें म्हणजे इतरांना तें कळावयाचें नाहीं. या लिपीचे नमुने मी तुम्हांला पुढल्या खेपेस दाखवीन.

" अन् महानुभाव पंथाचीं तत्त्वें नाहीं सांगितलींत तीं ?" यमूनें विचारलेंच.

" सांगणार होतों, पण आतां यमे, मला थोडेंसें बाहेर जावयाचें आहे. तेव्हां पुनः केव्हां तरी सांगितलें तर नाहीं का चालावयाचें ?"

" चालेल तर काय झालें ? ही यमीच फार धांदरट आहे " दादा म्हणाला.

" मी कधीं रे—"

" जाऊं दे, दादा, तिला उगीचच चिडवूं नकोस. तुम्हां दोघांनाही मी पुढल्या खेपेस महानुभावांचीं धर्मतत्त्वें, वागण्याची रीत, ते आपणास माहीत कां नाहींत, त्यांच्या गुप्त लिप्या इत्यादि माहिती सांगेन."

## अभ्यास

१. चक्रधरस्वामींचा शेवट कसा झाला ?
२. " ऋद्धिपूरप्रांतीं ...... " या उताऱ्याचा सुरस मराठींत तर्जुमा करा.
३. मुलें जगत नसल्यास काय करतात ?
४. महानुभावी गुप्त लिपीप्रमाणें तुम्ही एकादी लिपि शोधून काढण्याचा प्रयत्न करा.

## पांचवें दालन

# कडक शिस्त !

" हं मग काय मागच्या वेळीं ऋद्धिपूर-चरित्रांतील एक उतारा तुम्हांला मीं साध्या मराठींत करण्याकरतां दिलेला होता तो तुम्हीं केलांत का ?"

" छे: बुवा ! आपल्याला नाहीं जमला तो–पण बाबा त्यांत हें स्वीकारु, अवतारु, गांवु, दगडु असं कां लिहिलं आहे ?"

" अरे, ती एक मराठीची जुनी लकब आहे. सध्यां आपण जे शब्द 'अ'कारान्त उच्चारतों ते पूर्वीं 'उ'कारान्त करीत असत. असो. आज मी तुम्हांला चक्रधरांच्या पंथाचीं तत्त्वें–वगैरे सांगणार आहें. मग काय यमू, तुला आवडेल का तें ? का तूं जांभयाच देत बसशील ? "

" असं कां हो बाबा, जेव्हां तेव्हां तुम्हीं न् दादा मला चिडवतां ?" यमू फुरंगटून म्हणाली.

" बरं बरं–रागाऊं नकोस. मीं उगीच म्हटलें. ऐक तर. चक्रधरस्वामींची सर्व शिष्यांना आज्ञा असे कीं, नेहमीं भिक्षा मागून जेवण करावें."

" म्हणजे रामदासस्वामींनीं जशी आपल्या शिष्यांना आज्ञा केली होती तशीच म्हणाना ! " दादा म्हणाला.

" हो, त्याप्रमाणेंच— पण रामदासांच्या किती तरी आधीं हा पंथ निघालाय्.–त्यांचे नियमहि मोठे कडक होते. गांवांत स्वयंपाक झाले, चुली विझाल्याबर मग भिक्षा मागावयाची. अगदीं तिसऱ्या प्रहरीं !"

" बाई बाई–म्हणजे इतक्या उशिरा ! कां बरं ? "

" अग, म्हणजे लोकांना त्रास नको व्हायला, दुसरें काय ?– अन् भिक्षा मागतांना–धर्मभिक्षाच घ्यायची. भिक्षा घेत असतांना घराकडे, वाढणाराकडे, एवढेंच काय पण वाढणाऱ्याच्या हाताकडे सुद्धां पहावयाचें नाहीं. फक्त आपल्या झोळीकडे पहावयाचें ! श्रीमंत, गरीब असा भेदाभेद न करतां– घरें न निवडतां–भिक्षा मागावयाची. ज्या ठिकाणीं लग्न वगैरे आहे किंवा नवराबायको गप्पागोष्टी करीत आहेत अथवा आपल्या ओळखीच्या घरीं, भिक्षेस जावयाचें नाहीं. आहे कीं नाहीं कडक कायदा ? आणखी एक गम्मत राहिलीच ! अग यमे, हें बघ चक्रधर म्हणतात " डोइये जंतु शोधितां भिक्षे न बचावे " कळलें का ? तसेंच भिक्षा जी मागितली असेल ती नदीवर अगर पाणवठ्यावर बसून खावी. राहिलेली भिक्षा फेकून देऊं नये. लागेल तितकीच भिक्षा मागावी. भिक्षेचें अन्न शिळें-पाकें म्हणूं नये."

" पण त्यांची वागणूक कशी होती ? "

" वागणूक तर फार शिस्तीची होती. कोणी कोणाची थट्टा वगैरे करावयाची नाहीं. केली तर त्यास कडक शासन केलें जात असे. त्याची एक गोष्टच सांगतों. ऐका—

एकदां पद्मनाभी नांवाचा एक शिष्य नदीवर स्नानास गेला. तेथें दुसऱ्या पंथाचा कोणी प्रमाणुअनुभव नांवाचा साधु आला होता. त्याची या पद्मनाभीनें थट्टा केली. कोणी तरी त्याची चहाडी श्रीचक्रधरस्वामींच्याकडे केली. हा पद्मनाभी नदीवरून परत येत होता त्याला दुरूनच पाहून त्यांनीं शिष्यांस आज्ञा केली कीं, " हा भीतरीं अवचटा येईल हो. कवाडे घाला." ( दारें बंद करा ). तेव्हां तेथें नागांबा नांवाची एक शिष्या होती.

तिनें विचारलें, "कां बरें ?" त्यावर सर्वज्ञ म्हणतात (सर्वज्ञ म्हणजे सगळे जाणणारा, ही श्रीचक्रधरस्वामींना पदवी दिलेली होती !) 'हा प्राणियांचें चैतन्य पाळेऊनी आला: एथौनी त्याचे मुखु न पाहिजे:' (हा लोकांना दुखवून आला, आतां त्याचें तोंड-सुद्धां पहावयाचें नाहीं.) मोठ्या लोकांची जो थट्टा करतो त्याला बाहेर घालवणेंच इष्ट ! हें जेव्हां पद्मनाभीला कळलें तेव्हां तो 'थोरां शब्दें रडों लागला' तेव्हां त्याचा आवाज देखील ऐकण्याची इच्छा श्रीचक्रधरस्वामींनीं दाखवली नाहीं. मोठमोठे शिष्य मध्यें पडले तरी स्वामी ऐकेनात. शेवटीं असें ठरलें कीं, पद्मनाभीनें अंगाला राख फासून पुनः पुनः दंडवत घालून त्या प्रमाणुअनुभव महाराजांची क्षमा मागावी व त्यांनीं जर स्वामींना विनंति केली तर त्यास मग शुद्ध करून परत मठांत घ्यावें.

पद्मनाभी बिचारा रडत गेला. त्यानें विनंति केली. तेव्हां प्रमाणु अनुभव यांनाहि दया उपजली व ते म्हणाले, "अरे, स्वामी म्हणजे किती थोर, जा आतां त्यांच्याकडे !" पण पद्मनाभीला माहीत कीं आपण एकटे गेलों कीं स्वामी मठांत परत घेणार नाहींत. तेव्हां तो म्हणतो, "महाराज तुम्ही माझेबरोबर स्वामींच्याकडे चला." त्याप्रमाणें पद्मनाभी प्रमाणुअनुभवांना बरोबर घेऊन गेला व त्याचा त्यांनीं स्वीकार करण्यास विनंति केली कीं– 'यासी आमुचे हातेनि दाइया असो दीजे' त्यावर सर्वज्ञ म्हणाले "आतां (हा) तुमचा एथोनी स्वीकारतु असो जे (स्वीकार केला) परी इहीं अधुनां कव्हणीं ही रळीं राभस्यें शब्दु नेदावा: (पण यानें यापुढें वाईट शब्द कोणाला लावूं नये.) पहा बरें कशी व किती कडक शिस्त होती ती !"

"—मग इतके हे लोक चांगले होते तर त्यांची माहिती कशी

नाहीं आपल्याला !–हें मोठें आश्चर्य आहे. नाहीं का बाबा ?—"

" हो आश्चर्य तर खरेंच ! पण त्यालाहि कारणें आहेत. प्रथम हा पंथ कांहीं गुप्त नव्हता. पण पंथांतील वाङ्मय गुप्त राखावें म्हणून त्यांनीं गुप्त लिप्या काढल्या. त्याची माहिती थोडीशी गेल्या खेपेला तुम्हांला मीं सांगितलीच आहे. या गुप्त लिप्यांमुळें त्यांचें धर्मज्ञान लोकांना कळलें नाहीं. त्याशिवाय पुढें मुसलमानी अंमलांत हिंदूंवर लादण्यांत आलेला " जिझिया " कर यांना माफ होता. त्यामुळें जिझिया कर देतो तो हिंदु व न देणारे अहिंदु ठरले ! यापेक्षांहि एक सबळ कारण होतें तें हें कीं, आपल्यामध्यें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असे चार वर्ण आहेत ते या महानुभाव पंथांत नाहींत. त्यामुळें सुद्धां चातुर्वर्णी हिंदूंना हे लोक आवडतना."

" त्यांचा पोशाख कसा असतो बाबा ? "

" हो तें राहिलेंच सांगावयाचें. तेंहि एक कारणच झालें. प्रथम प्रथम यांचा पोषाख भगव्या रंगाचाच होता; पण पुढें त्यांनीं काळ्या रंगाचा स्वीकार केला व काळा रंग अशुभ असल्यानें देखील यांना कोणी विचारीना. आतां मात्र पुनः हे लोक भगवे कपडे वापरूं लागले आहेत. पंजाबांतील या पंथाचे सर्व लोक आतां भगव्या रंगाचेच कपडे वापरतात. असो. तर याप्रमाणें या लोकांविषयीं आपल्याकडे द्वेष वाढला. खरें पाहतां त्यांचा मुख्य देव म्हणजे श्रीकृष्ण. " परमेश्वर निर्गुण, निराकार असून तो भक्तिवशें साकार होतो " असें त्यांचें आपल्यासारखेंच मत आहे. आपण दहा अवतार मानतों–हो ना यमू ? "

" हो ".

" कोणते बरें ? "

" प्रथम–मत्स्य, कच्छ, वराह–वराह–वराह–"

" थांब, मीच सांगतों "—दादा म्हणाला—" मत्स्य, कच्छ, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बुद्ध, कलंकी, हे ते दहा होत."

" बरोबर आहे—पण हे लोक ते पांचच मानतात व श्रीचक्रधर हे पांचवे अवतार होत असेंहि मानतात. या धर्मपंथांतील लोकांनीं लिहिलेलीं, त्यांना अत्यंत पूज्य असलेलीं अशीं सात पुस्तकें आहेत. त्यांना " साती ग्रंथ " असें म्हणतात. प्रत्येक महानुभाव या ग्रंथांना वेदांप्रमाणें पूज्य मानतो. त्या ग्रंथांचीं नांवें सांगूं का ? "

" सांगा ना " दादा म्हणाला.

" कशाला आतांच ? " यमू उद्गारली.

" कशाला म्हणजे—पाहिजेत आम्हांला—सांगाना हो बाबा ? " दादानें हट्टच धरला तेव्हां बाबांनीं त्यांची यादीच त्याचेजवळ दिली. ती अशी:—

१ शिशुपालवध—कवीश्वर भास्कर.
२ एकादशस्कंध— "
३ वच्छहरण—दामोदरपंडित.
४ रुक्मिणी-स्वयंवर—नरेंद्र कवि
५ ज्ञानबोध—विश्वनाथ बाळापूरकर
६ सह्याद्रि-वर्णन—रवळो व्यास
७ ऋद्धिपूर-वर्णन—नारायणपंडित बहाळे.

हे ग्रंथ शके ११९५ ते १२८५ पर्यंत केव्हांतरी लिहिले गेले आहेत. यांशिवाय—

१ चक्रधर—सिद्धांतसूत्रें
२ लीला-चरित्र

इत्यादि ग्रंथ आहेतच. नवीनच आणखी गोष्ट सांगावयाची म्हणजे या ग्रंथांना जोड-ग्रंथ असे 'टीप' नांवाचेहि इतर पुष्कळ ग्रंथ त्यांनीं लिहिलेले आहेत.

"पुष्कळ ऐकलें बाबा, पण अजून माझी समजूत होत नाहीं कीं, या लोकांना आमच्यापासून इतकें दूर कां ठेवलें गेलें?" दादा एखाद्या विचारी माणसासारखा विचारूं लागला.

"अगदीं छान प्रश्न केलास तूं हा, दादा! अरे, आपल्याकडे वारकरी पंथ नाहीं का, त्यासारखाच हाहि एक पंथ हिंदुधर्मांतीलच एक शाखा म्हणून राहिला पाहिजे. जैन, बौद्ध लोकांप्रमाणें हे लोक वेदबाह्य नाहींत. खुद्द महानुभाव लोकांच्या ग्रंथांतच असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, 'जैनमार्ग हा आडबिदि वेदमार्ग हा राजबिदि, (जैन मार्ग हा आडरस्ता आहे तर वेदाचा मार्ग हा राजरस्ता आहे.) तेव्हां हे लोक निःसंशय हिंदूच होत. कारण—

१ यांचा देव श्रीकृष्ण आहे.
२ त्यांचे आचार आमच्यासारखेच आहेत.
३ ते मूर्तिपूजक आहेत.
४ वेदांविषयीं त्यांना पूज्यबुद्धि आहे.
५ त्यांची व आमची भाषा एकच आहे, इत्यादि

केवळ पूर्वीच्या कांहीं प्रवादांमुळें आज त्यांना लोकांनीं दूर लोटूं नये व त्यांनींहि दूर राहूं नये असें मला वाटतें."

—"नाहींतर काय लोकांनीं या महानुभावीयांना उगीचच दूषणें दिलीं आहेत— कोणी खोटेपणानें वागत असला कीं आम्ही म्हणतों "काय मानभाव आहे पहा!" खुद्द तुकारामानें देखील अभंगांत असाच त्यांचा उपयोग केला आहे. कांहीं म्हणीसुद्धां या मानभावांविरुद्ध रचिलेल्या आहेत. कोणती बरें—" दादा अडखळला.

" करणी कसाबाची न् बोलणीं मानभावाचीं " यमूनें ती म्हण सांगितली.

" दादा तूं म्हणतोस तें खरें आहे. पण याला कोण काय करणार ? चालावयाचेंच. अरे, यापुढें तरी ती चूक आपण दुरुस्त करावी कीं नाहीं ? असो. आतां फार वेळ झाला आहे; आपण उठूं या. आणखी पुढच्या खेपेस आतां या 'साती ग्रंथांच्या' लेखकांची वगैरे माहिती तुम्हांस सांगेन."

" अन् त्यांच्या ग्रंथांतील विषयांची ?—"

" तीहि पण सांगेन. एवढी माहिती झाली कीं, आपण मग या महानुभाव पंथाची माहिती पुरी करूं या. नंतर आपणांला ग्यानबा तुकारामाकडे जायचें आहे ना ? "

" खरंच ? " यमू म्हणाली.

" हो अगदीं खरें बरं का यमू " बाबा हंसत म्हणाले व उठलेच.

### अभ्यास

१. तुम्ही पद्मनाभी आहांत असें समजून ती गोष्ट लिहा.

२. महानुभाव पंथाचा कडक कायदा कोणता होता ? ते लोकांना अप्रिय कां झाले ?

३. महानुभाव पंथांत व वेदोक्त धर्मांत तुलना करा.

४. लक्षपूर्वक पहा :—

(१) मराठीची विशिष्ट लकब, (२) साती ग्रंथ, (३) टीप.

## सहावें दालन

# महानुभाव पंथांतील लेखक

आज बाबा गांवाहून परत येतील म्हणून यमू व दादांनीं पुष्कळ वाट पाहिली; पण त्यांची निराशाच झाली. गांवाला जातांना नक्की येतो असें सांगून बाबा गेले होते. मग कां बरें ते आले नाहींत ? बहुतकरून आजचा दिवस फुकट जातो आहे, असेंच दोघांस वाटलें. दादाला शेवटपर्यंत आशा होती कीं बाबा फसवायचे नाहींत. शेवटीं रात्र पडली तरी बाबांचा पत्ता नाहीं. जेवीत असतां आईला दादानें विचारलें. तेव्हां आई म्हणाली—

“ त्यांना यायला एक दोन दिवस अवकाश आहे.”

“ छे, ते तर आजच येणार होते.”

“ नव्हे त्यांनीं तसं मला सांगितलंय्. एक दोन दिवस उशीर होईल म्हणून ! ” आई म्हणाली.

“ मग नक्कीच आजची माहिती सांगायची बुडाली म्हणावयाची.” यमूनें तोंड आंबट केलें. ताक वाढतां वाढतां आईनें तें पाहिलें व एकदम आठवण झाल्यासारखें करून ती म्हणाली—

“ अरे हो, त्यानीं जातांना एक वही दिलीन् माझ्याजवळ न् म्हणाले, ‘ मी नाहींच आलों तर दादाला दे व म्हणावें हीच वाचून पहा—म्हणजे नेमलेला दिवस फुकट जावयाचा नाहीं’.”

“ खरंच ?”—दादा म्हणाला. अन् आंचवून धांवत वही पाहायला गेला. वही सांपडली ! मग तीं दोघें दिवाणखान्यांत बसलीं. नंतर आईहि आली. आज दादा वाचणार होता म्हणून बाबांच्यासारखा गंभीर चेहरा करून खांकरून त्यानें वहींतील टिपणें वाचण्यास सुरुवात केली—

१ **महींद्रभट**—हा राहणारा सारोळा गांवचा. ह्याचे आई-बाप दोघेहि विद्वान् असल्यानें हाहि 'बापसे बेटा' झालेला होता. आपले मामा **गणपत आपया** यांच्याजवळून यानें विद्या शिकून घेतली. पुढें त्यांचाच तो जांवई झाला. याच्या बायकोचें नांव देआंबा. पुढें विद्येच्या जोरावर यानें दक्षिणदेशीं जाऊन पुष्कळ ठिकाणीं वादविवाद केला. प्रत्येक गांवीं जाऊन तेथून यानें अजिंक्य-पत्र आणावें व वाद जिंकल्याची खूण म्हणून दिवसा दिवट्या पाजळून गांवभर हिंडावें. असें त्यांचें पुष्कळ दिवस चाललें होतें. त्याला विद्येचा गर्व झाला. पुढें त्याच्या मामानें—सासऱ्यानें—त्यावर उपाय म्हणून त्याला देगांवीं नेलें. त्या गांवींसुद्धां वाद-विवादाची खुमखुमी त्याची जिरली नाहीं. श्रीचक्रधरस्वामींचा मुक्काम सुद्धां त्याच गांवाला पडला होता. त्यांच्याशीं यानें वाद-विवाद केला, पण त्यांत तो हरला व शेवटीं तो त्यांचा शिष्य बनला. त्यानें मग श्रीचक्रधरस्वामींचें चरित्र लिहिलें. त्यास **'लीलाचरित्र'** असें म्हणतात. या ग्रंथांत एकंदर १५०९ कथा आहेत. त्याचप्रमाणें त्यानें **'पद्यखरडा'** नांवाचा आणखीहि एक ग्रंथ लिहिला आहे.

"पद्यखरडा म्हणजे रे काय?" यमूनें विचारलें.

"मला ग काय माहीत? पण साधारणतः खरडा म्हणजे पुस्ती किंवा कच्चें टिपण असें मला वाटतें—असो. आतां पुढें ?

२ **भास्करभट**—यांचे ग्रंथ (१) शिशुपाल वध (२) एका-दशस्कंध टीका.—हा फार देखणा व शीघ्र कवि होता. हातांतील लिंबू वर फेकून तें झेलीपर्यंत हा एक नवीन श्लोक रचून दाखवी असें म्हणतात. याला एकदां कारागृहवास घडला होता. नंतर उपरति होऊन हा चक्रधरस्वामींचा शिष्य झाला.

**शिशुपालवध**—या ग्रंथांत १०८७ ओव्या आहेत व त्यांत

श्रीकृष्ण-रुक्मिणीच्या लग्नाची कथा आहे. याची भाषा फार रसाळ व गोड आहे. यांत हास्य-विनोद व शृंगार फार उत्तम साधला आहे. यांतला एक उतारा—

श्रीकृष्ण थट्टेनें रुक्मिणीला म्हणतात 'ते एक ब्राह्मण सांबडे। मानुषातें नेणें पुढें। येरवीं ऐसी माकडें। आम्हां कां लगती ?'' (अर्थ : सुदेव नांवाचा ब्राह्मण आला, म्हणून ही माकडासारखी रुक्मिणी आमच्या गळ्यांत पडली ! )

रुक्मिणीसुद्धां कमी नव्हती. तिनें झणझणीत उत्तर दिलें—

१ 'पहा हो पहा। मातें माकुडें केलें येणें। या आपुली से नाहीं' (यानें मला माकड म्हटलें पण यांना आपली स्वत:ची सय—आठवण—नाहीं काय ? )

२ 'ताक विकितिया गौळणी : देना वैकुंठ मानी : ऐसाहि याची नेसवणी : कव्हणी न घे :' (ताक विकणाऱ्या भिकार गौळणीसुद्धां याच्याशीं लग्न करायला तयार नव्हत्या. )

३ 'नुजबेंची कवणें बोलें : आंगा आठवरपण आलें : तें वेळीं नंदें लग्न लावलें : तुळसीसी' (अहो, हा कृष्ण खूप वाढला त्याचें लग्न होईना. म्हणून नंदानें त्याचें लग्न तुळसीशीं लावलें ! )

४ कैसी कांसोटेकारा भगवंता। वरपडी झालें हो ? (या असल्या लंगोटीवाल्याशीं मी कशी काय भाळलें देव जाणे ! ) अशा तऱ्हेचे विनोदप्रसंगहि त्यांत आहेत. हा ग्रंथ लिहून झाल्यावर मग त्यानें गीतेच्या ११ व्या अध्यायावर दुसरा परमार्थपर टीकात्मक ग्रंथ लिहिला."

"बाबा असते तर त्यांनीं किती छान समजावून दिलें असतें नाहीं ?" यमू म्हणाली. त्याला 'हं' म्हणून दादानेंहि संमति दिली. पुढें दादानें वाचन चालू केलें.

" यानंतर **केशवराज सूरी** यांचा सिद्धांतसूत्रें नांवाचा एक ग्रंथ महानुभावांना वेदांप्रमाणें पूज्य असलेला एक आहे. त्यांत चक्रधरांच्या तोंडून निघालेलीं तत्त्वें व त्यावर विवेचन दिलेलें आहे."

" म्हणजे रे काय ? " यमूची आई म्हणाली.

" इथें बाबांनीं उदाहरण दिलें आहे बघ. ते म्हणतात–' सूत्रः अनंत शक्तिः परमेश्वरुः सकळांसी हीः विषय बेवस्था करताती :'

त्यावर मग टीका व दृष्टान्त दिलेला आहे. या सूत्रावर दृष्टान्त " सहा आंधळे व एक डोळस, हत्ती पहातात." हा आहे.

याप्रमाणें चक्रधरांनीं सांगितलेलीं सर्व सूत्रें एका ग्रंथांत एकत्रित केलेलीं आहेत. चक्रधरस्वामींचीं जशीं सूत्रें त्याप्रमाणेंच त्यांचा रोजचा म्हणजे रोज ते काय काय करीत असत त्याचाही एक ग्रंथ आहे. त्याला " **पूजावसर** " असें म्हणतात. हा **भावेदेव व्यास** यानें लिहिला. या " **पूजावसरांत** " अगदीं बारीकसारीक वर्णनें आहेत. येथें एक उदाहरण देतों.

" बाईसे कणीकी तीमितीः तांदुळे भीजती घालितीः कानवडा लावितीः ताट करितीः चक्रधर भीतरीं बीजें करितीः तुपु भातु प्रहीतीः दोनी साकवतीया ( भाज्या ) ऐसे आरोगण ( जेवण ) होतः पोळी तरी चौतकोरः मांडा तरी दीढुः पाठी ( मागून ) ताकभाताची आरोगण होतः "

हें चक्रधरस्वामींच्या स्वयंपाकाचें व जेवणाचें वर्णन आहे. यापुढचा प्रख्यात ग्रंथकार म्हणजे **दामोदर पंडित** हे होत. यांनीं **'वच्छहरण'** नांवाचें सुंदर काव्य रचिलें आहे.

हे रहाणारे गंगाकांठचे. यांच्या बायकोचें नांव हिरांबा. श्रीचक्रधरस्वामींचे शिष्य नागदेवाचार्य हे फिरत फिरत तेथें आले असतां शके ११९४ त त्या दोघांनीं त्यांना गुरु केलें. हिरांबा

पहातां नाव धारेला लागली व पाण्याच्या एका मोठ्या भोंवऱ्यांत सांपडली! सर्वांचीच गाळण उडाली. अशा विपत्कालीं देव किंवा धैर्य याशिवाय कोण सोडविणार? धैर्य तर सगळ्यांचेंच गळालें होतें. अशा वेळीं दुसरा उपायच अमलांत आणावयाचा. सगळे लोक देवाची प्रार्थना करीत होते. त्यांतच राजोबा दखणी होते. दखणी म्हणजे दक्षिणेकडे—महाराष्ट्राकडे—राहणारे. त्यांनीं पाहिलें कीं, प्रसंग मोठा बांका आहे. पण धीर न सोडतां हातांतील दंड त्यांनीं सरसावला. लोकांना वाटलें हे आतां काय करणार? दंडासह उडी तर मारणार नाहींत? पण राजोबांनीं अघटित कृत्य केलें. त्यांनीं आपल्या हातांतील संन्याशाचा दंड उभा करून मोठ्यानें नावेच्या कडेवर प्रहार केला. नंतर ते नावेला उद्देशून म्हणाले—

'चल लंडी निकल बाहेर'

(चल खुळे नावे—बाहेर हो) व काय आश्चर्य! ती नाव खरोखरच भोंवऱ्याच्या बाहेर पडली व सर्व लोक बचावले. त्या प्रसंगावरून पंजाबी भाषेंत म्हणीप्रमाणेंच एक वाक्य आहे कीं,

'राजोबा दखणीने डुबी बेडी रखणी'

(दक्षिणेकडचे राजोबांनीं बुडणारी नाव राखली!)

परप्रांतांत जाऊन आपल्या भाषेच्या सेवकांनीं कशी कामगिरी केली याचें हें प्रत्यंतर आहे."

"पुरे बाबा," यमू म्हणाली. "आज अगदीं कंटाळवाणें झालें. फक्त शेवटची गोष्ट सोडून!"

"तर काय!" आईनेंहि दुजोरा दिला.

"पण—" येवढेंच म्हणून व वही मिटून दादा दुसरीकडेच पाहूं लागला.

## अभ्यास

१. शिशुपालवधांतील दिलेल्या ओव्या आधुनिक मराठींत रूपांतरित करण्याचा प्रयत्न करा.
२. वच्छहरणांतील ओव्यांचा सरळ मराठींत कोणाला न विचारतां अर्थ करून पहा.
३. 'राजोबा दखणीने डुबी बेडी रखणी' याचा संदर्भासह खुलासा करा.
४. नरेंद्रभट, दामोदरपंडित व भास्करभट यांपैकीं एकाचें चरित्र व वाङ्मयाची माहिती द्या.

---

## सातवें दालन

# जाऊं का काशीला ?

" पुनः सांगा हो बाबा ! गेल्या खेपेस दादानें वाचलें तें मला नीटसें कळलेंच नाहीं ! " यमूनें बाबांना विचारलें. दादाहि जवळच बसला होता. त्याला यमूचें हें विचारणें अर्थातच पसंत पडलें नाहीं. " इतक्या चांगल्या तऱ्हेनें सांगून—नव्हे वाचून—देखील या यमीचें आपलें पालुपद ठरलेलेंच ! " असा चेहरा करून तो तिच्याकडे पाहूं लागला. बाबांनीं हें जाणलें व ते यमूस म्हणाले—

" यमे, पुनः पुनः तेंच सांगण्यांत मला तरी गोडी वाटत नाहीं. नवीन कांहीं सांगा म्हणशील तर सांगणाराला व ऐकणाराला सुद्धां त्यांत एक प्रकारची गोडी व उत्साह येत असतो. अन् शिवाय आपला दादा कांहीं कमी नाहीं. आतांच तुझी आई म्हणत होती कीं, दादा फार चांगलें वाचतो हो ! "

" आईला काय होतंय् म्हणायला ?––विचारा तिला कांहीं कळलंय् काय ! " यमूचा फणकारा कांहीं अजबच !

" बरं यमू, विचार तर काय कळलें नाहीं तुला ? "

" ती राजोबा दखणीची गोष्ट कळली. पण–शिशुपालवध––"

" अग, मीं तुला काय कळलं नाहीं तें विचार म्हणतोंय ना ?–"

" असं काय हो बाबा, सांगतेंय ना मी ? " यमू जरा घुश्शानेंच म्हणाली. तिला सुद्धां एकदम विचारतां येईना. विचारलें तर पाहिजे. " पण विचारा काय ? " असा तिला पेंच पडला. शेवटीं विचार ठरल्यासारखें करून ती म्हणते, " बरें. मी पुनः केव्हां तरी विचारीन. आज आपली नवीन माहिती सांगा."

" कशी जिरली! फजिती रे फजिती एका माणसाची ! " दादा काय स्वस्थ बसतोय. यमूला गप्प बसणें भागच होतें. पण ती चिडली खास. हें पाहून बाबांनींच एकदम सांगण्यास सुरुवात केली. ते म्हणाले, " महानुभाव पंथाच्या लेखकांच्या माहितीची मीं टिपणें केलीं होतीं त्यांवरून त्यांची अस्पष्ट अशी कल्पना तुम्हांस आली असेल. त्या महानुभावांच्या जवळ जवळ त्या काळीं मराठी भाषेंतील एक देदीप्यमान हिरा चमकत होता. त्याच्या त्या वाङ्मय-प्रकाशानें सर्व महाराष्ट्र––महाराष्ट्रच काय, पण अखिल जगत् धवळून गेलें. "––

" एवढे हे मोठे कोण बाबा ? "

" मागेंच मीं तुम्हांला सांगितलें होतें-त्यांना मराठी बोलणारांची 'आई' असें म्हणतात. आईपेक्षां देखील यांनीं मराठीच्या लेंकरांस लालन-पोषणांनीं वाढवलेलें आहे. ते भाविकांचे देव, कवींचे मुकुटमणि, तत्त्वज्ञांचे शेखर व ज्ञानियांचे राजे होते ! "

" कळलें. " दादानें टाळी वाजवून म्हटलें.

यमूनें नुसता प्रश्नार्थक चेहरा केला. "तिला जणूं विचारावयाचें होतें कीं, " एवढ रे काय कळलें तुला ? मोठा शिष्टच आहे हा !"

बाबा म्हणाले, " काय रे कळलं ? "

" अहो, म्हणजे तुम्ही ज्यांच्याविषयीं बोलत आहांत ते ज्ञानेश्वर महाराजच कीं नाहीं ? "

" बरोबर ओळखलेंस. त्यांच्याविषयींच आतां मी तुम्हांस थोडी माहिती सांगणार आहें."

" आम्ही 'ज्ञानेश्वर' सिनेमा पाहिलाय. " यमू म्हणाली.

" अरे हो खरंच कीं--! पण यमे, सर्व माहिती कांहीं सिनेमानें देतां येत नाहीं. त्यांत राहिलेली मी सांगेन. --तर काय म्हणत होतों मी ? "

" ज्ञानेश्वर महाराजांची माहिती ! "

" हं, ठीक. पैठणला गोदावरी नदी आहे. हें पैठण गांव पूर्वींपासून फार प्रख्यात आहे. येथें मोठमोठे विद्वान होऊन गेलेले आहेत. धर्मपंथांचा निर्णय करण्याचें येथें मोठें काम चाले. धर्माचें तें एक 'कोर्टच' होतें म्हणाना ? या पैठणच्या जवळ आठ मैलांच्या अंतरावर एक छोटेंसें गांव होतें. त्या गांवाचें नांव **आपेगांव.** या गांवीं ज्ञानेश्वराचे पणजे **हरिहरपंत** कुलकर्णी रहात होते."

" तेव्हांपासून कुलकर्णपणा चालू आहे ? "

" हो. अरे, आपल्या इकडची ही खेडेगांवची पद्धत फार जुनी अन् चांगली आहे. पण आतां आपणाला तें नाहीं सांगावयाचें--तर मग मी काय म्हणत होतों बरें—"

" हरिहरपंत कुलकर्णी होते ! "

" या हरिपंतांपासून पांचवे पुरुष गोविंदपंत यांना त्यांचे वयाचे २५ व्या वर्षी एक मुलगा झाला. त्याचें नांव विठ्ठल ठेवलें. हे विठ्ठलपंत बुद्धीनें हुषार व मनानें भाविक होते. मुंज झाल्यावर लवकरच त्यांनीं वेदाध्ययन पूर्ण केलें व मनानें विरक्त असल्यानें वडिलांची परवानगी घेऊन ते त्या वयांत तीर्थयात्रेस निघाले. द्वारका, प्रयाग इत्यादि तीर्थें करीत ते श्रीक्षेत्र आळंदी येथें इंद्रायणीच्या तीरीं आले. इंद्रायणींत स्नान करून हा तेज:पुंज योगी ध्यानस्थ बसला होता. त्याच्याकडे पहात एक वृद्ध इंद्रायणींत स्नान करीत होता. त्या म्हाताऱ्यानें योग्याची समाधि उतरल्यावर त्याला आग्रहानें आपल्या घरीं नेलें. त्या वृद्धाचें नांव **सिधोपंत.** हेहि कुलकर्णीच ! त्यांना फक्त एक मुलगीच होती. सिधोपंतांनीं आपली मुलगी रुक्मिणी ही अत्यंत आग्रहानें विठ्ठलपंतास दिली. लग्न झालें. पण विठ्ठलपंताचें लक्ष संसारांत नव्हतें. पुन: एकदां तीर्थयात्रा करून ते बायकोसह आपल्या घरीं म्हणजे आपेगांवीं आले. तेथें त्यांचे आईबाप वारले. सगळा संसार त्यांच्या गळ्यांत पडला. विठ्ठलपंतांना तें जमेना. पुन: ते आळंदीस आले. त्यांना वाटे हा संसार सोडावा, संन्यास घ्यावा व नेहमीं ईशचिंतनांत मग्न असावें. पण 'लग्नाची बेडी' तोडावयाची कशी ? बायकोच्या परवानगीशिवाय संन्यास घेतां येत नाहीं ! "

" खरंच ? "

" हो खरंच ! " असें म्हणत बाबा आईकडे पाहून हंसले !

" कांहीं तरीच ! " आई पुटपुटली !

" विठ्ठलपंत रोज बायकोस विचारीत– 'मी घेऊं का संन्यास ?' बिचारी रोजच्या या त्रासानें कंटाळली—ती म्हणे. 'आपणांला संतति झाली कीं मग खुशाल घ्या तुम्ही संन्यास'– पण यांना तेवढा धीर

नव्हता. संन्यास घ्यावयाचा व काशीस रहावयाचें हें त्यांच्या मनांत सारखें घोळत होतें. त्यांनीं एके दिवस युक्ति केली. रुक्मिणीबाई झोपेनें आळसटलेल्या जरा गुंगींतच होत्या. तेव्हां हे तिला म्हणाले, "मी काशीच्या गंगेवर जाऊं का स्नानाला?" बाई म्हणाल्या, "हं" कीं निघाले विठ्ठलपंत काशीला!"

"असं कां हो त्यांनीं विचारलें?"

"अग यमू, जर त्यांनीं विचारलें असतें कीं, संन्यास घेऊं का म्हणून, तर बाईनीं नाहींच म्हटलें असतें. आतां संन्यास घेतला कीं काशीस जावयाचें ठरलें होतें. तेव्हां "काशीच्या गंगेस जाऊं?" असें विचारलें तर संन्यास घेण्यास परवानगीच घेतल्यासारखी झाली."

"पण ही निव्वळ फसवणूक आहे!" दादा म्हणाला.

"फसवणूक तर खरीच! पण ती परमार्थाकरतां होती. असो. तर अशी परवानगी घेऊन रात्रींच जे विठ्ठलपंत बाहेर निघाले ते थेट पुष्कळ दिवसांनीं काशीस पोहोंचले. तेथें त्यांनीं **रामानंदस्वामीं**-कडून संन्यास घेतला व स्वतःचें नांव **'चैतन्याश्रम'** ठेवलें. इकडे रुक्मिणीबाई जागी होऊन पहाते तों काय? विठ्ठलपंत नाहींत. बिचारीच्या अंगावर आकाश कोसळलें. तेव्हांपासून तिनें देवदेव करण्याचें धरलें. देवाचें अनुष्ठान कर, पिंपळाला प्रदक्षिणा घाल, अशीं व्रतवैकल्यें सुरू झालीं. दैवयोग मात्र मोठा विचित्र! ज्यांनीं विठ्ठलपंतांना दीक्षा दिली तेच रामानंदस्वामी तीर्थयात्रेचे निमित्तानें हिंडत आळंदींत आले होते व एका पिंपळाच्या कट्ट्यावर बसले होते. रुक्मिणीबाई नेहमींप्रमाणें त्या पिंपळाला प्रदक्षिणा घालण्यास आल्या. त्यांनीं या यतीस तेथें पाहून नमस्कार केला. यतींनींहि ही सुवासिनी आहे असें पाहून "पुत्रवती भव" असा आशीर्वाद दिला. आशीर्वाद ऐकून रुक्मिणीबाईना विषाद वाटला व त्या स्तब्ध उभ्या



राहिल्या. त्या अशा उभ्या पाहून त्यांनीं विचारिलें, ‘ बाई, तुम्ही उभ्या कां ? ’ तेव्हां बाई म्हणाल्या, “ माझं नशीब काशीस संन्यासी होऊन बसलंय्. ” स्वामींनीं सगळी चौकशी केली व ते तडक परत काशीस गेले. त्यांना अंतर्ज्ञानानें कळलें होतें कीं, हे बिठ्ठलपंत म्हणजेच “ चैतन्याश्रम ! ” स्वामींनीं चैतन्याश्रमाची अशी खरडपट्टी काढली कीं ज्याचें नांव तें ! ते म्हणाले, “ अरे, अशा फसवणुकीनें का कुठें मोक्ष मिळतो ? जीं कर्तव्यें करावयाचीं तीं केलींच पाहिजेत. आतां तुला मी पुन्हा आज्ञा करतों कीं, तूं

पुनः आळंदीस जा व आपल्या बायकोचा स्वीकार कर." विठ्ठलपंत आज्ञाधारक होते. ते गुरूंच्या आज्ञेप्रमाणें आळंदीस आले. रुक्मिणीबाईंना स्वर्ग लाभला !

" काय यतीचें सामर्थ्य तरी ! " आई म्हणाली. " नाहीं तर परवांचे ते बुवा देवळांत उतरलेले—खोटा मेला ! नुसता राखुंडींतला रामोशी होता ! "

आई कुणाविषयीं बोलत होती तें सर्वांनीं जाणलें होतें. एका दाढी-जटावाल्या बुवाला नुकतेंच पोलिसांनीं पकडून नेलें होतें.

बाबांनीं पुढें सांगणें सुरू केलें— " विठ्ठलपंत पुनः संसारात जे पडले ते मात्र नेकीनें ! खरे हरिभक्त होते विठ्ठलपंत. त्यांचा मार्ग चुकला होता. तो त्यांना परत मिळाला होता. रुक्मिणीबाईसुद्धां अत्यंत पतिव्रता व साध्वी सुशील बाई होती ! म्हणूनच अशांच्या पोटीं भारतवर्षाला दिपवणारीं व जगाला शिकवणारीं बालकें जन्मास आलीं. जमीन चांगली तर पीक उत्तम ! विठ्ठलपंतांनीं संन्यास सोडून गृहस्थाश्रम पत्करला, हें पाहतांच आळंदीच्या ब्राह्मणांचें पित्त खवळलें. शास्त्रांत आज्ञा होतीच कीं, संन्याशानें गृहस्थाश्रम स्वीकारूं नये ! पण या असल्या गोष्टींविरुद्ध बंड करणारेच विठ्ठलपंत होते; व म्हणूनच त्यांना बंडखोर ज्ञानेश्वर झाले ! "

" ज्ञानेश्वर कसे काय बंडखोर ? " दादा म्हणाला.

" सांगेन तुला हळूहळू........विठ्ठलपंतांनीं लोकांची तमा न धरतां संसार सुरू केला व त्यांना जगाला ललामभूत होणारीं अशीं चार अपत्यें झालीं. तीं अशीं—

१ माघ व॥ १ सकाळीं, शके ११९५. **निवृत्तिनाथ.**

२ श्रावण व॥ ८ रात्रीं १२ चे सुमारास, शके ११९७.

**श्री ज्ञानेश्वर.**

३ कार्तिक शु॥ पौर्णिमा रात्रीं. शके ११९९. **सोपानदेव.**

४ आश्विन शु॥ १ दुपारीं. शके १२०१. **मुक्ताबाई.**

पैकीं पहिले निवृत्तिनाथ हे श्रीज्ञानदेवांचे मोठे बंधु. पण श्रीज्ञानदेवांना दीक्षा दिलेले म्हणून ते त्यांचे 'गुरु' होत. या भावंडांचा छळ कर्मनिष्ठ लोकांनीं फार केला. विठ्ठलपंत व रुक्मिणीबाई यांनीं तर जणूं कांहीं आपल्या पापा(!)बद्दल प्रायश्चित्त म्हणून जलसमाधि घेतली. हीं चार भावंडें पोरकीं झालीं. निवृत्तिनाथ मोठे म्हणून त्यांच्यावरच सर्व भार! निवृत्तिनाथ मोठे म्हणजे किती? सारे बारातेरा वर्षांचे! बरें, ब्राह्मणांनीं या लहान मुलांना तरी छळावयाचें नव्हतें! पण असें न केल्यास मग आत्मप्रौढी ती काय राहिली!"

"असें लोकांनीं केलें तरी काय?" यमू म्हणाली.

"केलें काय?"—बाबा जरा जोरांतच म्हणाले. "अग, काय केलें नाहीं तें सांग. या बिचाऱ्या मुलांना रहावयाला सुद्धां जागा मिळूं नये असें त्यांनीं केलें. 'संन्याशाचीं मुलें' म्हणून चिडवून 'त्राहि भगवन्' करून सोडलें. खायला अन्न नाहीं. आसऱ्याला जागा नाहीं, मायेचीं माणसें नाहींत, शरिरांत त्राण नाहीं. अशा वेळीं 'भूक भूक' करून सोपानमुक्ता–तीं लहान बाळें–जेव्हां दीनवाणा हंबरडा फोडीत त्या वेळीं एकाद्या दगडाला सुद्धां पाझर फुटला असता; पण या रुढीवाल्यांनीं त्यांना संन्याशाचीं मुलें म्हणून दूर करावें यापेक्षां क्रूरपणा तो कोणचा? बिचारा निवृत्ति! पाठीशीं सोपानाला बांधून दारोदार भिक्षा मागावयाचा! ज्ञानदेवांनीं छोट्या मुक्तास घेऊन उन्हातान्हांतून 'पाणी पाणी' करीत हिंडावें! अर्धपोटीं, थकले भागलेले हे चिमणे जीव दमून भागून कुठल्या तरी पडक्या भिंतीच्या आसऱ्यानें पोटाशीं पाय घेऊन एकमेकांस मिठ्या

मारून झोपीं जात ! काय पाप केलें होतें यांनीं ? ज्यांचा अधिकार जगाला शिकवायचा, त्यांना हे तुटपुंजे ब्राह्मण काय शिकविणार ? —पण या भावंडांनीं हें सगळें सहन केलें—अगदीं शांत मनानें सहन केलें ! कोणावर रागावणें—गागावणें—नाहीं. असामान्य धैर्याचे पुतळे ते ! !

"चणे खावे लोखंडाचे तेव्हां ब्रह्मपदीं नाचे !"

—असें म्हटलें आहे तें खोटें नाहीं. या चार बालकांनीं जितका त्रास सोसला असेल तितका जगांत फार थोड्यांना सोसावा लागला असेल........"

—इतक्यांत बाबांकडे कुणीसें आल्यानें त्यांना बोलणें थांबवावेंच लागलें. खुर्चीवरून उठतांना त्यांच्याकडे पाहिलें तेव्हां त्यांचे डोळे पाणावलेले दिसत होते. बाबांच्या हृदयास एकादी गोष्ट लागून राहिली असल्याशिवाय का त्यांच्या डोळ्यांस पाणी येईल ? तरी पण आजची गोष्ट एवढ्यावरच थांबवावी लागली !

## अभ्यास

१. "जाऊं गंगेवर स्नानाला ?" या वाक्यांत काय खोंच आहे ?— त्या वाक्याचा परिणाम काय झाला ?

२. 'आपण करावयाला जातों एक न् होतें भलतेंच' अशा तऱ्हेचा तुम्हांला आलेला अनुभव थोडक्यांत लिहून काढा.

३. विठ्ठलपंताच्या मुलांचीं नांवें, जन्मतिथी व वार सांगा. त्यांतील कोण तुम्हांस आवडतो व कां ?

४. 'चणे खावे लोखंडाचे तेव्हां ब्रह्मपदीं नाचे' अशासारख्या तीन म्हणी लिहून काढा.

## आठवें दालन

# ज्ञानेश्वरमाउली !

बाबांच्याकडे एकदम कोणी आल्यानें त्यांना ज्ञानेश्वर महाराजांची हकीकत अर्धीच सोडून जावें लागलें. दादा त्या वेळीं फार खिन्न झाला होता. पण त्याचा उपाय नसल्यानें तो मूग गिळून बसला होता. आज जेव्हां बाबा नेहमींप्रमाणें आले तेव्हां यमूनें खाकरण्याचें निमित्त करून बाहेर प्रयाण केलें. कां बरें ती बाहेर गेली ? यमू चळवळी होती. बाहेर जाऊन पहावें तों ती आपली बाबांच्या दारावरच्या नांवाच्या पाटीशीं धडपडतेय्! तिनें बाबांच्या पाटीवरच्या 'घरांत आहेत' याऐवजीं 'घरांत नाहींत' अशी व्यवस्था केली ! वा रे बहाद्दर ! अशानें का लोक यायचे थांबणार ? पण तिची आपली भोळी समजूत, दुसरें काय ? शेवटीं सगळीकडे स्थिरस्थावर झाल्यावर बाबांनींच सांगण्यास सुरवात केली—

"श्रीज्ञानेश्वरादि भावंडांवर कशी आपत्ति कोसळली याची माहिती मीं तुम्हांस गेल्या खेपेस सांगितली. विठ्ठलपंत जिवंत असतांनाच श्रीनिवृत्तिनाथांना गहिनीनाथांचा गुरुप्रसाद मिळालेला होता."

"तो कसा हो मिळाला बाबा ?"

"सांगतों हं. जेव्हां विठ्ठलपंतांना लोकांनीं वाळींत टाकलें तेव्हां भोळ्या विठ्ठलपंतांना असें वाटलें कीं, तपश्चर्या करून आपण आपलें पाप धुवावें म्हणून हे सर्वजण नाशिक क्षेत्रीं आले व तेथें त्र्यंबकेश्वरीं त्यांनीं तपश्चर्या सुरू केली. एके दिवशीं निवृत्तिनाथ हे

जंगलांतून प्रदक्षिणेस जात असतां एकाएकीं झाडींतून एक प्रचंड वाघ त्यांचे अंगावर चालून आला !"

"अग बाई ! अन् मग ?"

"मग हे जीव रक्षणासाठीं धांवू लागले. कर्मधर्मसंयोगानें जवळच त्यांना एक गुहा दिसली. त्या गुहेंत ते शिरले व पुढें पाहतात तों एक साधुपुरुष समाधि लावून बसलेले होते. त्यांनीं नुसतें दृष्टीनें पाहिल्यावर तो वाघ गाईसारखा झाला. पुढें निवृत्तिनाथांना त्यांनीं दीक्षा दिली व ते त्यांचे गुरु झाले. श्रीज्ञानेश्वराचे हेच निवृत्तिनाथ पुढें गुरु झाले. एकीकडून वडीलभाऊ व दुसरीकडून अध्यात्मगुरु अशा जोडनात्यानें ज्ञानेश्वरांना निवृत्तिनाथ हे पूज्य होते. ज्ञानेश्वरांनीं जी आपली ज्ञानेश्वरी लिहिली ती आपल्या गुरूपुढें बसून त्यांच्या कृपाप्रसादानें लिहिली असें ते म्हणतात. निवृत्तिनाथ हे स्वतः योग-मार्गी होते. त्यांनीं स्वतः लिहिलेले कांहीं अभंग प्रसिद्ध आहेत. ते सुमारें ४०० असावेत असें वाटतें. त्यांच्या अभंगांतूनच गहिनी-नाथांचा त्यांनीं नामोच्चार केला आहे. ते म्हणतात—निवृत्तीचें ध्येय कृष्ण हाचि होय। **गयिनीनाथें** सोय दाखविली ॥

गयिनीनाथांचे शिष्य निवृत्तिनाथ यांच्यानंतर श्रीयोगिराज ज्ञानराज ज्ञानेश्वर ज्ञानदेवाचें परमपवित्र चरित्र तुम्हांला मी ऐकवणार आहें.–"

"पण बाबा—हें तुम्हीं कोणत्या आधारानें सांगतां ? स्वतः ज्ञानेश्वरांनीं आपलें चरित्र लिहिलें आहे का जवाहरलालजींच्या-सारखें !—" दादा मध्येंच म्हणाला.

"बरोबर आहे तुझा प्रश्न ! ज्ञानेश्वरांनीं स्वतः आत्मचरित्र लिहिलें नसलें तरी त्यांच्या बरोबरच्या संतांनीं त्यांचीं चरित्रें लिहिलीं आहेत. तीं चरित्रें वाचून तुला मी ही माहिती सांगतोंय."

"मग कुणी कुणी लिहिलेंय हो ?"

"प्रथम ज्ञानदेवाचे बरोबरचे संतशिरोमणि श्रीनामदेवांनीं खुद्द ज्ञानेशाचें चरित्र गायिलें आहे."

"म्हणजे नामदेव व ज्ञानदेव हे एके काळीं रहात होते ?"

"हो, एवढेंच नव्हे तर दोघांची भेट होत होती. दोघांनीं मिळून तीर्थयात्रा केलेल्या आहेत !"

"मग तर या दोघां संतांची भेट म्हणजे अपूर्व योगायोग होता म्हणावयाचा !"

"हो तर ! नामदेवांनीं ज्ञानेश्वराच्या चरित्रावर तीनशें पन्नास अभंग रचलेले आहेत. त्याचे त्यांनीं तीन भाग पाडले असून त्यांना **"आदि, तीर्थावळी व समाधि"** असें म्हणतात. पैकीं आदीचे तीस, तीर्थावळीचे साठ व समाधीचे सुमारें दोनशें पन्नास अभंग आहेत. यावरून ज्ञानदेवाची माहिती कळते. तसेंच——"

"बाबा आणखी कुणी नाहीं लिहिलें त्यांचें चरित्र जुन्या संतांनीं ? एवढे मोठे जर ज्ञानदेव तर त्यांचें चरित्रहि पुष्कळ संतांनीं गायला पाहिजे होतें !"

"तेंच तर मी आतां सांगत होतों— तुझी आपली घाई चालली आहे. —नामदेवानंतर '**सत्यामळनाथ**' नांवाच्या एका संतानें चरित्र लिहिलें आहे. तें अजून प्रसिद्ध झालेलें नाहीं. **महिपतीबुवा ताहराबादकर** यांनीं आपल्या भक्तलीलामृतांत ज्ञानेश्वरावर तीनचार प्रकरणें लिहिलीं आहेत. त्याचप्रमाणें निरंजन-माधव नांवाच्या एका कवीनें 'ज्ञानेश्वर-चरित्र' रसाळ असें वर्णिलेलें आहे. ज्ञानेश्वराचे लेखक, म्हणजे ज्ञानदेवांनीं ज्ञानेश्वरी जशी सांगितली तशी ज्यांनीं लिहिली ते '**सच्चिदानंदबाबा**' यांनींहि **ज्ञानेश्वर-विजय** नामक ग्रंथ लिहिला आहे."

"ह्या सच्चिदानंदबाबांनींच कशावरून हें लेखनाचें काम केलें?—"

"अरे, ज्ञानेश्वरींतच त्याचा दाखला आहे ना! त्यांनीं ज्ञानेश्वरी संपवतां संपवतां एक ओवी दिली आहे कीं—

शके बाराशें बारोत्तरें । तैं टीका केली ज्ञानेश्वरें ।
**सच्चिदानंदबाबा** आदरें । लेखकु जाहला ! ॥

यांत त्याचें नांव आलेलें आहे."

"शके बाराशें बारोत्तरें– म्हणजे हा शकच दिला आहे ना त्यांनीं?"

"हो, १२१२ हा शक ज्ञानेश्वरी लेखनाचा काल बरोबर आहे असें बहुतेक सर्वजण मानतात."

"म्हणजे न मानणारे आहेत कीं काय कोणी?" दादा म्हणाला.

"हो. अरे बाबा, ज्ञानेश्वर व ज्ञानदेव हे दोघे वेगवेगळे होते असाहि वाद मागें निघाला होता; पण आतां मिटला आहे तो वाद. असो. ज्ञानेश्वरांचें आणखी एक चरित्र 'नाभाजी' नांवाच्या उत्तर-हिंदुस्थानांतील एका चरित्रकारानें व्रज भाषेंत लिहिलें आहे. हा नाभाजी १६ व्या शतकांत होऊन गेला. त्याच्या ग्रंथाचें नांव **भक्तमाला** असें आहे."

"म्हणजे बऱ्याच लोकांनीं लिहिलें आहे म्हणा कीं चरित्र!"

"हल्लीं देखील पुष्कळ चरित्रें आधुनिक लोकांनीं लिहिलीं आहेत. ज्ञानदेवांचीं सगुण चरित्रें अति पावन! जो वर्णन करील तो उद्धरून जाईल असें त्यांत सामर्थ्य आहे. असो. यापुढची कथा म्हणजे ज्ञानदेवांनीं वाळींत पडल्यावर पैठणला जाऊन शुद्धिपत्र मिळविण्याचा प्रयत्न केला!"

खैरातच केली आहे. हें कसें तें १२ वा अध्याय वाचल्याशिवाय कळावयाचें नाहीं. येथें दोन तीन ओव्या देतों.

पार्था जयाचिया ठायीं । वैषम्याची वार्ता नाहीं ।
रिपुमित्रां दोहीं । सरिसा पाडु ॥
कां घरींचिया उजेड करावा । पराविया आंधारु पाडावा ।
हें नेणेंचि गा पांडवा । दीपु जैसा ॥
कां खांडावया घाव घाली । कां लावणी जयातें केली ।
दोघां एकचि साउली । वृक्षु दे जैसा ।
ना तरी इक्षुदंडु ( ऊस ) । पाळि तया गोडु ।
गाळि तया कडु । नोहेचि जेवी ॥

अशा किती तरी उपमा तुम्हांला सांपडतील. काव्याची जननी आहे ही. महाराष्ट्राच्या भक्तिपंथाची ही गंगोत्री आहे. देव व माणसांतला एकपणा सांगण्याकरतां हिचा जन्म आहे. किंबहुना महाराष्ट्रांतल्या आतांपर्यंतच्या सर्व सुविचारप्रणालींची ही माता होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. पंढरपूरचे वारकरी तरी हिला ज्ञानेश्वरी न म्हणतां "आई" असेंच म्हणतात. ज्ञानेश्वरांनीं लिहिलेली ज्ञानेश्वरी त्यांच्या वेळीं तर पूज्य होतीच, पण पुढें २०० वर्षांनीं श्रीएकनाथ महाराजांनीं ही शुद्ध केली. आपण जी सध्यां ज्ञानेश्वरी पाहतों ती एकनाथमहाराजांनीं शुद्ध केलेली आहे. जुनी ज्ञानेश्वरी इतिहासाचार्य कै. राजवाडे यांनीं शोधून काढली आहे. तींतील पदरूपें जुनींशीं भासतात. तर अशा प्रकारें सात आठशें वर्षें या ग्रंथाचा सुवास दरवळत राहिलेला आहे व पुढेंहि दरवळेल. एकनाथांनीं तर चक्कच म्हटलें आहे कीं—

श्रीज्ञानेश्वरापाठीं । जो ओवी करील मऱ्हाटी ॥
त्याणें जाण अमृताचिये ताटीं । नरोटी ठेविली ॥

किती अभिमान !"

"ज्ञानेश्वरांनीं आणखी कांहीं ग्रंथ लिहिले नाहींत?"

"लिहिलेत तर ! पण एका ज्ञानेश्वरीनेंच त्यांची कीर्ति अमर झाली आहे. त्यांनीं ज्ञानेश्वरीनंतर 'अमृतानुभव', 'चांगदेवपासष्टी' व इतरहि पुष्कळ ग्रंथ लिहिले आहेत असें म्हणतात. पैकीं अमृतानुभव हा वेदान्ती ग्रंथ फार चांगला उतरला आहे; पण चर्चा इत्यादींनीं तो कठीण झालेला आहे. असो, तर वयाच्या सोळाव्या वर्षीं अशा प्रकारची ग्रंथसंपत्ति निर्माण करून त्यांनीं मराठी भाषेला कृतार्थ केलें."

"काय, वयाच्या सोळाव्या वर्षीं?"

"हो सोळाव्या वर्षीं !"

"म्हणजे श्रीशिवाजीमहाराजांनीं ज्याप्रमाणें सोळाव्या वर्षीं तोरणा घेऊन स्वराज्याचें तोरण बांधलें त्याप्रमाणें मराठीचें तोरणच यांनीं बांधलें म्हणाना?" यमूनें आपलें मत दिलें !

"शिवाजी काय अन् ज्ञानराज काय दोघेहि महापुरुषच !" बाबा सांगूं लागले, "नेवासे मुक्कामीं हें ग्रंथकर्तृत्व करून मग ज्ञानेश्वर हे तीर्थयात्रेस निघाले. ज्ञानेश्वरांची कीर्ति या वेळपर्यंत चहूंकडे पसरली होतीच ! त्यांनीं पंढरपूर क्षेत्रीं जाऊन पांडुरंगाचें दर्शन घेतलें व संतशिरोमणि नामदेवांचे बरोबर तीर्थयात्रा करावी, अशी इच्छा प्रदर्शित केली. पण नामदेव हे तयार होईनात. ते म्हणत—

"बरा आहे पंढरपुरीं । कशास जावें इतक्या दुरी ।"

मात्र त्याच दिवशीं रात्रीं त्यांच्या स्वप्नांत पांडुरंग आले व त्यांनीं त्यांना ज्ञानेश्वराबरोबर जाण्यास सांगितलें व मग सगळे संत बरोबर घेऊन आपल्या भावंडांसह ज्ञानराज तीर्थयात्रेस निघाले.

वाटेनें या दोघा संतांचे भक्तीवर संवाद चालत. एके दिवशीं हे दोघे जात असतां वाटेंत एक विहीर लागली. पाणी प्यावयाचें तर आंत उतरावयास जागा नाहीं. ज्ञानदेव योगी होते. त्यांनीं सूक्ष्म रूप घेऊन पाणी आणून दिलें. यावर नामदेव हे योगी नसल्यानें त्यांनीं विठोबाचा धावा आरंभिला व काय आश्चर्य. ती विहीर दुथडी भरून पाण्यानें वाहूं लागली ! दोघां भक्तांचा महिमा अगाध यांत शंका नाहीं ! या यात्रेचें वर्णन श्रीनामदेवांनीं आपल्या तीर्थावळीच्या अभंगांत केलेलें आहे."

" मग बाबा, नामदेवांचें चरित्र आम्हांस सांगणार ना ? " यमू म्हणाली.

" ज्ञानदेवांचें चरित्र झाल्यावर त्यांचें व त्यांच्या संतमंडळींचींहि चरित्रें मी सांगणार आहे. तेहि मराठीचे मानकरीच आहेत. त्यांना सोडून कसें चालणार ? असो. तर तीर्थयात्रेवरून आल्यावर श्रीज्ञानेश्वरादि भावंडांनीं आळंदी मुक्कामीं रहाण्याचें ठरवलें.

संत येती घरां । तोचि दिवाळी दसरा ॥

आळंदीला दरवर्षी नियमानें संतांच्या वाऱ्या होऊं लागल्या. एकदां श्रीचांगदेव नांवाचे यति गर्विष्ट होऊन ज्ञानेश्वरांना भेटावयास आले. त्या वेळीं यांनीं निर्जीव भिंतच चालविली ! पुढें हे चांगदेव मुक्ताबाईचे शिष्य झाले. चांगदेव हे वयानें मोठे होते तर मुक्ताई ही ज्ञानानें वृद्ध होती ! पुढें ज्ञानदेवांच्या मनानें घेतलें कीं आपला अवतार संपवावा व तसा बेत त्यांनीं लोकांना कळवला. तेव्हां कोण आकांत उडाला ! संतांवर आकाश कोसळलें ! ! सोपान-मुक्ताई यांनीं तर अंगच धरणीवर टाकलें. नामदेवानें हें वर्णन आपल्या 'समाधि' या प्रकरणांत अत्यंत सुंदर व हृदयंगम रितीनें रंगवलें आहे. ज्ञानदेवांचा निश्चय अढळ होता. शेवटीं

कार्तिक व॥ १३ शके १२१८ या दिवशीं ज्ञानदेवांनीं जिवंत समाधि घेतली. सर्वांचा निरोप घेऊन स्वतः बांधवलेल्या समाधीकडे ज्ञानदेवमहाराज जेव्हां धीटपणानें चालले, तेव्हां सगळीकडे आकांत झाला. प्रत्यक्ष परमेश्वर पांडुरंग त्या वेळीं हजर होते व त्यांनीं त्यांच्या भावंडांचें समाधान केलें असें म्हणतात. श्रीनिवृत्ति-नाथांनीं जड अंतःकरणानें समाधीवरची शिळा बसवली. ज्ञान-राजांच्या नांवानें एकच जयजयकार सगळ्यांच्या दाटलेल्या गळ्यांतून निघाला कीं—

ज्ञानेश्वरमाउली । ज्ञानराजमाउली ॥

भगवद्भक्त-शिरोमणि, सरस्वतीकंठमणि, महाराष्ट्रतन्मणी, संतांचा अग्रणी हरपला ! ! ! मराठी भाषेच्या सेवकांचें तीर्थ आळंदीस आहे. एकदां तरी डोळे भरून हें स्थान पहाण्यास विसरूं नये. या पवित्र स्थानाकडे एकदां पाहिलें तरी अंतःकरण भरून येतें. ज्ञानरायांनीं जेथें देह ठेवला, तरी ते जेथें स्फूर्तीनें व कृतीनें जिवंत—चिरंजीव आहेत, तेथें महाराष्ट्र-सारस्वतभक्तांनीं जरूर जावें. वारकऱ्यांच्या वृत्तीनें जावें म्हणजे त्यांच चेतन स्वरूप जड स्वरूपांत मिसळून तें पवित्र होईल. ज्ञानेशांची तेजस्वी प्रार्थना तुम्ही पाठ करून रोज म्हणत जा.

## प्रार्थना

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥
जें खळांची व्यंकटीं सांडो । तया सत्कर्मीं रती वाढो ।
भूतां परस्परें जडो । मैत्र जीवांचे ॥

दुरितांचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ।
जो जें वांछिल तो तें लाहो । प्राणिमात्र ॥
वर्षत सकळ मंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियळीं ।
आवरत भूमंडळीं । भेटो तयां भूतां ॥
चलां कल्पतरूंचे अरव । चेतना चिंतामणींचे गांव ।
बोलते जैं अर्णव । पियूषांचे ॥
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे का तापहीन ।
ते सहा सर्वांहीं सज्जन । सोयरे होतु ॥
किंबहुना सर्वसुखीं । आपण होऊनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदि पुरुषीं । अखंडित ॥
येथ म्हणे श्रीविश्वेशरावो । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ॥

इति शम् ।"

## अभ्यास

१. या प्रकरणांत सांगितलेली यमूनें केलेली युक्ति कोणती ? त्यावरून यमूच्या स्वभावावर काय प्रकाश पडतो ?

२. ज्ञानेश्वरादि भावंडांवर कोसळलेल्या आपत्तीवर एकादा फटका अगर पोवाडा रचा.

३. ज्ञानेश्वरमहाराजांची वाणी रसाळ आहे हें कशावरून तुम्ही म्हणतां ? त्यांच्या १० ओव्या पाठ करून लिहून दाखवा.

४. टीपा करा.
(१) सत्यामळनाथ, (२) सच्चिदानंदबाबा, (३) वारकऱ्याची 'आई'.

५. ज्ञानेश्वरांनीं केलेल्या प्रार्थनेंत तुम्हांला विशेष असा कोणता दिसतो ?— ही प्रार्थना पाठ करून रोज म्हणत जा.

## नववें दालन

# सोपान-मुक्ताबाई

श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधीचें वर्णन ऐकल्यापासून दादा व यमू हीं उदास उदास झालीं होतीं. मराठी वाङ्मयांतील निर्मल हिरा असलेले श्रीज्ञानदेव हे समाधिस्थ झाले. आतां ज्यांची हकीकत ऐकावी असे प्रख्यात लेखक कोण असणार, असेंच वाटून आजचा गोष्टी सांगण्याचा दिवस असून देखील, दादा व यमू गप्प बसलीं. त्यांची कल्पना अशी होती कीं, बाबासुद्धां आज गोष्टी सांगण्यास अळंटळं करतील. पण बाबा जे बाहेरून आले ते अति उत्साहांत आले. ओटीवर येतांच डोकीवरचा रुमाल काढतां काढतांच त्यांनीं हाक दिली—

"यमे, अरे दादा, आज कांहीं व्यवस्था दिसत नाहीं?"

मग दादा यमूच्या डोक्यांत चक्क प्रकाश पडला, व "आलों हं" असें म्हणून दोघांनीं गर्दी करीत सतरंजी अंगणांत घातली व दादानें बाबांची आरामखुर्ची नेऊन ठेवली. जागेवर बसल्यावर बाबांनींच सुरुवात केली—

"ज्ञानेश्वरांनीं समाधि घेतली त्या दिवसापासून त्यांच्या तिघां भावंडाना जग ओकें ओकें वाटूं लागलें. सोपानदेव ह्यांना ह्या जगांत जास्त दिवस राहावें असें वाटेना. आपल्या बंधूच्या मागोमाग बरोबर एक महिन्यानेंच करा नदीच्या तीरीं त्यांनीं सासवड मुक्कामीं समाधि घेतली. सोपानदेवानें देखील मराठींत ग्रंथरचना केली आहे. 'पंचीकरण', 'नमन', 'हरिपाठ' वगैरे यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. ज्ञानदेवाप्रमाणें सोपानदेवांनीं देखील गीतेवर

समश्लोकी म्हणजे जितके गीतेंत श्लोक आहेत, तितक्याच मराठी श्लोकांत टीका केलेली आहे. तिला सोपानदेवी असें म्हणतात.

"म्हणजे सोपानदेव तर श्रीज्ञानेश्वरापेक्षां तरुण वयांतच समाधिस्थ झाले म्हणावयाचे." दादा म्हणाला.

"म्हणजे कितव्या वर्षीं म्हणतोस?" बाबांनीं विचारलें.

"जन्मशक मला आठवत नाहीं—नाहीं तर—"

बाबा यमूकडे बघून म्हणाले, "अन् तुला ग?—"

"अंऽहं." यमू म्हणाली.

"यावरून तुम्ही जन्मतिथि वगैरे पाठ करीत नाहीं असें दिसतें, अरे, त्यांचा जन्म शके ११९९ मध्यें झाला व समाधि शके १२१८ ची आहे. म्हणजे त्यांचे वयाला किती वर्षें झाली सांग पाहूं?"

"हात्तिच्या, एकोणीस वर्षें" यमू झटकन् म्हणाली.

बाबा नुसतें तिच्या चलाखीकडे पाहून हसले व त्यांनीं पुढें सांगायला सुरुवात केली—

"सोपानदेव गेल्यानंतर मुक्ताई हिलाहि जग खावयास उठतें असें वाटूं लागलें. तीर्थाटन करण्याकरितां संतलोकांस बरोबर घेऊन ती आपले पणजे त्रिंबकपंत यांचे समाधीचें दर्शन घेण्याकरितां म्हणून निवृत्तिनाथासह आपेगांवीं गेली."

"मुक्ताबाईची ती जन्मभूमीच नव्हे का?" मध्येंच यमू म्हणाली.

"हो, बरोबर ओळखलेंस." बाबा म्हणाले. "तें जुनें गांव पाहिल्यावर मुक्ताबाईला भडभडून आलें, व ती अत्यंत उदास झाली. याच गांवांतून "**तात आणि माता गेलीसे टाकून। तेव्हां आम्ही लहान पांडुरंगा॥** असा तिनें धावा करण्यास सुरुवात केली. तिनें अन्नपाणी वर्ज्य केलें."

"मग निवृत्तिनाथानें कांहीं सांगून पहावें कीं नाहीं ?"

"अरे, त्यानें खूप सांगितलें; पण तिनें ऐकायला पाहिजे ना ! तिची अवस्था—'**ब्रह्मानंदीं लागली टाळी–मग कोण देहातें सांभाळी**' अशी झाली होती. एके दिवशीं भयंकर पाऊस पडत होता तेव्हां तापी नदीच्या तीरीं एदलाबादेजवळ मानगांव येथील जंगलांतून संतमंडळींचा हा मेळा जात असतांना विजेचा कडकडाट होऊन लोकांचे डोळे दिपले. वीज अदृश्य झाल्यावर पाहतात, तों मुक्ताबाईहि त्यांना दिसेना. तेव्हां हाहा:कार झाला. मग संतांना कळलें कीं, मुक्ताबाई विजेबरोबरच अदृश्य झाली. ही गोष्ट वैशाख वद्य १२, शके १२१९ या दिवशीं झाली."

"विजेच्या लोळांत अदृश्य झाली म्हणजे विजेचाच अपघात झाला असा माझा तर्क आहे." दादा म्हणाला.

"शास्त्रीय दृष्ट्या कांहीं असो, भक्तांच्या दृष्टीला काय वाटलें तें मीं सांगितलें." बाबांनीं उत्तर दिलें.

"सगळ्या भावांप्रमाणें मुक्ताबाईलासुद्धां कविता करतां येत होती का ?" यमूनें विचारलें.

"हो, येत होती तर !" तिचे अभंग फारसे असे नाहींत; पण जे आहेत ते मात्र फार सुंदर आहेत. तिचे ताटीचे अभंग फार प्रख्यात आहेत."

"ताटीचे अभंग ? इश्श, ताटीचे कसले अभंग ?"

"अग, ताटी म्हणजे दार–दरवाजा, थांब. त्याची तुला गोष्टच सांगतों. ऐक–

एकदां काय झालें कीं, ज्ञानेश्वर हे सकाळीं उठून थोडेसे बाहेर फिरावयास गेले होते. इतक्यांत तिकडून विसोबा खेचर नांवाचे एक सभ्य गृहस्थ येत होते. ज्ञानेश्वरांना पाहिल्या-

बरोबर त्यांच्या कपाळाला दहावीस आठ्या पडल्या. आठ्या पडण्याचें कारण तुम्हांला कळलें असेलच. ज्ञानेश्वर, निवृत्तिनाथ इत्यादि मुलें म्हणजे संन्याशाचीं पोरें ! सकाळीं– रामप्रहरीं– त्यांचें दर्शन घ्यावयाचें म्हणजे काय ? त्यानें ज्ञानदेवांस म्हटलें– 'अरे संन्याशाच्या पोरा ! सकाळीं मला अपशकुन केलास कीं रे. आतां दिवसभर मी काय करूं ?'

ज्ञानेश्वराच्या कोंवळ्या हृदयाला हा घाव सहन झाला नाहीं. ते जे स्फुंदत स्फुंदत घरीं आले ते एका खोलीचें दार लावून बसले. कांहीं केल्या दार उघडीत ना. सोपानदेव व निवृत्तिनाथांनीं विनंति करून पाहिली तरी अंऽहं ! शेवटीं त्यांची लाडकी मुक्ताई तेथें आली. तिनें विनंति करण्यास सुरुवात केली ती अभंगांतच ! ती म्हणाली—

"योगी पावन मनाचा । साही अपराध जनाचा ॥
विश्वरागें जालें वन्हीं । संतें सुखें व्हावें पाणी ॥
शब्दशस्त्रें जाले क्लेश । संतीं मानावा उपदेश ॥
विश्वपट ब्रह्मदोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥"

अशा तऱ्हेनें तिनें अभंगांत केलेली विनवणी ऐकून प्रेमळ ज्ञानेश्वरांना भरून आलें असलें पाहिजे. मुक्ताईनें ज्ञानेश्वरांना उपदेश करावयाचा म्हणजे हा लोकाविलक्षण प्रसंग होय. ती म्हणाली—

"मिथ्या कल्पना मागें सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥"

तसेंच—

"जीभ दांतांनीं चाविली । कोणें बत्तीशी पाडिली ? ॥
मन मारूनि उन्मन करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥"

व शेवटीं—

" तुम्हीं तरूनि विश्व तारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ "
असें म्हटल्यावर ज्ञानेश्वर हसत बाहेर आले असतील यांत काय आश्चर्य ! कारण मुक्ताई ही ज्ञानेश्वरांची फार आवडती होती.

" कशावरून म्हणतां हो बाबा हें." यमू म्हणाली.

" मूर्खच आहेस," दादा म्हणाला. " आतां नाहीं का तूं ऐकलीस ताटीची गोष्ट. त्यावरून ?"

" याशिवाय आणखी एक गोष्ट सांगतों. एकदां मुक्ताई स्वयं-पाकाकरितां जळण–सरपण आणण्याकरितां बाहेर गेली होती. पण ती संन्याशाची मुलगी. तिला कोणीहि सरपण देईना. तेव्हां ती घरीं येऊन हिरमुसली होऊन रडूं लागली. ज्ञानदेवांनीं तें पाहिलें व सर्व हकीकत विचारून घेतली. अशा वेळीं ते तरी काय करणार ? ज्ञानेश्वर योगी होते ! त्यांनीं लगेच आपला जठराग्नि म्हणजे पोटांतील अग्नि प्रदीप्त केला व मुक्ताईस हाक मारली.

" मुक्ता, इकडे ये. माझ्या पाठीवर तूं भाकरी भाजून घे." मुक्ताईनें पाहिलें तों पाठीला हात लाववत नव्हता. तिनें पाठीवरच भाकरी भाजून घेतल्या."

" अगबाई ! "

" अग, आमच्याकडले योगी असेच होते. मुक्ताबाईच्या वेळेलाच 'चांगावटेश्वर' नांवाचे योगी होते. ह्यांनाच 'चांगदेव' असें म्हणतात. हे चौदाशें वर्षे जगले होते अशी लोकवार्ता आहे !"

" मागच्या खेपेला चांगदेवासमोर भिंत चालविल्याची हकीकत तुम्हीं आम्हांस सांगितली ती आम्हांला आठवते."

" तेच हे. चांगदेव मुक्ताबाईचे शिष्य होते असें तुम्हांस मीं सांगितलें तर काय वाटेल ?"

" खरें सुद्धां वाटायचें नाहीं." दादा म्हणाला.

"हें कसें काय ?" यमूनें विचारिलें.

"सांगतों ऐक." बाबा म्हणाले.

"मुक्ताबाईनें एकदां वादाविवादांत चांगलेंच हरविलें तेव्हां ते फार खजील झाले. म्हणून ती म्हणाली, "अहो यतिमहाराज, आपण अजून कच्चे आहांत, मी तुमच्या आईसारखी आहें."

चांगदेव लाजले व त्यांनीं खरोखरीच मुक्ताईला आई मानलें. ते म्हणतात—

"चांगयाचें बऱ्हाड मुक्ताईनें केलें ।
मूळ जें फेडिलें जन्मांतरिंचें ॥
आजवर होतों भाजियेलें हाड ।
नाचे संतापुढें फुंदफुंदों ॥
चौदा शतें जालीं बुद्धि माझी गेली ।
सोय दाखविली मुक्ताईनें ॥
धन्य निवृत्तिदेव धन्य सोपानदेव ।
परब्रह्म ठेव दाखविली ॥
धन्य ज्ञानदेव धन्य मुक्ताबाई ।
चांगा म्हणे आई पोटीं आलों ॥ "

"ह्याप्रमाणें चांगदेव मुक्ताईचे पुत्र झाले !"

"गम्मत आहे. चौदाशें वर्षांचा मुलगा व चौदा वर्षांची आई, असे मायलेक जगांतील हे पहिलेच असतील !" यमू म्हणाली.

"संतमहिमा अगाध खरा" दादा म्हणाला. "निवृत्ति-नाथांचें पुढें काय झालें बाबा ?"

"त्यांचें काय व्हावयाचें ? आपल्या तिघांहि भावंडांचे गुरु म्हणून राहिलेले निवृत्तिनाथ आपलें कर्तव्य म्हणून व तिघांचे

पालनकर्ते म्हणून ते मागें राहिले होते. तरी पण तिघेंहि भावंडें गेल्यावर—

" जेष्ठांच्याहि आधीं कनिष्ठानें जाणें । केलें नारायणें उफराटें ॥
उफराटें फार वाटे माझे मनीं । वळचणीचें पाणी आढ्या गेलें ॥ "

" त्यांनीं मग मुक्ताईनंतर थोड्या दिवसांनीं म्हणजे सुमारें एक महिन्यानें त्र्यंबकेश्वरीं ज्येष्ठ व॥ १२ शके १२१९ रोज्रीं समाधि घेतली."

एका वर्षांत जगाला दिपविणारीं चारी भावंडें जग सोडून गेलीं म्हणावयाचीं ! " दादा म्हणाला.

बाबा आपले पुढेंच सांगत होते—

" निवृत्तिनाथांचे सुमारें चारशें अभंग प्रसिद्ध आहेत. त्यांशिवाय 'हरिपाठ', 'निवृत्तेश्वरी' अथवा 'निवृत्तिदेवी' इत्यादि त्यांचे ग्रंथ आहेत. 'निवृत्तिसार' नांवाचा त्यांचा एक ग्रंथ होता असें नामदेव म्हणतात.

" निवृत्तिनाथांनीं ग्रंथ केला सार । ठेविला समोर विठ्ठलाच्या ॥ "

ज्ञानदेवांचे गुरु म्हणजे सर्व महाराष्ट्र वाङ्मयाचे हे गुरु म्हणून प्रख्यात असले तरी, त्यांनीं स्वतः लिहिलेले जे अभंग आहेत तेहि फार रसाळ आहेत. त्यांनीं विठ्ठलाच्या सगुण भक्तिपर अभंग गाइलेले आहेत. पैकीं एक दोन पहा—

" रुपु पहातां तरी डोळसु । सुंदर पहातां गोपवेषु ॥
महिमा वर्णितां महेषु । जेणें मस्तकीं वाहिला ॥ "

आणखी—

" उगवलें बिंब अद्वयित स्वयंभ । नाम हें सुलभ विठ्ठलराज ॥
निवृत्तीचें गुज विठ्ठल सहज । गयनीराजें मज सांगितलें ॥ "

" हे गयनीराज कोण हो बाबा ? " यमू म्हणाली.

" मागच्या खेपेस निवृत्तिनाथांचे गुरु हे होते हें मीं सांगितलें आहे."

" हो, ती वाघाची गोष्ट नाहीं का सांगितली ? " दादा म्हणाला.

मग यमूला गप्प बसावेंच लागलें. ती थोडीशी खिन्न झाली. आपल्या विसराळूपणाबद्दल तिला फार वाईट वाटलें. तिला वाईट वाटलेलें पाहून बाबा म्हणाले—

" इतकं वाईट वाटून घेऊं नकोस यमे ! माणूस विसरतो कधीं कधीं ! "

तरीहि यमू तोंड फिरवून बसली होती. तेव्हां दादा म्हणाला—

" मुक्ताई रागावली आहे बाबा—नाहीं ? " हें ऐकून बाबा हंसले व म्हणाले—

" असलास तूं ज्ञानेश्वर तर कर तिची समजूत." यावर सगळेच हसूं लागले.

### अभ्यास

१. निवृत्तिनाथादि सर्व भावंडें वयाचे कोणत्या वर्षी वारली ?

२. मुक्ताबाईचा स्वभाव कसा असावा असें तुम्हांस वाटतें ? उदाहरणें देऊन तो सिद्ध करा.

३. ताटीचे अभंग म्हणजे काय ? तो प्रसंग व एक अभंग पूर्ण लिहा.

४. चांगदेव हे मुक्ताबाईचे चिरंजीव कसे ?

५. चांगदेवानें मुक्ताबाईसंबंधानें लिहिलेल्या अभंगाचा सुंदर मराठींत अर्थ करा.

## दहावें दालन

# नामदेवमहाराज

आज नामदेवाची कथा बाबा सांगणार होते, म्हणून दादा व यमू चार वाजल्यापासून सारखीं घरांत घरांत घोटाळत होतीं. आईला-सुद्धां थोडीशी उत्कंठा लागली होती म्हणून तिनें विचारलें.

" नामदेवाची का रे व्हावयाची आहे गोष्ट आज ? मग मला पण ठाऊक आहे ती गोष्ट. "

" मग तूंच का सांगेनास गोष्ट ?"—यमू म्हणाली. आई पण सांगूं लागली. ती म्हणाली, " एक होते नामदेव. मोठे भगवद्भक्त होते ते. त्यांच्या हातचा नैवेद्य प्रत्यक्ष देव खात असत."

" हो, तूं म्हणत असतेस खरी तसलें गाणें."

" कोणतें ग ?"

" तें नव्हे का—'नामयानें नैवेद्य कुंचीखालीं झांकीला। आणून ठेविला देवापुढें ॥' हेंच तें गाणें—नव्हे का ?" असें म्हणून तिरक्या नजरेनें यमूनें आईकडे पाहिलें. आई सुद्धां हसत होती.

"—तर देव सुद्धां त्याच्या हातचा नैवेद्य खायचा. अन् एकदां काय झाली गंमत कीं, नामदेव चालले होते नैवेद्य घेऊन देवाच्या दर्शनाला. एवढंसंसं पोर, डाव्या हातांत रोटी व उजव्या हातांत तुपाची वाटी अशी स्वारी डुलत डुलत चालली होती. वाटेंत आलें एक कुत्रें. त्यानें मारलीन् झांप अन् ओढली कीं रोटी—जवळ चार पांच लोक होते, त्यांना वाटलें हें पोरगें रडायला लागेल—तों झाला उलटाच प्रकार ! नामा रडायचेऐवजीं तुपाची वाटी घेऊन त्या कुत्र्याच्या मागें लागला."

" बहुश: ते कुत्र्याला मारायला निघाले असतील " दादा म्हणाला.

" इथेंच तर तुझें चुकलें. ते काय साधे पुरुष होते ? अरे बाबा, संत ना ते ! त्यांची करणी तुम्हां आम्हांस काय कळावयाची ?"

" मग सांगशील तर खरी ! "

" ते जे कुत्र्याच्या पाठीमागें लागले होते, ते त्याला मारण्याकरितां नव्हे. तर–कुत्र्यानें नुसतीच पोळी नेली होती. ती जर त्यानें तशीच खाल्ली, तर त्याचें पोट दुखेल ना ? म्हणून हातांतील तुपाची वाटी त्याला देण्याकरितां निघाले होते ! "

" हो, आठवलें तें मला गाणें तूं म्हणतेस तें. 'काशि खाशिल कोरडी रोटी । नामाहातीं तूपवाटी ॥ "

" हं. तर, असे ते संत होते." आईनें बोलणें पुरें केलें.

" छट्, आपल्याला नाहीं हें खरें वाटत." दादा म्हणाला.

" आपला बुवा असल्या गोष्टींवर विश्वासच बसत नाहीं. हें कशावरून खरें मानावयाचें ? त्यांच्या चरित्रांत असें सांगितलें आहे का ? सांगितलें असल्यास तें कितपत खरें आहे ? इत्यादि गोष्टींचा उलगडा झाला पाहिजे."

" तुझें तें चरित्रन् फिरित्र मला नाहीं ठाऊक. त्या भानगडी 'त्यांना' विचार—"

" तें तर त्यांना आतां मी सांगणार आहे." असें म्हणत बाबा हसत हसत पुढें आले. इतका वेळ ते आडून बोलणें ऐकत असावेत असा आईला संशय आला. तिला जरा शरमल्यासारखें झालें व म्हणून ती म्हणाली—

" हें काय असें हें माणसानं आडून ऐकायचं ? " अन् ती झटकन घरांत निघून गेली.

“ चला रे मुलांनो, तुमच्या आईनें जें सुरू केलें आहे तेंच तुम्हांला मी पूर्ण करून सांगतों—” अन् बाबांनीं सुरू केलें.

“ नरसी ब्रह्मणी नांवाचें एक कृष्णातीरीं खेडें होतें. तेथें दामाशेठी नांवाचा एक मोठा हरिभक्त रहात होता. त्याच्या बायकोचें नांव गोणाई. या दोघां हरिभक्तांच्या पोटीं शके ११९२ या वर्षीं कार्तिक शुद्ध एकादशीच्या दिवशीं रविवारीं सकाळीं नामदेव जन्मास आले.”

“ कार्तिक शुद्ध एकादशीला ते जन्मास आले म्हणूनच मोठे विठ्ठलभक्त झाले.” यमू जोरांत म्हणाली.

“ अग, त्या वारीं एक नामदेव जन्मास जगांत आले असतील काय ? त्या दिवशीं जन्मलेलीं सगळीं मुलें नाहीं कुठें विठ्ठलभक्त झालीं ? मला तरी वाटतें, हा केवळ निव्वळ योगायोग आहे ! ” दादा म्हणाला. त्या दोघांना वाटलें बाबा यावर कांहीं तरी बोलतील; पण बाबांनीं पुढें गोष्टच सांगावयास सुरुवात केली. ते म्हणाले, “ शुद्ध बीजापोटीं । फळें रसाळ गोमटीं ” या न्यायानें नामदेवहि आईबाडिलांप्रमाणें विठ्ठलभक्त निपजणार असें दिसून आलें. लहानपणीच्या त्यांच्या गोष्टी तुमच्या आईनें आतांपर्यंत तुम्हांला सांगितल्या असतील—”

“ पण त्या खऱ्या आहेत का ? ” दादा म्हणाला.

“ आपण त्या तात्पुरत्या खऱ्या धरून चालूं—या नामदेवाचें आईवडिलांनीं नवव्याच वर्षीं लग्न करून दिलें. त्याच्या बायकोचें नांव राजाई.”

“ अगोबाई ! नवव्या वर्षीं लग्न ? ”

“ तुला काय आश्चर्य वाटलें ? नवव्या काय, जन्मतांक्षणींच जन्म-लग्नें झालीं आहेत ! ”

" खरंच बाबा म्हणतां ? "

" अरे, अगदीं खरं; एवढंच काय, पण आईच्या पोटांत मूल असतांना देखील पुढें होणाऱ्या अपत्यांचीं लग्नें लावून देऊन लोक मोकळे झाले आहेत ! बालविवाहाची पद्धत आपल्याकडे अगदीं टोंकाला गेलेली आहे ! अगदीं अजून सुद्धां ! असो. तर नामदेव जेव्हां वयांत आले तेव्हां त्यांच्या भगवद्भक्तीला उतार पडत चालला. त्यांना संगत वाईट लागली. चोर व दरोडेखोर यांच्या संगतींत त्यांचा वेळ जाऊं लागला; व अर्थात् त्याचे दुष्परिणाम पुढें दृष्टीस पडूं लागले. ते भर दिवसां दुसऱ्यांच्या मालमत्तेवर दरोडे घालूं लागले व अशा रीतीनें ते दरोडेखोर म्हणून प्रख्याती पावले. त्यांचा लोकांना फार उपद्रव होऊं लागला. नामदेव जरी दरोडे-खोर बनले होते, तरी त्यांचा एक नियम अढळ होता कीं, ते दररोज आवंढ्या नागनाथाच्या देवालयांत दर्शनास जात. एकदां अशी गम्मत झाली कीं, नामदेवाच्या टोळीची सरकारच्या शिपायांशीं चकमक उडाली; व त्यांत नामदेवाकडचे बरेच राऊत घायाळ झाले व मेले. नामदेव एकटेच पळून गेले. या संकटानंतर नामदेव नागनाथाच्या दर्शनास एक दिवस गेले होते. तेथें एक अस्पृश्य जातीची बाई देवळाच्या बाहेर उभी राहून भीक मागत होती. तिचें नेसलेलें अंगावरचें जुनेर ठिकठिकाणीं फाटून ती कशीबशी अब्रू झांकून घेत होती. तिच्या कडेवरचें पोर सारखें केंकाटत होतें ! त्या बाईची ती करुण अवस्था पाहून नामदेवाचें मन द्रवलें व ते म्हणाले, " बाई तुझें हें पोर कां रडतें आहे ? "

ती म्हणाली– " काय करूं बाबा, माझा दादला (नवरा) चांगला धडधाकट होता. पण नाम्या दरोडेखोराच्या संगतीनें तो बिघडला व वाटमाऱ्या करूं लागला. एक दीस सरकारच्या रावतांनीं

त्याला घेरलें व मारलें. आतां मी रंडकी काय करूं? त्यो नाम्या काय आम्हास इचारतो? अन् या कारट्याला काय मी हाडं शिजवून घालूं?" असें म्हणून ती बाई ढसढसां रडूं लागली. आपल्याच कृतकर्माचें हें फळ, हें पाहून नामदेवाला मोठा पश्चात्ताप झाला; व देवाची क्षमा मागण्याकरितां व केल्या कर्माचें प्रायश्चित्त भोगण्याकरितां तो धांवत देवळांत गेला व कोणी पुजारी निवारण करायाच्या आंतच त्यानें आपली सुरी डोक्यावर मारून घेतली व रक्ताच्या चिळकांडीची धार त्यानें शिवलिंगावर धरली! आणखीहि तो डोक्यावर वार करून घेणार इतक्यांत पुजाऱ्यानें त्याला सावरलें. नामदेव तेथेंच मूर्च्छित होऊन पडला आणि त्या दिवसापासून नामदेव धुतल्या तांदुळाप्रमाणें स्वच्छ व निष्पाप झाला! आपलें पाप कसें फेडावें हें न कळल्यामुळें, लोकांच्या सांगीवरून विठ्ठलचरणांकडे पंढरपुराला तो निघाला. डोक्यावरच्या जखमेची नीट काळजी न घेतल्यानें त्यांत पूं झालेला आहे, त्यावर माशा घोंघावत आहेत, पोटांत कांहीं अन्नाचा कण नसल्यानें पोटाची दामटी वळली आहे, चालण्याच्या श्रमानें व रस्त्याच्या धुळीनें अंग विकल व मलिन झालें आहे, डोळे आंत गेलेले, जीभ सारखी आंत ओढते आहे, तरी जो सारखा 'विठ्ठल विठ्ठल' असा घोष करतो आहे, असा नामा पंढरीस पोहोंचला, लोकांनीं त्याची टवाळी केली, ते त्याला हंसले तरी आतां नामा रागावला नाहीं, गागावला नाहीं. पूर्वीचा नामा मेला व आतां राहिला तो केवळ विष्णुदास नामा राहिला! 'माशांची घोंगाणी। जनांची निंदणी' यानें तो पार धुतला गेला!"

"खरोखरीचा हा पश्चात्ताप" दादा म्हणाला. "अशा प्रकारच्या अनुतापाच्या भट्टींत भाजल्यावर कोण माणूस संत होणार नाहीं?

आणि म्हणूनच नामदेव हे सगुणरूपी देवाचे भक्त झाले. हो ना बाबा ? ”

“ हो.” बाबा म्हणाले, “ एकदां पंढरपुराला आल्यावर मग नामदेवाचें मन घरीं जाण्यास घेईना. इकडे वडील, आई व बायको त्याची वाट पहात होतीं; व वाट पाहून तीं थकून गेलीं. शेवटीं नामदेवाचें सगळें कुटुंब पंढरपुरास येऊन राहिलें. पण आतां सगळ्यांच्या उदरनिर्वाहाची वाट काय ? नामदेव हा तर विठ्ठलचरणीं मग्न झालेला. गोणाईनें व दामाशेठीनें खूप सांगून पाहिलें. पण हे गृहस्थ ऐकेनात. शेवटीं एके दिवशीं दामाशेठीनें नामदेवांना दुकान घालून धंदा करण्यास सांगितलें. नामदेव म्हणाले, ‘कसा धंदा करूं ? भांडवल कुठें आहे ?’ गोणाई म्हणाली, ‘दादा सावकाराकडून कर्ज काढ.’ दादा सावकार नांवाचा मोठा श्रीमंत गृहस्थ पंढरपुरास होता. हा अतिशय हिशेबी होता. त्यानें नामदेवांना कर्ज दिलें. कर्जाचे पैसे घेऊन नामदेव जे निघाले, ते त्यांनीं देवळांत जाऊन ब्राह्मणभोजनच आरंभिलें. ब्राह्मणांची देवळांत झुंबड उडाली ! जेवण सुग्रास, दक्षिणा भरपूर, मग का ब्राह्मण खूष होणार नाहींत ? शेवटीं ही बातमी गोणाईला, तशीच दादा सावकाराला कळली; व तीं दोघेजण धांवतच देवळांत आलीं. पहातात तों इकडे हा थाट ! दादा सावकार पैसै बुडाले म्हणून धाय मोकलूं लागला. शेवटीं नामदेवांनीं तडजोड काढली कीं, ब्राह्मणभोजन झाल्यावर चंद्रभागेच्या तीरीं सर्वांनीं जावें व तेथें नामदेवांनीं कर्जफेड करावी. त्याप्रमाणें सगळे लोक चंद्रभागेच्या तीरीं गेलें.

नामदेव म्हणाले, सावकारानें चंद्रभागेंत बुडी मारावी व हाताला लागतील तितके तळाचे पैसे गोळा करावे. लोकांना तें खोटें वाटूं

लागलें. पण नामदेवाच्या समाधानाकरितां सावकारानें बुडी मारली, मूठभर बाळू काढली व पहातात तों ते सर्व हिरे चमकत होते!"

"पण बाबा, असले चमत्कार खरे मानावयाचे काय?" दादा म्हणाला.

"अरे, भक्तीनें भरलेल्या अंत:करणानं बघितल्यावर कोणतीहि गोष्ट खरी वाटते. **श्रद्धा हें आपलें सहावें ज्ञानेंद्रिय आहे.** श्रद्धा नसेल तर सगळेंच खोटें वाटेल. तेव्हां श्रद्धा प्रथम हवी. तुझी श्रद्धा जितपत असेल, तिथपर्यंत तुला तें खरें वाटेल."

"पण मग ज्ञानाची किंमत काय? ज्ञान व श्रद्धा यांचें नेहमींचें वांकडें आहे काय?"

"अरे, श्रद्धा म्हणजे हें ज्ञानच आहे! तात्पुरता हा भाग आपण बाजूला ठेवूं या. पुढें केव्हां तरी यावर बोलूं."

"हो, तेंहि खरंच. इथं यमू बसली आहे ना ऐकायला? तिला पुढली गोष्ट ऐकायची उत्कंठा लागली आहे. ती आधीं आपण पूर्ण करूं या.——नामदेवांची कीर्ति हरिभक्त म्हणून सगळी-कडे पसरत चालली होती. त्यांच्याशीं प्रत्यक्ष विठ्ठल बोलतो, हसतो व खेळतो, असेंहि लोकांस माहीत झालें. एकट्या पंढरपुरांत नव्हे, तर पंढरपुराच्या बाहेरच्या साधुसंतांत देखील अशी त्यांची कीर्ति पसरली. आळंदीला असणारे महान् भगवद्भक्त व ज्ञानदेव-महाराज यांच्या कानांवर देखील या कीर्तीचे पडसाद येऊन पडूं लागले. याच सुमारास म्हणजे शके १२१२ नंतर——"

"——म्हणजे ज्ञानेश्वरी लिहिल्यानंतरच ना?" यमू म्हणाली.

"हो. बरोबर आहे. ज्ञानेश्वरी लिहिल्यावर ज्ञानदेवांना देखील वाटूं लागलें कीं, आपण थोडेंसें तीर्थाटण करावें. पण बरोबर

माहितीचा, सज्जन व भगवद्भक्त म्हणून कोणास घ्यावें हें त्यांस कळेना. पण याच वेळीं त्यांची व नामदेवांची कीर्तीमुळें ओळख झाली व ज्ञानदेवांनीं स्वत: येऊन बरोबर चलण्यास त्यांना विनंति केली. पण नामदेव विठ्ठलाचे पाय सोडीत नसल्यामुळें ऐकेनात. ज्ञान व भक्ति यांची ही अपूर्व जोड करण्याचें मात्र विठ्ठलांना मानवलें व

" प्रत्यक्ष परब्रह्ममूर्ति ज्ञानेश्वर । करीतसे आदर संगतीचा ॥
ऐसें भाग्य जेणें सर्वस्वें साधावें । तरीच जन्मा यावें विष्णुदासा ॥
जावें स्वस्तिक्षेम यावें शीघ्रवत । करावें स्वहित कळेल तैसें ॥
सर्व भावें आमुचा विसरु न पडावा । लोभ असों द्यावा मजवरी ॥१॥

अशा तऱ्हेनें बोलून दाखवलें तेव्हां ज्ञानेश्वराबरोबर तीर्थयात्रेस जाण्यास नामदेव तयार झाले.

" त्यांची 'आदि', 'तीर्थावळी' व 'समाधि' हीं तिन्ही प्रकरणें तुम्हीं आम्हांस सांगितलीं आहेत, ज्ञानेश्वराची गोष्ट सांगण्याच्या वेळीं."

" हो. बरोबर आहे." बाबा म्हणाले. " अशा तऱ्हेनें पुष्कळ संत बरोबर घेऊन विठ्ठलनामाची पताका फडकवीत नामदेव सर्व हिंदुस्थानभर हिंडले. एवढेंच नव्हे तर हिंदुस्थानच्या उत्तर टोंकाचा प्रांत पंजाब. तेथें जाऊन त्यांनीं पुष्कळ वर्षे मुक्काम केला होता व आपल्या नामभक्तीची पताका त्यांनीं तेथें रोवून ठेविली होती. हें आतांच्या कांहीं गोष्टींवरून सिद्ध होत आहे."

" कोणत्या गोष्टी त्या ? " यमू म्हणाली.

" लवकरच सांगेन." बाबा म्हणाले व उशीर झाल्यामुळें ते उठले व नामदेवाची गोष्ट इतक्यावरच थांबली. त्यांची पंजाबवरची स्वारी केव्हां ऐकूं असें यमूला झालें होतें. पण पुढच्या वारापर्यंत थांबल्याशिवाय तें कसें शक्य होणार ?

### अभ्यास

१. आईनें सांगितलेल्या नामदेवासंबंधींच्या दोन गोष्टी सांगा.
२. बालविवाहाचे दुष्परिणाम कोणते?
३. नामदेवाला पश्चात्ताप कसा झाला त्या प्रसंगाचें वर्णन करा.
४. नामदेवांची तीर्थयात्रा कशी पार पडली? (या व मागच्या ज्ञानेश्वराच्या प्रकरणांतून माहिती काढून लिहा.)

---

## अकरावें दालन

# पंजाबवर स्वारी

" तीर्थयात्रेवरून परत आल्यावर नामदेव आपल्या आवडत्या आवंढ्या नागनाथाच्या दर्शनास गेले व तेथें नागनाथासमोर त्यांनीं आपलें रसाळ कीर्तन सुरू केलें. पण तेथें ब्राह्मण पुजाऱ्यास अब्राह्मणाचें कीर्तन व्हावें हें पसंत पडलें नाहीं. त्यानें एकच गलबला करून हें कीर्तन बंद पाडलें व वाटल्यास देवळाच्या पाठीमागच्या बाजूस जाऊन कीर्तन करण्यास सांगितलें. महिपतबुवा ताहराबादकरांनीं आपल्या भक्तिविजय नामक ग्रंथांत याचें सुरस वर्णन केलें आहे. तो अभंग असा—

'नामदेवासी म्हणती ब्राह्मण जात तुझी ओंगळ। निघ बाहेर करिसी विटाळ ॥ मग तो गेला देउळामागें केले दगडाचे टाळ। हरिनें फिरविलें देऊळ ॥'

नामदेवांनीं शांतपणें तें ब्राह्मणांचें म्हणणें मान्य केलें—ते देवाच्या मागील दारीं गेले व तेथें त्यांनीं कीर्तन सुरू केलें. त्यांनीं देवाला विनंति केली कीं,

'मजकडेस करून पाठी । राउळीं बैसला धूर्जटी
आतां पाहून कृपादृष्टीं । पाव जगजेठी मजलागीं ॥'

अशा तऱ्हेनें करुण वाणीनें प्रार्थना करतांच नागनाथाच्या देवळाचें तोंड फिरलें व नागनाथांनीं नामदेवासन्मुख दृष्टि केली !

"तीर्थयात्रेवरून आल्यावर तर नामदेवाचें मन ईश्वराच्या ठिकाणीं फारच गढून गेलें. सारा वेळ ईश्वराचे भजनांत ते घालवूं लागले. ईश्वर माझ्याशीं बोलतो, हंसतो अशी त्यांची मनोमन खात्री पटली होती."

"पण हें कशावरून बाबा ?" यमू म्हणाली.

"त्यांच्या अभंगांत त्याचा दाखला मिळतो म्हणून !—त्यांचे गुरु हे विसोबा खेचर होते. ज्या वेळेला हे प्रथम आपल्या गुरूला भेटावयाला गेले, त्या वेळेला ते शिवलिंगावर पाय ठेवून स्वस्थ निजले होते. त्यांच्या अंगाला ठिकठिकाणीं गळवें आलीं होतीं व त्यांतून पूं वहात होता. त्यावर माशा घोंघावत होत्या. अशा या मूर्तीला पाहून नामदेवांना किळस आली व ते म्हणाले—

"अहो आपण जरा पिंडीवरून पाय खालीं काढा ना ?"

विसोबा खेचर म्हणाले—"अरे बाबा, मी म्हातारा झालों आहे. माझा पाय तूं का उचलीनास ?" तेव्हां नामदेवांनीं त्याचे पाय उचलून दुसरीकडे ठेविले; व काय आश्चर्य ! त्या पायांखालीं दुसरें शिवलिंग तयार झालें. जेथें जेथें पाय ठेवावेत तेथें तेथें शिवलिंग तयार होई असा प्रकार झाला ! त्या प्रसंगाचे अभंग पहा:—

खेचरीं धरिला भाव । लिंगावरी ठेविला पाव ।
पहावया भाव । नामयाचा ॥ १ ॥
नामा तेथें आला । देव नमस्कारिला ।
देखोन बोलिला । वचन त्यासी ॥ २ ॥

लिंगावरी चरण ठेविले । 'काढाजी बाहिले ।
दिसतां बरी भले । करणी न कळे !' ॥ ३ ॥
तंव येरू बोलिला । ' नाम्या ! ' तूं भक्त भला ।
मज नाहीं कळला । देव तुझा ॥ ४ ॥
जेथें नाहीं देव । तेथें ठेवी पाव ।
सर्वज्ञ सदेव । तूंचि असती ॥ ५ ॥

नामदेवाचे ठिकाणीं जो थोडा अहंकाराचा फुंज होता, तोहि या गुरुभक्तीनें जळून गेला. यापुढें मात्र केवळ निखळब्रह्म व सोलीव सुख त्यांच्या वांट्यास आलें. त्यांच्या कुटुंबांत एकंदर चौदा पंधरा माणसें होतीं. त्यांना चार मुलें नारा, विठा, गोंदा व महादा पांचवी लिंबाई मुलगी. या सर्व कुटुंबाला हरिभक्तीचा नाद असून प्रत्येकानें अभंग रचले आहेत. स्वतः नामदेवांनीं १०० कोटि अभंग लिहिण्याचा संकल्प केला होता असें म्हणतात. पण हें खरें दिसत नाहीं. त्यांच्या छापलेल्या गाथेंत पंचवीसशें अभंग भरतात. त्यांत देखील त्यांच्या कुटुंबांतील मंडळींचे अभंग पुष्कळ आहेत. नामदेवाचे अभंगांत भक्तीचा जिव्हाळा फार आढळतो. इतका कोठेंहि दुसऱ्या संतांत आढळत नाहीं."

" पण आपण जे बहुधा अभंग वाचतों, त्यांत तर कोठेंहि आढळून येत नाहीं त्यांचें नांव ?"

" नीट आठवण करून पहा. आपण तर नेहमीं त्यांची कविता म्हणत असतों. "

" आपल्याला नाहीं बुवा आठवत ! "

" अन् तुला ग यमे ? "

यमूनेंहि आपण हरलों अशी मुद्रा केली. मग बाबाच म्हणाले. आपण देवाची आरती करतांना कोणती आरती म्हणतों ? "

" पंढरीच्या बिठोबाची ! 'युगें अठ्ठावीस बिटेवरी उभा' ही आपण म्हणतों."

" मग ही नामदेवाची कशावरून ? "

" अरे शेवटपर्यंत तुम्ही म्हणतां ना ? त्यांत शेवटची ओळ कोणती आहे ? "

" हां—केशवासी नामदेव भावें ओवाळीती ।"

" शेवटच्या ओळींत नामदेवाचें नांव आहे ना त्यावरून ती नामदेवाची आरती. आपल्या निस्सीम भक्तानें केलेल्या आरती-शिवाय देवाला दुसरी कोणाची आरती आवडणार ! महाराष्ट्राचें वाल्मीकि असें यांना म्हणण्यास हरकत नाहीं. केशवानें वरदहस्त ठेवून स्फुरविलेली अशी यांची वाणी आहे. यांच्याच वरदहस्तानें प्रसिद्ध तुकयाची अभंगवाणी महाराष्ट्राला लाभली.

नामदेवें केलें स्वप्नामाजीं जागें
सवें पांडुरंगें येऊनियां
सांगितलें काम करावें कवित्व
वावुगें निमित्य बोलूं नको ॥

असें तुकारामबुवांनीं म्हटलेलें आहे. आतां तुम्हांस नामदेवाचे एक दोन अभंग सांगतों." म्हणून बाबा गाऊं लागले.

१

विणा घेऊनियां करीं । उभा राउळा माझारीं ॥
तहान भूक हारपली । छंद लागला विठ्ठलीं ॥
कन्या पुत्र बाप माये । त्यांचा आठव तो नये ॥
नामा म्हणे हेंचि देईं । तुझे पाय माझे डोईं ॥

२

गरुडावरी हरी बैसोनियां यावें। आम्हांसि रक्षावें दीनबंधू ॥
अच्युत केशवा मुकुंदा मुरारी। येई लवकरी नारायणा ॥
ऐकोनिया धांवा अनंत। उभा गरुडासहित मागें पुढें ॥
वैजयंती माळ किरीट कुंडलें। नामयानें केलें निंबलोण ॥"

अभंग गात असतांना बाबा अगदीं तल्लीन होऊन गेले होते.

थोडा वेळ स्थिरस्थावर झाल्यावर यमूनेंच पहिल्यांदा प्रश्न केला कीं,—

"बाबा, त्यांची पंजाबांतली स्वारी सांगायची राहिलीच कीं!"

"हो राहिलें खरें सांगावयाचें. नामदेव हे ज्ञानेश्वरानंतर पुष्कळ वर्षें जगले म्हणजे–चांगले ५०।५५ वर्षें! ज्ञानेश्वरांनीं समाधि घेतल्यावर पांच दहा वर्षांत मुसलमान लोकांनीं स्वारी करून हा प्रांत जिंकला, व 'न्यायातें पोखीं क्षितीशु रामचंद्रु' यांचा लोप झाला. तेव्हां नामदेव हे फिरून एकदां तीर्थयात्रेस गेले. यात्रा करीत करीत ते जेव्हां पंजाबांत आले तेव्हां त्यांनीं तेथें अठरा वर्षें मुक्काम केला होता असें म्हणतात. पंजाबांत गुरुदासपूर जिल्ह्यांत **घोमान** नांवाचें खेडें आहे. त्या ठिकाणीं 'नामदेवकी मुखबानी' नांवाचें एक हस्तलिखित बाड आहे. त्यांत नामदेवाच्या कविता आहेत. तसेंच पंजाबच्या गुरुमुखी भाषेंत 'नामदेव की जन्मसाखी' या नांवाचा लहानसा ग्रंथ आहे. त्यांत नामदेवाचें चरित्र आहे. अशा तऱ्हेनें विठ्ठलभक्तीचें लोण पंजाबपर्यंत नामदेवांनीं पोहोंचविलें. नामदेवांनीं लिहिलेल्या हिंदींतील कविता अजून प्रख्यात आहेत. गुरु नानक यांनीं स्थापन केलेल्या शीख धर्म पंथाचा 'प्रमाणग्रंथ' —कोणता बरें?"

" ग्रंथसाहेब " दादा म्हणाला.

" हा ग्रंथसाहेब शिखांना वेदांप्रमाणें पूज्य आहे. या ग्रंथसाहेबांत नामदेवांनीं केलेलीं कित्येक सुंदर पदें आहेत. ! त्यांतील कांहीं ओळी.—

' अमिं अमिं आयें तुमचें द्वारां '
' माइ न होती बाप न होता कर्म न होती काया '
' हम् नही होते तुम नही होते ॥ '

" त्यांचें एखादें हिंदुस्तानी पद आम्हांला सांगा ना " यमू म्हणाली. तेव्हां बाबांनीं सांगितलें—

" रतन परखु नीरारे मुलमा मही हीरारे ।
संक पारखु नीर खीरा जोई ॥
बैरागर क्या खोटा होई ।
कालकुट्ट बीख बांधो गाठी ॥
कहां भयो नही खायो बिख किन्हो विस्तार ।
नामदेव भयो हरि गरुडद्वा ॥

अशा तऱ्हेचे हे साधु वयाच्या ८० व्या वर्षीं म्हणजे शके १२७२ आषाढ कृष्ण त्रयोदशीस पंढरपुरांतच विठोबाच्या पायाशीं समाधिस्थ झाले. अजूनहि महाद्वारांतून विठोबाच्या देवळाच्या पायऱ्या चढतांना पहिली पायरी 'नामदेवाची पायरी' म्हणून टाळावी लागते. त्यांच्या सर्व कुटुंबानें त्याच वेळीं समाधि घेतली असें म्हणतात; पण त्यावर विश्वास बसत नाहीं. त्यांचे चिरंजीव नारा, विठा इत्यादि यांचेहि अभंग प्रख्यात पण ते थोडेसेच आहेत. नामदेवाच्या कोणत्याहि गाथेंत ते सांपडतील. नामदेवाचें चरित्र पूर्ण करावयाचें म्हटलें तर त्याच्या घरीं अहर्निश काम करणारी 'दासी जनी' तिचा उल्लेख करावा लागेल. जनाबाईनें आपल्या गोड वाणीनें आतांपर्यंत व

याहिपुढें रिझविलेंहि आहे व रिझविलिहि ! सकाळीं जात्यावर तिचे अभंग म्हणतांना कित्येक तरी महाराष्ट्रीय स्त्रियांचे गोड गळे दाटून आले असतील !"

" ही दासी जनी कोण ? आमच्या शाळेंत जनाबाईचे अभंग आम्ही शिकलेलों आहोंत." यमू म्हणाली.

" मग एखादा म्हण पाहूं त्यांतला ?"

यमूही म्हणूं लागली. आधींच यमूचा गळा गोड, त्यांत जनाबाईचें गाणें !—

" कां गा नयेसी विठ्ठला । ऐसा कोण दोष मला ॥ १ ॥
मायबाप तूंचि धणी । मला सांभाळी निर्वाणी ॥ २ ॥
त्वां बा उद्धरिले थोर । तेथें कोण मी पामर ॥ ३ ॥
दीननाथा दीनबंधू । जनी म्हणे कृपासिंधू ॥ ४ ॥

२

सख्या पंढरीच्या राया । घडे दंडवत पाया ॥ १ ॥
ऐसें करी अखंडित । शुद्ध प्रेम शुद्ध चित्त ॥ २ ॥
वेध माझ्या चित्ता । हाचि लागो पंढरीनाथा ॥ ३ ॥
जावें ओवाळूनि । जन्मोजन्मीं म्हणे जनी ॥ ४ ॥"

" बा छान म्हटलेंस." बाबा म्हणाले व ते पुढें सांगूं लागले— " ही जनाबाई नामदेवाच्या घरीं दळणकांडण करीत असे. हिच्या वडिलांचें नांव दमा असून आईचें नांव करुंडा होतें. त्यांची मुलगी ही जना. नामदेवाच्या घरीं जी ही राहिली ती कायमचीच. नामदेवाच्या संगतीनें तिला विठ्ठलनामाची गोडी लागली. तिलाहि असें वाटे कीं, देव नामदेवाप्रमाणें आपल्याशीं हसतो व खेळतो. तिचा अभंगच पहा म्हणजे कळेल—

झाडलोट करी जनी । केर भरी चक्रपाणी ॥ १ ॥
पाटी भरोनियां शिरीं । केर नेउनी टाकी दुरी ॥ २ ॥
ऐसा भक्तीसी भुलला । नीच काम करूं लागला ॥ ३ ॥
जनी म्हणे बा विठ्ठला । स्वस्थ बैसे तूं दयाळा ॥ ४ ॥

एकदां विठोबाच्या गळ्यांतलें सोन्याचें पदक जनाबाईनें चोरिलें असा तिच्यावर आरोप आला. जनाबाईचें नामदेवाबरोबर देवळांत जाणें येणें असे, म्हणून लोकांना हा संशय आला. तिला दोषी ठरवून पंढरपूरच्या वाळवंटांत चंद्रभागातीरीं सुळीं द्यावें असें ठरलें. त्याप्रमाणें तिला सुळीं देत असतांना तिच्या भक्तीच्या महिमानानें त्या सुळाचें वृक्षांत रूपांतर झालें असें म्हणतात !

या जनाबाईच्या नांवानें मोडणारे ३०० अभंग आहेत; पण तिचे सर्वच असावेत असें वाटत नाहीं. शिवाय तिनें लहान लहान पौराणिक आख्यानें लिहिलीं आहेत असें म्हणतात. नामदेव-महाराजांच्याबरोबरच तिनें आपला देहकाल संपवला असेंहि म्हणतात. नामदेवाच्या समकालीन असणारे पुष्कळ संत व त्यांचें वाङ्मय महाराष्ट्र भाषेंत आहे. त्यांच्याविषयींहि मी तुम्हांस माहिती सांगणार आहे." असें म्हणून फार वेळ झाला असल्यानें बाबा खुर्चींतून उठलेच. मग यमू व दादा या दोघांनाहि उठावेंच लागलें.

### अभ्यास

१. नामदेवाचे गुरु कोण ? त्यांना गुरूपदेश कसा मिळाला ?

२. नामदेवाच्या पंजाबच्या स्वारीचें रसभरित वर्णन करा. दुसऱ्या एका महाराष्ट्रीयानें अशीच पंजाबांत आपली ओळख ठेविली आहे. ते कोण हें सांगा.

३. 'दासी जनी'ची तुम्हांस काय माहिती आहे ? तिचे अभंग जास्त कोणांस आवडतात, कां ?

## बारावें दालन

# संतांचा मेळा

बाबांना यायला जरा वेळ लागला होता. आज सकाळपासून बाबा घरांतच होते. आपल्या बसायच्या खोलींत निरनिराळ्या प्रकारचीं पुस्तकें काढून तीं वाचण्याच्या नादांत ते गुंग होऊन गेले होते. मध्येंच एक अभंग गुणगुणावा, चुटक्या वाजवाव्यात, असें त्यांचें चाललें होतें. मध्येंच कांहीं वेळ वाचन सोडून ते ध्यानस्थ झाल्याप्रमाणें स्वस्थ बसत. आज बहुश: त्यांच्या आवडीच्या संतमेळ्याच्या वाङ्मयांत ते गुंगून गेले असावेत. संध्याकाळची वेळ झाली. तेव्हां आज बाबांनींच हाक मारली कीं—" यमूताई, दादाला म्हणावें चल लवकर, आज तुम्हांला पुष्कळ साधुसंतांचीं चरित्रें ऐकायचीं आहेत."

हें ऐकल्यावर यमू तात्काळ निघाली, सगळीकडे स्थिरस्थावर झाल्यावर बाबा म्हणाले, " आज मी तुम्हांला पुष्कळ संतांची चरित्रें सांगणार आहे. यापैकीं पुष्कळ संतांचीं नांवें तुम्हांला यापूर्वींच परिचित आहेत. पहिल्यांदा माहिती सांगावयाची म्हणजे, ती बिसोबा खेचरांची.

बिसोबा खेचर यांची एक गोष्ट ज्ञानेश्वरांच्या कथेंत तुम्हीं ऐकलीच आहे. हे आळंदीस सराफीचा धंदा करीत. प्रथमत: अत्यंत स्वार्थी असे हे होते. बिसोबांना 'खेचर' ही पदवी ज्ञानेश्वरांनीं दिली असावी असें पांगारकर म्हणतात. ज्ञान व योग यांत त्यांची फार प्रगति होती. यांचे गुरु सोपानदेव हे होते. नामदेवाचे गुरु म्हणून हे प्रख्यात आहेत. दुसरे संत म्हणजे गोरा कुंभार !

गोरा कुंभार सगळ्या संत मंडळींत जुने व वृद्ध म्हणून यांना मान असे. 'तेरढोकी' या खेडेगांवांत यांनींच नामदेवाला कच्चा घट ठरवून बिसोबा खेचरांस गुरु करण्यास सांगितलें होतें. हे फार करारी व विरक्त होते."

"कशावरून हो बाबा?" आज मध्यें विचारावयाचें नाहीं असें ठरलें असतांना देखील यमूनें तोंड घातलेंच. बाबा हसून म्हणाले, "त्यांच्या करारीपणाचीच गोष्ट सांगतों म्हणजे झालें ना?" ते सांगूं लागले—

"गोरोबांच्या बायकोचें नांव 'संती' असें होतें. एकदां आपलें मूल गोरोबांच्या जवळ ठेवून ती पाणी आणावयास गेली. इकडे गोरोबा विठ्ठलभजनांत मग्न होऊन चिखल तुडवीत होते व तोंडानें हरिनामाचा गजर चालला होता. त्यांत ते इतके मग्न झाले होते कीं, त्यांचें बालक रांगत रांगत केव्हां तेथें आलें हें त्यांना समजलें सुद्धां नाहीं. चिखलाबरोबर त्यांनीं त्या मुलाचा चेंदामेंदा केला! संती घरीं आल्यावर तिला जेव्हां हें कळलें, तेव्हां तिनें गोरोबाला व त्याच्याबरोबर त्यांच्या पांडुरंगाला शिव्याची लाखोली वाहिली. हें सहन न होऊन गोरोबा तिच्या अंगावर धावले. तेव्हां ती म्हणाली—

'खबरदार जर माझ्या अंगाला हात लावला तर! तुम्हांला पांडुरंगाची शपथ आहे.—' आणि खरोखरच गोरोबांनीं पुढें संतीच्या अंगाला हात लावला नाहीं. एक मूल होतें तेंहि गेलें. नवीन संतति होण्याची आशा नाहीं. हें पाहून संतीनें गोरोबांना विनंति केली कीं,—"तुम्ही तर माझ्या अंगाला हात लावत नाहीं. कुळाच्या उद्धाराकरतां निदान दुसरें लग्न तरी करा." गोरोबा त्याला तयार झाले. मग संतीनें आपली बहीण रामी हीच त्यांना देण्याचें ठरविलें. लग्न झालें, पण शेवटीं जातांना रामीचे

बडील म्हणाले, 'जसें संतीला वागविलें तसें हिला वागवा.' पुन्हा गाडें फिसकटलें. संतीसारखें वागवायचें म्हणजे रामीच्याहि अंगाला हात लावायचा नाहीं ! म्हणजे पुन्हा त्यांना करारीपणा आडवा आला. एके दिवशीं जबरदस्तीनें गोरोबा निजले असतां त्यांचे हात या दोघां बायांनीं आपल्या अंगावर ठेविले. जागे झाल्यावर जेव्हां गोरोबानें पाहिलें कीं, आपलें वचन मोडलें गेलें आहे. तेव्हां त्यांनीं शिक्षा म्हणून आपले दोन्ही हात तोडून घेतले. काय आहे कीं नाहीं करारीपणा ?" बाबा यमूकडे पाहून म्हणाले, "गोरोबा हे सांप्रदायिक पद्धतीनें शिकले होते. त्यांचे कांहीं अभंग शिल्लक आहेत——

देवा तुझा मी कुंभार । नाशी पापाचे डोंगर ॥ १ ॥
ऐशा संतापें हे जाती । घडे साधूची संगती ॥ २ ॥
पूर्ण कृपा भगवंताची । कुंभार गोरा मागे हेंचि ॥ ३ ॥

गोरा कुंभाराप्रमाणेंच राका कुंभार व त्याची बायको 'बंका' ही संत व कवयित्री होऊन गेली. यानंतर——

३ **नरहरी सोनार.** हे पंढरपूरचे रहाणारे. आपल्या कामांत अत्यंत वाकबगार असे हे होते. हे कट्टे शिवभक्त असल्यानें पंढरपुरांत राहून त्यांनीं विठोबाचें दर्शन घेतलें नव्हतें. एके काळीं पंढरपुरच्या विठोबाला सोन्याचा करगोटा करावयाचा होता, तो यानें करावा असा आग्रह लोकांनीं धरला. तेव्हां डोळे बांधून देवाच्या कंबरेचें माप घेण्यास तो गेला. कंबरेला हात लावून पाहतो तर त्याला विठोबाची मूर्ति लागेना. पुन्हा पुन्हा चांचपावें तों शंकराची पिंडच हातास लागे. म्हणून त्यालें डोळे सोडले. अन् पाहतो तों ती विठोबाची मूर्ति ! ! मग त्याला कळलें कीं, हरि आणि हर एक आहेत व यांत भेद नाहीं. त्याचेहि कांहीं अभंग लोकांच्या

वाचनांत आहेत. त्यांचा काळ शके १५३५ च्या सुमारास झाला असें म्हणतात.

माझें प्रेम तुझे पायीं । राहो ऐसें करी कांहीं ॥ १ ॥
मागणें तें हेंचि मागों । आणिका न लागों छंदासी ॥ २ ॥
काया वाचा आणि मन । केलें अर्पण तव चरणीं ॥ ३ ॥
हाचि माझा निर्धार । म्हणे नरहरी सोनार ॥ ४ ॥

हा त्यांचाच अभंग. या संतमालिकेंतलें आणखी एक रत्न म्हणजे—

४ **चोखामेळा.** हे राहणारे मंगळवेढे गांवाचे. जातीनें महार असून आचरण शुद्ध ब्राह्मणासारखें होतें. त्यांची बायको 'सोयरा' व मुलाचें नांव कर्ममेळा. हे सगळेजण अभंग करीत. चोखामेळ्याला पंढरीची फार आवड असे.

कोणी पंढरीस, जाती वारकरी । तयांचे पायांवरी, भाळ माझें ॥
आनंदें तयासी, भेटेन आवडी । अंतरींची गोडी, घेईन सुख ।
ते माझे मायबाप, सोयरे सज्जन । तयांवरी तनुमन ओवाळीन ॥

त्यांचे अभंग मोठे रसाळ असे आहेत. एकदां मंगळवेढे या गांवचें गांवकुसु बांधण्याचें काम चाललें असतांना तें ढासळून शके १२६० वैशाख वद्य ५ स चोखोबाचा त्यांत अपघात आणि अंत झाला. चोखोबाच्या आस्थि पंढरपुरास आणल्या. त्या गांवकुसाखालीं पुष्कळ लोक मेले होते. त्यांच्या अस्थींतून चोखोबाच्या आस्थि कशा आणाव्या हा संतांना मोठा प्रश्न पडला होता. पण चोखोबाच्या अस्थींतून विठ्ठल विठ्ठल असा आवाज निघत होता. त्या अस्थि पंढरपुरास विठोबाच्या देवळापुढें नामदेवाच्या पायरीजवळ पुरल्या आहेत. 'चोखियाची महारी' या नांवानें त्याच्या बायकोनें अभंग केले आहेत. त्याचा मेहुणा बंका हाहि अभंग करी.

"बाबा अजून हो किती संत राहिलेत ?"

" का कंटाळलीस वाटतें? आतां फक्त पांच सहाच लोक राहिले. तेवढे झाले कीं आपलें हें पुराण संपलें."

" तशी कांहीं मी कंटाळलें नाहीं; पण—"

" मग मी सुरूच करतों." असें म्हणून बाबांनीं पुन्हा घसा साफ करून सांगण्यास सुरुवात केली—

" बारशीच्या पलीकडे मोगलाई हद्द आहे. तेथें शके १२५२ या सालीं वारलेल्या साधुपुरुषांची समाधि आहे. यांचें नांव 'जग-मित्र नागा'. हे जगाचे मित्र होते म्हणून यांना 'जगमित्र' अशी पदवी मिळाली. एकदां यांच्या घराला आग लागली असतां पांडुरंगाचें भजन केल्यानें यांना व यांच्या कुटुंबीयांना कांहींहि इजा पोहोंचली नाहीं! हे भिक्षा मागून रहात असत. एकदां यांच्या साधुवृत्तीची परीक्षा पहाण्याकरितां एका मुसलमान हवालदारानें सांगितलें कीं, 'एक वाघ आम्हांला कामाकरितां पाहिजे तो तुम्ही धरून आणा.' त्याला वाटलें हा भिऊन हें काम करणार नाहीं. पण जेव्हां जग-मित्रानें खरोखरीच वाघ अरण्यांतून आणिला तेव्हां मात्र भिण्याची पाळी हवालदारावर आली. असो. अशा तऱ्हेनें हे विरक्त वृत्तीचे साधु अभंगरचनेंत गुंग असत. त्यांच्याहि अभंगाचा मासला मी तुम्हांस दाखवतों तो पहा—

अग्नि जाळी तरी न कळे प्रल्हादु। हृदयीं गोविंदु म्हणोनियां ॥१॥<br>
अग्नि जाळी तरी न जळती गोपाळू। हृदयीं देवकी बाळू म्हणोनियां॥२॥<br>
अग्नि जाळी तरी न जळती पांडव। हृदयीं वासुदेव म्हणोनियां ॥३॥<br>
अग्नि जाळी तरी न जळे बिभीषणाचें घर। हृदयीं सीतावर म्हणोनियां।४।

यांशिवाय—

५ **जोगा परमानंद** नांवाचे एक साधु होऊन गेले. हा जातीनें तेली होता असें म्हणतात. रोज गीतेच्या श्लोकांएवढे म्हणजे ७००

नमस्कार एकेक गीतेचा श्लोक म्हणून तो घालीत असे. एकदां पंढरपुरास असतांना खूप पाऊस पडला व रस्त्यांत चिखल झाला. तरीहि तसेच हे नमस्कार घालीत चालले होते. एका सावकारानें त्यांना एक पितांबर अर्पण केला. पण आतां पितांबर नेसून त्यांच्या-कडून नमस्कार घालणें होईना. देवदर्शनाचे आड पितांबर येतो हें पाहून त्यानें तो पितांबर फाडून फेकून दिला व स्वतःला देह-दंड बांधिला ! यांचे कांहीं अभंग वारकरी लोकांत प्रिय आहेत. त्यांची समाधि बार्शीस आहे.

रोमांच खरवितु । स्वेदबिंदु डळमळितु ।
पाहतां नेत्र उन्मळितु । मग मिळोत मागुते ॥

अशा प्रकारची त्यांची वाणी रसाळ आहे.

६ **'परिसा भागवत'** नांवाचे एक ब्राह्मण संत नामदेवाचे शिष्य होते. ते रुक्मिणीचे भक्त होते. रुक्मिणी यांच्याशीं बोले असें ते म्हणत. हे लोकांना 'भागवत परिसा' (ऐका) 'भागवत परिसा' (ऐका) असें सारखें म्हणत. म्हणून यांना 'परिसा भागवत' असें नांव पडलें. प्रथम ब्राह्मण्याचा त्यांच्या अंगांत मोठा ताठा होता. नामदेव देखील यांच्या पाया पडे म्हणून यांना गर्व झाला होता. पण यांच्या बायकोनें—साध्वी होती बिचारी !—यांना ताळ्यावर आणलें—

पैल मेळा रे कवणाचा । नामा येतो केशवाचा ॥
परिसा येतो लोटांगणीं । नामा तयाचे चरणीं ।

याचे वीस पंचवीस अभंग प्रख्यात आहेत. नामदेव, ज्ञानेश्वर यांच्याबरोबर यांनीं तीर्थयात्रा केलेल्या आहेत.

७ **'सेना न्हावी'**—न्हाव्याचा धंदा रोज करून मग—'करूनिया स्नान । मुखीं जपा नारायण । मागुती जाण । शिवुं

नये घोकटी ॥ असा त्यांचा नियम असे. यांचे १५० अभंग उपलब्ध आहेत. त्यांतला एक अभंग पहा—

आम्ही बारीक बारीक । करूं हजामत बारीक ॥१॥
विवेक दर्पण दाऊं । वैराग्य चिमटा हालवूं ॥२॥
उदक शांती डोई घोळूं । अहंकाराची शेंडी पिळूं ॥३॥
भावार्थाच्या बगला झाडूं । काम क्रोध नखें काढूं ॥४॥
चौवर्णा देऊनि हात । सेना राहिला निवांत ॥५॥

जातीचे न्हावी असून भक्तीचा जिव्हाळा यांचे ठिकाणीं फार आहे. यापुढले—

८ **सांवता माळी**—पंढरपूर तालुक्यांत मोडलिंब जवळ अरण-भेंडी नांवाचें एक गांव आहे. त्या ठिकाणीं हे माळ्याचा धंदा करीत. एकदां नामदेव व ज्ञानदेवाबरोबर पांडुरंग त्याच्याकडे आले व त्यांनीं त्यांची परीक्षा केली. पांडुरंगानें दुसऱ्याचें रूप घेऊन सांवत्याला आपणाला आसरा देण्याची विनंति केली. सांवत्यानें हातांतील कोयत्यानें आपलें पोट फाडून देवास बसावयास जागा केली. हें त्याचें अचाट कृत्य पाहून ज्ञानेश्वर, नामदेव थक्क झाले! शके १२१७त सांवता माळी नवज्वराच्या विकारानें वैकुंठवासी झाले.

कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ॥ १ ॥
लसूण मिरच्या कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी ॥२॥
मोट नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ॥३॥
सांवता म्हणे केला मळा । विठ्ठलपायीं गोंविला गळा ॥४॥

अशा तऱ्हेचे पुष्कळ अभंग यांनीं लिहिले आहेत. याशिवाय कान्हो पाठक, कूर्मदास, नामा पाठक, सच्चिदानंदबाबा असे कितीतरी लहान लहान संत याच वेळेला होऊन गेले. यांनीं प्रत्येकांनीं

आपल्या कुवतीप्रमाणें पंढरिनाथाचें गुणगान गाइलें आहे. पंढरीच्या बारकऱ्यांचा हा मेळा जसा त्या काळीं चालू होता. तसा अजूनहि चालूच आहे. ज्ञानेश्वर-नामदेवांनीं जी प्रथा पाडली तिचा मागोवा घेत वारकरी मंडळी अजूनहि जात आहेत.—"

"पण काहो बाबा, ही जी माहिती सांगितलीत ती सगळी ज्ञानेश्वर व नामदेव यांच्या वेळच्या लोकांचीच ना?" दादा म्हणाला.

"हो तर! मी तुम्हांला फक्त 'मराठीचिये नगरींतील' ज्ञानेश्वर-नामदेवापर्यंतच्या दालनांतच आणून सोडण्याचें ठरवलें होतें. त्याप्रमाणें आपला येथपर्यंतचा प्रवास तरी सुखाचा झाला." असें म्हटल्यावर बाबांचे चेहऱ्यावर एक प्रकारचें तेज चमकलें त्यांना सांगावयाचें होतें तें संपलें. तरी पण यमूच्या डोक्यांत अजून कांहींतरी विचारावयाचें होतें असें दिसलें तेव्हां तिचा हिरमोड होऊं नये म्हणून बाबांनीं प्रश्नार्थक मुद्रा यमूकडे केली. यमूहि भीतभीत म्हणाली—

"बाबा, तेवढी ती मराठीचिये नगरीं ही ओवी पुन्हा एकदां सांगतां का?" बाबांनीं मोठ्यानें ती ओवी सांगितली व ते उठलेच—

ये मराठीयेचिया नगरीं। ब्रह्मविद्येचा सुकाळु करी ॥
देणें घेणें सुखचि वरी। हो देइं या जनां ॥

### अभ्यास

१. या दालनांतील सगळे अभंग पाठ करा. गोरोबा इत्यादि सर्व संतांच्या भेटीवर एकादा संवाद रचा व त्यांत त्या अभंगांचा उपयोग करा.
२. या 'संतमेळयांत' असणारे संत आधुनिक जगांत कोणी त्यासारखे दिसतात का? दिसत असल्यास त्यांची व यांची तुलना करा.
३. ज्ञानेश्वर-नामदेवांच्याच वेळेला हे संत एकदम कां चमकून गेले, याविषयीं तुम्ही एकादी सुंदर उपमा योजा.

# समारोप

आतांपर्यंत यमू व दादा यांनीं पुष्कळ संतांच्या गोष्टी ऐकिल्या. 'कांहीं दिवस त्या बंद होणार' म्हणून बाबा म्हणत होते. या गोष्टींचें सत्र बरेंच लांबलेलें होतें. त्या बंद होणार तेव्हां तत्प्रीत्यर्थ कांहीं तरी छोटा समारंभ करावा असें दादाच्या मनांत आलें. तसें बाबांना सांगावें म्हणून तो त्यांच्याकडे धावत गेला. बाबा नुकतेच 'हपीसां'तून आले होते. 'आतां सांगावें कीं न सांगावें' या परिस्थितींत दादा पडला. 'छेः नयेच सांगूं' असें मनांत म्हणून तो परत फिरणार इतक्यांत, बाबाच त्याला म्हणाले—" का रे कां आला होतास ?"

" कुठें काय ?—आपला उगीच." दादा म्हणाला.

" कांहीं तरी सांगायचें होतें तुला ? हो ना ?" बाबा खुंटीला रुमाल अडकवीत म्हणाले. " अरे स्पष्टपणें सांग—वेडा !"

" माझ्या मनांत असें होतें कीं," दादा सांगूं लागला. " आपण आपल्या गोष्टींचा शेवट चांगल्या रितीनें करूं या."

" म्हणजे कसा ?" बाबा प्रश्नार्थक चेहरा करून म्हणाले. पण त्यांना नंतर एक कल्पना मनांत आली. " म्हणजे 'उद्यापन' करायचें म्हणतोस ?"

" हं तसेंच कांहींतरी. अगदींच कांहीं 'उद्यापन' नको. आपला छोटासा समारंभ करूं या." दादा म्हणाला.

" मग तूंच ठरव काय करावयाचें तें. माझी त्याला संमति आहे." एवढें बोलून बाबा निघून गेले.

मग दादानें सगळे बेत ठरवले. त्या निमित्तानें त्यानें आपल्या दोन चार मित्रांना घरीं बोलावलें. या मित्रांना तो जसजशा बाबा

गोष्टी सांगत, तसतशा सांगत असे. तेव्हां समारोपाचे दिवशीं त्यांना बोलवावेंच असें त्यानें ठरवलें. मग तो आईकडे गेला. आई क़ामांत होती तरी त्यांतूनहि तिनें उसंत काढली. दादाचें म्हणणें ऐकून तिलाहि आनंद झाला. ती तर म्हणाली, "तुझ्या मित्रांना उद्यां घरीं जेवावयासच बोलाव." मग तर दादाला अतिशय आनंद झाला. यमूला ही गोष्ट कळल्यावर ती म्हणाली—"मग मी सुद्धां माझ्या मैत्रिणींना बोलावीन."

दुसऱ्या दिवशीं 'तुकाराम बीज' होती. गप्पागोष्टी होत होत सर्वांचीं जेवणें झालीं. बाबा सुद्धां मधून मधून त्यांच्यांत भाग घेत. शेवटीं जेवण झाल्यावर बाबांनीं सर्वांना दिवाणखान्यांत बोलावलें. सर्वजण म्हणजे आई सुद्धां! ती देखील तशीच आली. बाबांनीं दिवाणखान्यांत कां बोलावलें याचा कुणालाहि अंदाज करतां येईना. इतक्यांत बाबाच बोलूं लागले, "मुलांनो, तुम्ही ज्या साधुसंतांच्या गोष्टी ऐकिल्यात व त्या योगें जो तुम्हांला मराठी भाषेचा इतिहास कळला तो तुम्ही आदरानें लक्षांत ठेवा. मराठी भाषेंतील सर्वांत मुकुटमणि असा जो ग्रंथ 'ज्ञानेश्वरी' तो मी तुम्हांस या प्रसंगीं बक्षीस म्हणून देतों. तुम्ही सगळे ती वाचीत जा. तुम्हांला तिच्यां-तील ओव्या समजणार नाहींत; एवढेंच नव्हे तर, तिच्यांत सांगितलेले विचार तुमच्या माहितीचेहि असणार नाहींत. पण तिची भाषा-माधुरी पुढें कळून येण्यास व विचारसौंदर्य पटण्यास आतांपासून तिचीं पारायणें करा. पाठ करा. आपण सूर्याला नमस्कार करतों व म्हणतो 'तेजोऽसि तेजो मे देहि।' तशी आपण या भाषादेवीची प्रार्थना करूं या. मी सांगतों त्या दहा दहा ओव्या जरी तुम्हीं पाठ केल्या तरी तुम्हांला त्याचा फार उपयोग होईल." असें म्हणून त्यांनीं रेशमी पुठ्ठ्याची एक ज्ञानेश्वरीची प्रत दादाच्या हातांत

दिली. दादानें ती घेतली व तिला नमस्कार केला. बाबा या निमित्तानें एवढा मोठा ग्रंथ आपणाला देतील अशी त्याची कल्पना नव्हती. शेवटीं सर्वांना बुक्का लावल्यावर हा समारंभ संपला.

सर्वजण निघून गेल्यावर दादा एकटाच मांडीवर पुस्तक घेऊन कांहींतरी उघडण्याचा मिटण्याचा चाळा करीत होता. आज एकादी तरी ओवी पाठ करावयाचीच असा त्यानें बेत केला व अभावितपणें त्यानें एक पान उघडलें व तो वाचूं लागला—

ये मराठियेचिया नगरीं । ब्रह्मविद्येचा सुकाळु करी ।
देणें घेणें सुखाचि वरी । हो देई या जनां ॥

६१२५
REFBK-0006127

# सूचि


अ

अच्युत ३१
अमृतानुभव ६३

आ

आदि ५८

ऋ

ऋद्धिपूर २३
ऋद्धिपूरचरित्र, २९, ३०

क

कोंकणी २
कारवारी २
केशवराज ४३
कर्ममेळा ९४

ख

खानदेशी २

ग

गोमतेश्वर २
गोरखनाथ १३
गोविंदप्रभु २३, २७, २८
गहिनीनाथ ५७
गुरुदासपूर ८७
ग्रंथसाहेब ८८
गोरोबा ९२

घ

घोमान ८७

च

चामुण्डराय २
चौऱ्यांयशीची शिला ११
चक्रधरस्वामी २०
चांगदेव ६४, ६९
चोखा ९४

ज

जयंतपाळ १३
जयकृष्णीय ३१
जन्मसाखी ८७
जगमित्रनागा ९५
जोगा परमानंद ९५

त

त्रिमल्लदेव २०
तीर्थावळी ५८
तुकाराम ८६

द

देवगिरी १४
दामोदर पंडित ४३
दामाशेठी ८०
दादा सावकार ८०
दासी जनी ८८–९०

ध

धर्मभिक्षा ३४

न

नागार्जुन २९
नरेंद्रभट्ट ४५
निवृत्तिनाथ ५४, ७३
नाभाजी ५९
नेवाशे ६०, ६९
नामदेव ६३, ७५
नानक ८७
नरहरी सोनार ९३

# सूचि


अ

अच्युत ३१
अमृतानुभव ६३

आ

आदि ५८

ऋ

ऋद्धिपूर २३
ऋद्धिपूरचरित्र, २९, ३०

क

कोंकणी २
कारवारी २
केशवराज ४३
कर्ममेळा ९४

ख

खानदेशी २

ग

गोमतेश्वर २
गोरखनाथ १३
गोविंदप्रभु २३, २७, २८
गहिनीनाथ ५७
गुरुदासपूर ८७
ग्रंथसाहेब ८८
गोरोबा ९२

घ

घोमान ८७

च

चामुण्डराय २
चौऱ्यांयशीची शिला ११
चक्रधरस्वामी २०
चांगदेव ६४, ६९
चोखा ९४

ज

जयंतपाळ १३
जयकृष्णीय ३१
जन्मसाखी ८७
जगमित्रनागा ९५
जोगा परमानंद ९५

त

त्रिमल्लदेव २०
तीर्थावळी ५८
तुकाराम ८६

द

देवगिरी १४
दामोदर पंडित ४३
दामाशेठी ८०
दादा सावकार ८०
दासी जनी ८८–९०

ध

धर्मभिक्षा ३४

न

नागार्जुन २९
नरेंद्रभट्ट ४५
निवृत्तिनाथ ५४, ७३
नाभाजी ५९
नेवाशे ६०, ६९
नामदेव ६३, ७५
नानक ८७
नरहरी सोनार ९३

प

पुणेरी २
पृष्ठमात्रापद्धत २
पंढरपुरचा शिलालेख ११, १२
पूजावसर ४३
परिसाभागवत ९६

ब

बोलभाषा २, ३
„ प्रकार ३
बंका ९४

भ

भास्करभट ४१
भावे बास ४३
भक्तमाला ५९

म

महाराष्ट्रसीमा २
मराठवाडा २
मुकुंदराज १२
मच्छिंद्रनाथ १३
मोडी १५, १६
मेस्तकें १७
महदांबा २९
महींद्रभट ४१
मुक्ताबाई ५४, ६८–७२
महिपतिबुवा ५८

र

रामटेक २३
राजोबा ४५
रामानंद ५१
राजाई ७७

ळ

लेखीभाषा २
लिपि ( देवनागरी ) २
लेखनकल्पतरु १६

व

वऱ्हाडी २
विवेकसिंधू ३
विशालदेव २०, २१
वच्छहरण ४२, ४४
विसोबा खेचर ८४, ९१

श

श्रवणबेळगोळा २
शकावरून सन २
शिशुपालवध ४२

स

सिद्धान्तसूत्रपाठ ३१
संकेतलिपि ३२, ३६
साती ग्रंथ ३७
सोपानदेव ५४, ६७
सत्यामळनाथ ५८
सच्चिदानंदबाबा ५९
सोयरा ९४
सेना न्हावी ९६

ह

हेमाद्री १२, १५
हरपाळ २१
हरिहरपंत ४९

ज्ञ

ज्ञानदेव ५६, ८०
ज्ञानेश्वरी ६०
ज्ञानेश्वरीची शुद्धि ६२

# आमचें प्रकाशन

जीवनाचा पाया
बा. कृ. गलगली

विवाहितांचे नंदनवन
राजरत्न जोशी

स्त्रियांचे हक्क-सुधारणा
राजरत्न जोशी

अविवाहितांचे प्रश्न
राजरत्न जोशी

फासिझम
मानवेंद्रनाथ रॉय

आगरकर
पु. पां. गोखले

समाधीवरलीं फुलें
वि. स. खांडेकर

जलधारा
वि. वि. बोकील

मानलेलीं मुलें
मा. भ. नंदुरकर

स्त्रीजीवन भाग १ व २
साने गुरुजी

क्रांति
साने गुरुजी

पुनर्भेट भाग ६ वा
य. गो. जोशी

मंगळागौरीच्या रात्रीं
वि. वि. बोकील

अर्धचंद्र
पंडित सप्रे

वर्तिका
शशांक

पुराणपुरुषाच्या अडचणी
द. त्रि. गुते

साहित्यमंजरी
रा. का. जोशी

तिसरा प्रवाह
पां. गो. लोहोकरे

पाणपोई
पां. गो. लोहोकरे

जीवनछाया
कै. सोहोनी

बाबूच्या लीला
आनंदीबाई जयवंत

## आगामी

तीन मुलें
साने गुरुजी

राष्ट्रीय धर्म
साने गुरुजी

? ? ?
द. र. कवठेकर

प्रकाश मंडळ, ५२९ सदाशिव, पुणें २